



रयत शिक्षण संस्थेचे,

महात्मा फुले महाविद्यालय

पिंपरी, पुणे – ४११ ०१७.

नॅक चतुर्थ मूल्यांकन 'A++' ग्रेड (CGPA 3.61)

शाल्मली

२०२४-२५



पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७ वा जयंती सोहळा



मा. प्राचार्य डॉ. एस. एन. पठाण
(माजी कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर) यांचे व्याख्यान



मा. संजोगजी वाघेरे–पाटील
(सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सातारा व चेअरमन, महाविद्यालय विकास समिती) यांचे अध्यक्षीय मनोगत



मा. प्राचार्य प्रो.(डॉ.) माधव सरोदे यांचे प्रास्ताविक



रथयात्रेत सहभागी
मा.उषाताई वाघेरे–पाटील (माजी नगरसेविका, पिं.चिं.म.न.पा.), प्राध्यापक व प्रशासकीय सहकारी




रथयात्रेत सहभागी प्रतिनिधी विद्यार्थी

रयत शिक्षण संस्थेचे,

महात्मा फुले महाविद्यालय

पिंपरी, पुणे – ४११ ०१७.



शाल्मली

२०२४-२५

संपादक मंडळ

अध्यक्ष

प्र.प्राचार्य

प्रोफेसर (डॉ.) पांडुरंग भोसले

मुख्य संपादक

डॉ. वैशाली खेडकर

विभागीय संपादक

प्रो.(डॉ.) कामायनी सुर्वे (हिंदी)

डॉ. निलकंठ डहाळे (इंग्रजी)

प्रा. संग्राम गोसावी (मराठी)

अहवाल विभाग

प्रा. स्वप्ना हजारे

छायाचित्र विभाग

डॉ. तृप्ती अंब्रे

दीपस्तंभ




पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

संस्थापक, रयत शिक्षण संस्था, सातारा



रयत माऊली

सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील



महात्मा जोतीराव गोविंदराव फुले




मा.खासदार शरदराव गोविंदराव पवार

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा

आमचे मार्गदर्शक




मा. चंद्रकांत दळवी IAS (Retd.)
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा. ॲड. भगीरथ शिंदे
व्हा. चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा. ॲड. राम जनार्दन कांडगे
उपाध्यक्ष



मा. डॉ. अनिल पाटील
संघटक



मा. विकास देशमुख IAS (Retd.)
सचिव



मा. प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे
सहसचिव (उच्च शिक्षण)



मा. प्रिं. डॉ. राजेंद्र मोरे
सहसचिव (ऑडिट)




मा. बंडू नारायण पवार
सहसचिव (माध्यमिक विभाग)

आमचे दिशादर्शक कुशल नेतृत्व



मा. श्री. संजोग वाघेरे-पाटील
(चेअरमन, महाविद्यालय विकास समिती)




मा. प्र. प्राचार्य प्रो. डॉ. माधव सरोदे
(कार्यकाळ – दि. ०८/१०/२०२४ पर्यंत)



मा. प्र. प्राचार्य प्रो. डॉ. पांडुरंग भोसले
(कार्यकाळ –दि. ०९/१०/२०२४ पासून)

महाविद्यालय विकास समिती



मा.श्री. संजोग वाघेरे-पाटील
चेअरमन, महाविद्यालय विकास समिती



मा. विकास देशमुख (IAS Retd.)
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



प्रो.डॉ. दत्तात्रय हिंगणे
प्राध्यापक प्रतिनिधी



डॉ. शुभदा लोंढे
प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा. प्रसाद बाठे
प्राध्यापक प्रतिनिधी



डॉ. मारुती केकाणे
प्राध्यापक प्रतिनिधी



मा. शांताराम गराडे
स्थानिक प्रतिनिधी



मा. प्राचार्य डॉ. हंसराज थोरात
स्थानिक प्रतिनिधी



मा. विशाल मासुळकर
स्थानिक प्रतिनिधी



मा. हनुमंत वाघेरे
स्थानिक प्रतिनिधी



डॉ. निलकंठ डहाळे
समन्वयक, आय.क्यू.ए.सी.



सौ. रत्नप्रभा नाईक
शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी



कु. ईश्वर शिंदे
विद्यार्थी प्रतिनिधी



प्राचार्य (प्रो.)डॉ. पांडुरंग भोसले
सचिव, महात्मा फुले महाविद्यालय

गुणवंत प्राध्यापक



प्राचार्य प्रोफेसर डॉ. पांडुरंग भोसले
यांना लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार प्राप्त, महाराष्ट्र साहित्य परिषद, राजगुरुनगर यांचा कर्मवीर भाऊराव पाटील जीवन गौरव पुरस्कार प्राप्त, युगपुरुष: महात्मा बसवेश्वर या पुस्तकाचे संपादन



प्रोफेसर डॉ. संगीता अहिवळे
यांची Society for Bacteriophage Research and Therapy या संस्थेत Joint- Secretary म्हणून निवड



प्रोफेसर डॉ. कामायनी सुर्वे
यांची डेक्कन एजुकेशन सोसा. विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे हिंदी अभ्यास मंडळावर सदस्यपदी निवड तसेच मिठीबाई महाविद्यालय, मुंबई येथील हिंदी अभ्यास मंडळावर सदस्यपदी निवड
राष्ट्रीय बंधुता प्रतिष्ठानचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त



डॉ. दत्तात्रय हिंगणे
यांची प्रोफेसरपदी बढती



डॉ. मारुती केकाणे
यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना संशोधन प्रकल्पासाठी ASPIRE Research Mentorship Grant रुपये १,५०,००० मंजूर व १० पेक्षा अधिक सहलेखक पुस्तकांचे प्रकाशन



डॉ. वैशाली खेडकर
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे हिंदी अभ्यास मंडळ सदस्यपदी निवड
'स्त्री आत्मकथा के बहाने' पुस्तक प्रकाशित
प्रथम वर्ष हिंदी अभ्यासक्रमाच्या तीन पुस्तकांचे संपादन



डॉ. पांडुरंग लोहोटे
(शारीरिक शिक्षक संचालक)
यु.जी.सी. केअर लिस्टेड जर्नल-मध्ये शोध निबंध प्रसिद्ध



डॉ. संदीप नन्नावरे
यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा पुणे शहरातील जिल्हास्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित



डॉ. प्रतिमा कदम
Introductory Microeconomics व Introductory Macro Economics ही दोन संदर्भ पुस्तके प्रकाशित तसेच एक IEEE Scopus जर्नलमध्ये शोधनिबंध प्रसिद्ध



डॉ. विजया पोकळे
यांचे 'शाश्वत विकास उद्दिष्टे' व 'Sustainable Development Goal' ही पुस्तके प्रकाशित



डॉ. सोनल बावकर
यांचे 'IncomeTax' व Financial Accounting II पुस्तक प्रकाशित



प्रा. शीतल भागवत जाधव
यांना विविध राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवर आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त
तसेच मानसशास्त्र विषयामध्ये पीएच.डी. संपादन



प्रा. विशाल निकम
यांना साप्ताहिक उपदेशक या संस्थेचा शिक्षक गौरव पुरस्कार



प्रा. अनिरुद्ध देशमुख
अर्थशास्त्र विषयाची सेट परीक्षा उत्तीर्ण
एलएलबी डिग्री पूर्ण करुन महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलमध्ये सनद प्राप्त

प्रथम क्रमांकाचे मानकरी



कु. प्राजक्ता सुतार
F.Y.B.Sc.



कु. मगर प्रणाली
S.Y.B.Sc.



कु. राजेश्वरी दसारी
T.Y.B.Sc. (Chem.)



कु. निलेश संकेश्वरे
T.Y.B.Sc. (Micro)



कु. दत्तात्रय माने
M.Sc.-II (Micro)



कु. भावना ढवळे
F.Y.B.A.



कु. संध्या शिंदे
S.Y.B.A.



कु. गायत्री मांडेकर
T.Y.B.A.



कु. रूपा काटे
M.A. I (Marathi)



प्रतिभा राऊत
M.A. I (Hindi)



कु. श्वेता केंगळे
M.A. I (Economics)



कु. जोशी कोमल
M.A. I (Geography)



कु. प्रसन्नता सूर्यवंशी
M.A. I (History)



कु. सुजाता सुर्यकर
M.A. II (Marathi)



कु. शितल भुजबळ
M.A. II (Economics)



कु. प्राची शेलार
M.A. II (Hindi)



कु. संजय गायकवाड
M.A. II (History)

प्रथम क्रमांकाचे मानकरी



कु. इक्रम शेख
M.A. II (Geography)



कु. आदिती अंनगुले
F.Y.B.Com.



कु. गायत्री भोसले
S.Y.B.Com.



कु. दीक्षा मांडके
T.Y.B.Com.



कु. काजल पाटील
M.Com.-I



कु. श्रुती कुंभार
M.Com.-II




कु. लाड पल्लवी
F.Y.BBA (CA)



कु. कविता मेहरा
S.Y.BBA (CA)



कु. रोशनी वाघमारे
T.Y.BBA (CA)



कु.समर्थ सोनावणे
F.Y.B.Voc.



कु. प्राजक्ता मालुंजकर
T.Y.B.Voc.



कु. संजना कोरे
11th Science



कु. नेहा राव
11th Commerce



कु. ऋतुजा रामपुरे
11th Arts



कु. मनिष गोस्वामी
12th Arts



कु. गौरी डुंबरे
12th Science



कु. श्रेया वाकडे
12th Commerce



वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ.राजेंद्र थोरात



मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात मार्गदर्शन करताना मा. अरुण कांबळे (संपादक, दैनिक पवना समाचार)



मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी मा. गोविंद वाकडे (ब्युरो चीफ, आय.बी.एन.लोकमत)



राजभाषा मराठी गौरव दिन कार्यक्रमानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात मार्गदर्शन करताना प्रसिद्ध साहित्यिक मा.डॉ. श्रीपाल सबनीस



राजभाषा मराठी गौरव दिन कार्यक्रमानिमित्त विशेष व्याख्यानात मार्गदर्शन करताना र.शि.सं.चे सहसचिव (उच्चशिक्षण) मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे



प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे आणि प्राचार्य प्रो.(डॉ.) पांडुरंग भोसले संपादित युगपुरुष महात्मा बसवेश्वर या पुस्तकाचे प्रकाशन करताना मा.डॉ. श्रीपाल सबनीस आणि अन्य मान्यवर



मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित भित्तीपत्रकाचे अनावरण करताना प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, डॉ. श्रीपाल सबनीस आणि प्राचार्य प्रो.(डॉ.) पांडुरंग भोसले



मराठी विभागातील एम.ए. भाग १ चे विद्यार्थी प्रसिद्ध आदिवासी साहित्यिक प्रा.डॉ. तुकाराम रोंगटे (प्रमुख,मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांची मुलाखत घेताना




'हिंदी पख़वाडा' के उपलक्ष्य में आयोजित
हिंदी काव्यवाचन प्रतियोगिता (सितंबर 2, 3, 2024)



'हिंदी पख़वाडा' के उपलक्ष्य में प्रकाशित
'सृजन यात्रा' भित्तिपत्रिका (सितंबर 14, 2024)



'हिंदी दिवस समारोह' के उपलक्ष्य में आयोजित मा.डॉ. ओंकारनाथ शुक्ल
(अवकाशप्राप्त वरिष्ठ हिंदी अधिकारी, भारतीय उष्णदेशीय मौसम
विज्ञान संस्थान, पुणे) द्वारा करियर मार्गदर्शन (सितंबर 14, 2024)



'हिंदी दिवस समारोह' के उपलक्ष्य में आयोजित मा. इम्रानभाई शेख
(पूर्व छात्र, हिंदी विभाग) का मंतव्य (सितंबर 14, 2024)



'विश्व हिंदी दिवस' के उपलक्ष्य में आयोजित –मा.डॉ. स्वाति चड्ढा
(वरिष्ठ हिंदी अधिकारी, सी.एस.आई.आर.–राष्ट्रीय रासायनिक
प्रयोगशाला (NCL), पुणे) (जनवरी 10, 2025)




हिंदी विभाग द्वारा विश्व मराठी संमेलन की क्षेत्र भेंट (फरवरी 02, 2025)



हिंदी विभाग की छात्रा मुस्कान इब्राहिम गोलंदाज की किताब
'अल्फाज– ए– रूह' का विमोचन – मा.ॲड. भगीरथ शिंदे (व्हा.चेअरमन,
रयत शिक्षण संस्था, सातारा के करकमलों (फरवरी 14, 2025)



हिंदी विभाग द्वारा महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे
की क्षेत्र भेंट (मार्च 05, 2025)



महाविद्यालयात आयोजित यु.जी.सी.एफ.डी.पी. कोर्समधील क्षणचित्र
(आभासी मंच – दि. २ डिसेंबर २०२४ ते १३ डिसेंबर २०२४)



Dialogue with the Author या कार्यशाळेमध्ये
मा. तेन्झीन त्सुन्डू, तिबेटन कवी (दि. २५ मार्च २०२५)



पिंपरी–चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट (दि. १९ एप्रिल २०२५)



शिवजयंती प्रतिमापूजन – प्राचार्य प्रो.(डॉ.) पांडुरंग भोसले



शिवजयंती व्याख्यान वक्ते
मा. हेरंब पायगुडे



संविधान गौरव दिन व्याख्यान वक्ते
मा.ॲड. सतीश गोरडे



संविधान गौरव दिन व्याख्यान अध्यक्ष
प्राचार्य प्रो.(डॉ.) पांडुरंग भोसले



संविधान दिन कार्यक्रम – प्रास्ताविक
प्रा. भाऊसाहेब सांगळे



Geography Day celebrated by the Geography Department



Department of Geography organized Guest Lecture of Alumni Mrs. Kranti Nivruti Jadhav on the occasion of International Ozone Day



Department of Geography organized Guest Lecture of Alumni Mrs. Najnin Khudabaksh Maner on the occasion of Renewable Energy



Student's of Geography celebrated the Teacher's Day



Student's Group photo of MA Part 1 and 2 of Geography Dept., field visit to Kusawali village

One Day Workshop on 'How to Write a Research Project'



डॉ. श्रीकांत फुलसुंदर (Resource Person) मार्गदर्शन करताना



डॉ. प्रगती गोरे (Resource Person) मार्गदर्शन करताना



प्राचार्य प्रो. (डॉ.) पांडुरंग भोसले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना



डॉ. प्रतिमा कदम प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देताना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक दिवसीय उद्बोधन कार्यशाळा (School Connect)



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे NEP-2020 Video Clip प्रसारित



प्रो. (डॉ.) प्रमोद आंबेकर (Resource Person) मार्गदर्शन करताना



प्राचार्य प्रो. (डॉ.) माधव सरोदे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना



जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. बाबासाहेब पवळ यांचे एफ.वाय., एस.वाय., टी.वाय.बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान



शॉट टर्म कोर्स अंतर्गत प्रदर्शनामध्ये एस.वाय./ टी.वाय.बी.ए. (मानसशास्त्र) या वर्गाचे सहभागी विद्यार्थी



मानसशास्त्रीय समुपदेशन समिती अंतर्गत प्रा.डॉ. शीतल भागवत जाधव विद्यार्थ्यांना वैयक्तिक समुपदेशन करताना



प्रा.डॉ. शीतल भागवत जाधव यांना मराठी साहित्य मंडळ आयोजित, ७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यात मा. आमदार सुनील शेळके आणि माजी आमदार रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. राम कांडगे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले विद्याभूषण पुरस्कार प्राप्त



प्रा.डॉ. शीतल भागवत जाधव यांना कलासाधना या सामाजिक संस्थेद्वारे नवी मुंबई येथे आयोजित कार्यक्रम २०२४ मार्फत गुरुद्रोणाचार्य बेस्ट टीचर अवॉर्ड हा पुरस्कार



मानसशास्त्र या विभागा अंतर्गत एफ.वाय.बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांची मुक्तांगण ह्या व्यसनमुक्ती केंद्रास भेट : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुक्तांगण या व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक मंगेश कारेकर



One Day Workshop Organized in College, Ketan Sathe & Chaitanya Chunnadi from IBM institute of management in association with Pratham Foundation have delivered guest lecture on 04/09/2024



Faculty In charge & Head of the Commerce Dept. Dr. Maruti Kekane Inspiring the Student on 09/10/2024



Prin. Prof. Dr. Madhav Sarode Addressing the Student on 09/10/2024



Head of the commerce department Dr. Maruti Kekane delivering a compelling speech on inauguration



Prin. Dr. Suhas Nimbalkar Sharing Valuable Insights during inauguration



Dr. Pravin Borase Extending heart felt gratitude after the inauguration



Prin. Prof. Dr. Pandurang Bhosale Addressing the Student in inauguration





Head of the Dept. Dr. Maruti Kekane, addressing Parents with insightful remark during the Parent meet on 09/01/2025





On 13/02/2025 Assistant Commissioner of Police Jagdish Satav, Film & Serial actor Sandeep Sakore, and Filmmaker Satish Phuge were inaugurated Trade Fair Program





Department of Commerce P.G. Students Field Visit to Mapro Industry on 17/02/2025



Avishkar Research Project Competition (College Level) 2024 held on 30th Sept. 2024



AIDS Awareness held 4th Dec. 2025



Alumni to College Campus: Alumnae Visit College held on 16th Dec. 2024



Bacteriophage Technology Training held on 6th & 7th Jan. 2025



Microfest - 2025 held on 5th Feb. 2025



Study Visit on PCMC Sewage Treatment Plant in Akurdi held on 02nd April 2025



CBRTI Visit , Pune 10th Jan. 2025



First Prize winner Rangoli - Wildlife week 2024-25



Guest lecture on Snake bite - Facts and Myths



National Bird Day Celebration 2025



Trophy winners - Wildlife week



बोटॅनिकल गार्डन उद्घाटन



बोटॅनिकल गार्डनमध्ये विद्यार्थी सहभाग



मेडिसीनल प्लांट गार्डनमध्ये वनस्पतीशास्त्र विभागाचे शिक्षक आणि विद्यार्थी



मेडिसीनल प्लांट गार्डनमध्ये वनस्पती लागवड करताना विद्यार्थी



विज्ञान केंद्र बारामती येथे अभ्यास सहल



Sugarcane AI Lab , KVK बारामती येथे अभ्यास भेट



मिलेट प्रोसेसिंग सेंटर बारामती येथे अभ्यास भेट



शॉर्ट टर्म एक्झिबिशनमध्ये हर्बल कॉस्मेटिक्स कोर्सचे प्रथम पारितोषिक प्राप्त वनस्पतीशास्त्र विभागाचे सहभागी विद्यार्थी



F.Y.B.Sc. वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची HortiProIndia Horticulture एक्झिबिशन शिवाजीनगर येथे अभ्यास सहल



Participation of students in science day model exhibition 28th Feb 2025.



Participation of T.Y.B.Sc. students in Avishkar Competition with innovative ideas.
(Automatic radar system by using arduino)



Extension activities poster competition
(First prize at inter college level poster competition)



Inter departmental quiz competition



Participation of S.Y.B.Sc. students in short term exhibition with practical knowledge



Celebration of Raman day (Students giving seminar on various scientists by students)



Educational Visit to Nehru science center (Mumbai) For innovative study of astrophysics

प्राचार्यांचे मनोगत



सस्नेह नमस्कार....

सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयाचा वार्षिकांक 'शाल्मली' आज आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. खरे म्हंटले तर महाविद्यालयाचा वार्षिकांक हा महाविद्यालायचा आरसा असतो. वर्षभरात महाविद्यालयाची विविध पातळ्यांवर झालेली घोडदौड आपल्याला वार्षिकांकात पहावयास मिळत असते.

या शैक्षणिक वर्षातच महाविद्यालायाची प्रभारी प्राचार्यपदाची धुरा माझ्याकडे सोपवून संस्थेने माझ्याप्रती जो विश्वास दाखविला आहे त्यासाठी सर्वप्रथम मी रयत शिक्षण संस्थेचे, चेअरमन मा.चंद्रकांत दळवीसाहेब (IAS Retd.), व्हाइस चेअरमन मा.ॲड.भगीरथ शिंदेसाहेब, संघटक मा.डॉ. अनिल पाटीलसाहेब, सचिव मा.विकास देशमुखसाहेब (IAS Retd.), सहसचिव (उच्च शिक्षण) प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळेसाहेब, ऑडिटर प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरेसाहेब आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी यांना मनस्वी धन्यवाद.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचे विविध विभाग आणि समित्यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी अनेक प्रकारचे अभ्यासपूरक आणि अभ्यासेतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी ज्याप्रमाणे अनेक प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात त्याचप्रमाणे महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या गुणवत्ता विकासासाठीदेखील अनेक प्रकारचे कार्यक्रम, सेमिनार, वर्कशॉप, कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अर्थात NEP २०२० च्या नवीन बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात झालेले बदल आणि त्यानुसार विषयांचे, शाखांचा समन्वय साधणे खरे तर एक कसोटीच म्हणावी लागेल. परंतु चालू शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच नवीन अभ्यासक्रमानुसार आणि शाखानुसार सर्व विषय आणि वर्गांचे व्यवस्थित अभ्यासपूर्ण नियोजन करत महाविद्यालयाची संपूर्ण प्राध्यापकांची टीम या नवीन बदलत्या शैक्षणिक धोरणाला यशस्वीपणे सामोरी गेली याचा निश्चितच शाखाप्रमुख म्हणून मला अभिमान वाटतो.

महाविद्यालय आणि UGC यांच्यात समन्वय साधणारा दुवा म्हणजे महाविद्यालयाचा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अर्थात IQAC. हा विभाग म्हणजे महाविद्यालयाचा गाभा म्हणावयास हरकत नाही. महाविद्यालयाच्या IQAC विभागाने या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच बारावी पास होऊन पदवीच्या वर्गांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी 'स्कूल कनेक्ट' या विषयावर NEP २०२० या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये प्रो.डॉ. प्रमोद आंबेकर यांनी विद्यार्थी आणि पालक या दोहोंना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठीदेखील या विभागाने तज्ज्ञ मार्गदर्शकांची

'NEP २०२० अभ्यासक्रम आराखडा आणि त्याचे उपयोजन' या विषयवार कार्यशाळा आयोजित केली होती. महाविद्यालयातील कार्यालयीन सेवकांसाठी ERP SOFTWARE वापरासंबंधीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या विभागाच्या वतीने महाविद्यालायीन प्राध्यापकांसाठी आणि इतर महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी १५ दिवसांच्या FDP कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना किंवा शिक्षण घेऊन पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या संधी मिळाव्यात म्हणून IQAC विभाग आणि प्लेसमेंट सेल विभागाच्या वतीने पिंपरी चिंचवड परिसरातील विविध क्षेत्रातील लघु- उद्योजक कंपन्यांची बैठक महाविद्यालयात आयोजित करण्यात आली. यामधून महाविद्यालयाचा अनेक कंपन्याबरोबर सामंजस्य करार झाला ज्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना भविष्यात विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी आपल्याला महाविद्यालयामार्फत उभ्या करून देता येऊ शकतात.

शिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे ज्ञान संपादन करणे हे तर आहेच पण त्याबरोबरीने संशोधन वृत्ती विकसित व्हावी, नाविन्याचा ध्यास निर्माण व्हावा या उद्देशाने आपला प्राध्यापक वर्ग सतत प्रयत्नशील असतो. विद्यार्थ्यांच्या बरोबरीने आपल्या महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्गदेखील संशोधनात सतत अग्रेसर राहण्याचा प्रयत्न करत असतो. त्याचीच परिणती म्हणजे रशियातील ब्रिक्स वर्ल्ड ऑफ ट्रॅडिशन, पुण्यातील स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्यूट आणि महात्मा फुले महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद 'आधुनिक भारताच्या जडणघडणीत देश आणि विदेशातील व्यक्तिमत्त्वांचे योगदान' या विषयावर आयोजित करण्यात आली होती. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी रशियातील ब्रिक्सचे प्रतिनिधी श्री. व्हिक्टर गोरेल्युक, मॉरीशसवरून डॉ. मधुमती कौन्जुल, श्री. विश्वदीप कौन्जुल, झाम्बियावरून श्री. जी. बी. सोनगावकर हे परदेशी मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधन करणारे विद्यार्थी आणि अनेक मान्यवर या परिषदेला उपस्थित होते. या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेच्या निमित्ताने महाविद्यालयाची एकूण बारा पुस्तके विभागानुसार प्रकाशित झाली हा एक विक्रमच म्हणावा लागेल. या परिषदेच्या निमित्ताने महाविद्यालय आणि संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशझोतात आली ही निश्चितच अभिमानाची बाब आहे असे मला वाटते.

याव्यतिरिक्त महाविद्यालयाची सपोर्ट सिस्टीम म्हणून काम करणारे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग यांचीही वर्षभरातील विविध क्षेत्रातील कामगिरी ही महाविद्यालयाची मान उंचावणारी ठरली आहे. महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांच्या विभागाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विभागीय पातळ्यांवरचे अभ्यासेतर आणि अभ्यासपूरक कार्यक्रम यावर्षी NEP २०२० राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात आले. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागानेदेखील दरवर्षीप्रमाणे आपली यशाची पताका जिल्हास्तर, विद्यापीठ स्तर, राज्यस्तर आणि राष्ट्रीय स्तरावर यशस्वीपणे फडकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचे अनेक तुरे खोवले. सांस्कृतिक विभागाच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन, विद्यापीठस्तरीय, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, नृत्यस्पर्धा, पथनाट्य स्पर्धा इ. प्रकारांमध्ये सहभाग घेऊन यश संपादन केले.

महाविद्यालयाच्या वरिष्ठ विभागाच्या अंतर्गत ३८ शॉर्टटर्म कोर्स आणि कनिष्ठ विभागाच्या अंतर्गत ०६ शॉर्टटर्म कोर्स यशस्वीपणे चालविले जाऊन या कोर्सच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाच्या जोडीने व्यवसायाभिमुख शिक्षण देण्याचे कार्य महाविद्यालयाच्या शॉर्ट टर्म कोर्स विभागाच्या वतीने चालविले जाते. त्याचप्रमाणे

महाविद्यालयाचा सेकंड कॅम्पस, संभाजीनगर, चिंचवड या ठिकाणी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि मास कम्युनिकेशन विभाग आहे. या विभागांचे कार्यदेखील अत्यंत प्रभावीपणे या ठिकाणी चाललेले आहे हे नमूद करताना मला विशेष आनंद होत आहे.

महाविद्यालयाची माजी विद्यार्थी संघटना अतिशय भक्कमपणे महाविद्यालयाच्या पाठीशी उभी आहे. या महाविद्यालयातून शिकून बाहेर पडलेले आणि सध्या अनेक ठिकाणी उच्च पदावर कार्यरत असणारे त्याचप्रमाणे स्वतःचे उद्योगधंदे असणारे अनेक उद्योजक या माजी विद्यार्थी संघटनेचे सक्रीय सभासद असून महाविद्यालयाच्या अनेक कार्यक्रमात त्यांचा सक्रीय सहभाग असतो.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील आणि त्यागमूर्ती रयतमाऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी आखून दिलेल्या मार्गावर बहुजनांच्या, गोरगरिबांच्या, शोषित आणि वंचितांच्या मुला-बाळांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याचे कार्य रयतेच्या या पिंपरीच्या शाखेत अत्यंत प्रभावीपणे चालू आहे हे इथे नमूद करण्यास मला विशेष आनंद होत आहे. काळाच्या बरोबरीने रयतेचा विद्यार्थी या स्पर्धेच्या युगात मागे पडता कामा नये आणि त्यादृष्टीने सध्याच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगात विद्यार्थी तंत्रस्नेही व्हावा, आधुनिक तंत्रज्ञानात पारंगत व्हावा या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा.चंद्रकांत दळवी साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार इंटरॅक्टिव्ह पॅनेल बसविण्यात आले.

सरतेशेवटी या महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने या महाविद्यालयाचा गुणात्मक, संशोधनात्मक आणि भौतिक विकास अधिक चांगला कसा करता येईल यादृष्टीने मी सतत कार्यरत राहील. माझ्या या कार्यात मला रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा.चंद्रकांत दळवीसाहेब (IAS Retd.), व्हाइस चेअरमन मा.ॲड. भगीरथ शिंदेसाहेब, संघटक मा.डॉ. अनिल पाटीलसाहेब, सचिव मा. विकास देशमुखसाहेब (IAS Retd.), सहसचिव (उच्च शिक्षण) प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळेसाहेब, ऑडिटर प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरेसाहेब यांचे बहुमोल मार्गदर्शन तसेच महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व जनरल बॉडी सदस्य, रयत शिक्षण संस्था, मा. संजोगभाऊ वाघेरे पाटील,सदस्य, श्री. शांताराम गराडे, प्रिं.डॉ. हंसराज थोरात, श्री. विशाल मासुळकर, श्री. हनुमंत वाघेरे पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य सतत मिळत असते या सर्वाना मनापासून धन्यवाद.

तसेच महाविद्यालयाचा हा सुंदर वार्षिकांक 'शाल्मली'आपल्या हाती देताना या नियतकालिकाच्या कार्यकारी संपादिका डॉ. वैशाली खेडकर आणि सर्व सहाय्यक संपादक, कला विद्याशाखेच्या उपप्राचार्य प्रो.डॉ. कामायनी सुर्वे, विज्ञान विद्याशाखेच्या उपप्राचार्य प्रो.डॉ. संगीता अहिवळे, वाणिज्य विद्याशाखेचे उपप्राचार्य डॉ. मारुती केकाणे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे (IQAC) चे समन्वयक डॉ. नीलकंठ डहाळे, बी.व्होक., मास कम्युनिकेशन विभागाचे नोडल ऑफिसर आणि रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य डॉ.दत्तात्रय हिंगणे, राष्ट्रीय छात्र सेनेचे लेफ्टनंट प्रा. प्रसाद बाठे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप नन्नावरे, कनिष्ठ विभागाच्या पर्यवेक्षिका प्रा. रुपाली जाधव, कार्यालयीन प्रमुख सौ. रत्नप्रभा नाईक, श्री.नवनाथ शेवाळे, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच या नियतकालिका-साठी सुंदर लेखन करणारे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक यांचे मोलाचे सहकार्य लाभले, या सर्वांचे मनापासून कौतुक.

धन्यवाद !!

– प्रोफेसर (डॉ.) पांडुरंग भोसले

संपादकाचे मनोगत



विद्येचे मंदिर असलेले महाविद्यालय म्हणजे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे ठिकाण नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची, विचारांना दिशा देण्याची आणि जीवनमूल्ये रुजविण्याची एक सर्जनशील कार्यशाळा असते. 'शाल्मली' महाविद्यालयाचा वार्षिक अंक ही अशाच सर्जनशीलतेची, कर्तृत्वाची आणि वैचारिक समृद्धीची साक्ष देणारी अभिव्यक्ती आहे.

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही केवळ तंत्रज्ञानाची संकल्पना न राहता मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. शिक्षण, संशोधन आणि नवसर्जनाच्या क्षेत्रात AI मुळे ज्ञानाची नवी दालने उघडली आहेत. मात्र तंत्रज्ञानासोबत मानवी मूल्ये, विवेक आणि नैतिकता जपणे ही काळाची गरज आहे. शाल्मली महाविद्यालयाचा हा वार्षिक अंक 'AI सह मानवी संवेदनशीलतेचा समतोल' या विचाराचे प्रतीक आहे.

शाल्मली अंक विभागीय संपादक डॉ. नीलकंठ ठहाळे (इंग्रजी), प्रो. डॉ. कामायनी सुर्वे (हिंदी) आणि प्रा. संग्राम गोसावी (मराठी) यांनी आपापल्या विभागांची जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडली. प्रो.डॉ. दत्तात्रय हिंगणे , प्रा. अविनाश शेळके,डॉ.तृप्ती अम्ब्रे, प्रा. स्वप्ना हजारे, डॉ. सोनल बावकर, प्रा. दत्तात्रय बिडबाग, सौ. रत्नप्रभा नाईक, श्री. नवनाथ शेवाळे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर सहकारी आपणा सर्वांच्या नवनवीन कल्पना आणि बहुमोल सहकार्यामुळेच 'शाल्मली' अंक अधिक नीटनेटका बनला त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार

या वार्षिक अंकामध्ये विद्यार्थ्यांचे साहित्यिक लेखन, कविता, कथा, संशोधनात्मक विचार, कला, क्रीडा आणि सहशैक्षणिक उपक्रमांचे प्रतिबिंब उमटले आहे. प्रत्येक लेखामागे विद्यार्थ्यांची मेहनत, विचारांची खोली आणि अभिव्यक्तीची ओढ दिसून येते. हे लेखन केवळ शब्दांचे संकलन नसून तरुण पिढीच्या आशा, स्वप्ने आणि प्रश्नांचे प्रतिबिंब आहे.

हा वार्षिक अंक वाचकांसाठी प्रेरणादायी ठरेल, विचारप्रवर्तक ठरेल आणि नव्या पिढीला सर्जनशीलतेकडे प्रवृत्त करेल अशी आम्हांला खात्री आहे. सर्व लेखक, संपादक मंडळ, मार्गदर्शक शिक्षक आणि या उपक्रमासाठी परिश्रम घेणाऱ्या प्रत्येक घटकाचे मनःपूर्वक अभिनंदन. अंक सुंदर, सुबक व आकर्षक होण्यासाठी परिश्रम घेतलेले प्रकाशक श्री. संतोष तोरणमल यांचेही मनापासून आभार.

विद्या, विवेक आणि मूल्ये यांचा संगम म्हणजेच 'शाल्मली' हीच आमची ओळख आणि हीच आमची दिशा आहे.

डॉ. वैशाली खेडकर

मराठी विभाग



या नभाने
या भुईला
दान द्यावे
आणि या मातीतुनी
चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी
आली फळाला
जोंधळ्याला चांदणे
लगडून जावे.
- ना. धों. महानोर

विभागीय संपादक
प्रा. संग्राम गोसावी

अनुक्रमणिका

• **कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य**	*ममता माने, एम.ए.भाग २ (इतिहास)*	०७
• **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ**	*मेघा माने, एम.ए. भाग – २ (इतिहास)*	१०
• **पंडित कवी : मोरोपंत**	*राम घोडके, टी.वाय.बी.ए. (मराठी)*	१२
• **वडिलांची माया**	*रोहित खैरनार, एस.वाय.बी.ए. (अर्थशास्त्र)*	१३
• **वैश्विक मूल्यांची जाणीव करून देणारे संत : संत बसवेश्वर**	*प्रा. संग्राम गोसावी*	१४
• **मी तुझ्याचसाठी लिहिते....**	*कु. प्रियांका मुरुडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)*	१८
• **सखी...**	*कु. सलोनी घाडगे, एस.वाय.बी.एस्सी.*	१८
• **निसर्ग मानवाचा सोबती**	*कु. गायत्री मांडेकर, एम.ए. भाग – १ (भूगोल)*	१९
• **कर्मवीर भाऊराव पाटील : जीवन आणि कार्य**	*सौ. करुणा ढवळे (मसुरे), एम.लिब ॲण्ड एल.एस्सी.*	२०
• **'मेजर ध्यानचंद' यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान**	*डॉ. लोहोटे पी. के., शारीरिक शिक्षण संचालक*	२२
• **तूच आहेस तुझ्या जीवनाचा सार...**	*कु.संध्या शिंदे, टी.वाय.बी.ए.(इंग्रजी)*	२४
• **अनिश्चिततेच्या जगातील अस्वस्थ वाटचाल**	*डॉ. अमोल वीर, सहाय्यक प्राध्यापक*	२५
• **स्वप्नभेट**	*शेजल शिंदे, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)*	२७
• **अल्बर्ट एलिस**	*डॉ. शितल जाधव*	२८
• **काहीतरी तिच्यावर ....**	*कु. श्वेता चिमटे, एस.वाय.बी.एस्सी.*	२९
• **वाचनसंस्कृती रुजविण्यात ग्रंथालयाची भूमिका**	*डॉ. तृप्ती अंब्रे (ग्रंथपाल)*	३०
• **जाणवले मज पहाट झाली...**	*प्रियांका मुरुडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)*	३३
• **भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन**	*श्री. संतोष बोभाटे, सहाय्यक ग्रंथपाल*	३४
• **विविधतेतील एकता**	*अनुराधा बोधक, MA/MSC ग्रंथालय विभाग*	३६
• **मन माझं इथंच चुकतं .....**	*कु. प्राजक्ता सुतार, एफ.वाय.बी.एस्सी.*	३७
• **मैत्री**	*कु. शेजल शिंदे , टी.वाय.बी.ए.(इंग्रजी)*	३७
• **स्मार्टफोन : वरदान की शाप ?**	*सौ. करुणा ढवळे (मसुरे), M. Lib & L.Sc.*	३८
• **आयुष्याचा टर्निंग पॉईंट : (राष्ट्रीय सेवा योजना)**	*प्रेरणा कांबळे, एफ.वाय.बी.एस्सी.*	४१
• **मी स्वप्नांच्या जगात राहतो...**	*प्रियांका सुरडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)*	४२
• **सोहळे आयुष्याचे ...**	*मेघा माने, एम.ए. भाग २ (इतिहास)*	४२
• **आजचा तरुण आणि सोशल मीडिया**	*श्रृतिका कांबळे, टी.वाय.बी.एस्सी.*	४३
• **शिक्षणाची चाहूल लागली ...**	*कु. अंजली रोकडे, एस.वाय.बी.बी.ए.(सी.ए.)*	४४
• **बदलते जीवन आणि मोबाईल**	*खेता चिमटे, एस.वाय.बी.एस्सी.*	४५
• **मराठी भाषेची थोरवी**	*आश्विनी वाघ, एम.ए. २ (मराठी विभाग)*	४६
• **मैत्री आणि प्रेम**	*ममता माने, एम.ए.भाग २ (इतिहास)*	४७
• **रजनी**	*कु. भावना ढवळे, एस.वाय.बी.ए.(इंग्रजी)*	४७
• **रंग भक्ती प्रेमाचा....**	*कु. श्रद्धा वाढिले, एम.कॉम.(भाग १)*	४८
• **अंतर**	*कु. शेजल शिंदे, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)*	४८
• **आसवांची हाक ...**	*तेजस पवार, एम.एस्सी. (भाग १)*	४९
• **अतिविचार**	*कु.शेजल शिंदे, टी.वाय.बी.ए.(इंग्रजी)*	४९
• **मार्ग सत्याचा !!**	*संस्कृती अळणे, एफ.वाय.बी.व्होक.*	५०
• **शोधत होतो अंधारात मी सूर्याचा प्रकाश ....**	*कु. प्रियांका सुरडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)*	५१
• **वसुदेवाचा विसर ....**	*तुषार वाजे, (अर्थशास्त्र विभाग)*	५१
• **'बेरोजगारी आणि बदलती पिढी'**	अमिन मुल्ला, टी.वाय.बी.कॉम.	५२
• **गोष्ट विज्ञान गावाची ....**	*कु. अश्विनी चिमणे, एम.एस्सी. भाग १ (मायक्रो.)*	५२

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य

– **माने ममता सुरेश**, एम.ए.भाग २ (इतिहास)

२२ सप्टेंबर १८८७ साली पायगोंडा देवगोंडा पाटील व गंगाबाई यांना पुत्रप्राप्ती झाली म्हणजे एका तळपत्या सूर्याचा जन्म झाला आणि तो सूर्य म्हणजे कर्मवीर भाऊराव पायगोंडा पाटील. इतिहास घडवणारा, इतिहासाला योग्य दिशा दाखविणारा आणि इतिहास अजरामर करणारा.

कर्मवीरांचे वडील म्हणजे पायगोंडा पाटील. पायगोंडा पाटील अतिशय कष्टाळू होते त्यांच्यापाशी जबर चिकाटीही होती ते कमालीचे स्वाभिमानी होते. आपण कोणीतरी मोठे व्हावे अशी पायगोंडा पाटील यांना महत्वाकांक्षा नव्हती. आपल्या साध्या राहणीवर ते समाधानी असत. स्वीकारलेले काम प्रामाणिकपणे करावे आणि आपल्या मर्यादित उत्पन्नामध्ये मुलांना काही कमी पडणार नाही हे पाहावे अशी त्यांची वृत्ती असे. त्याचप्रमाणे कर्मवीरांच्या आई गंगाबाई पाटील त्याही मायाळू, प्रेमळ पण फटकळ होत्या. त्यांनी कर्मवीरांबरोबर त्यांचे तीन भाऊ आणि दोन बहिणी यांच्यावर चांगले संस्कार केले होते.

कर्मवीरांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या वडिलांची सरकारी नोकरीच्या निमित्ताने ज्या खेडेगावात व गावात बदली होत असे तेथे झाले. कर्मवीरांना सुदृढ शरीरप्रकृती लाभलेली असल्यामुळे व्यायामाची आवड होती. ते डबलबार, सिंगलबार, मलखांब करत असत. कर्मवीरांचे अभ्यासाकडे म्हणावे असे लक्ष नसले तरी विद्यार्थ्यांचे पुढारीपण मात्र त्यांच्याकडे आलेले होते. जैन वसतिगृहातील आणि राजाराम हायस्कूलमधील विद्यार्थी त्यांना मानत असत. पुस्तकी शिक्षणाच्या बाबतीत फारशी प्रगती न करणारा हा विद्यार्थी शिक्षकांना दुसऱ्या एका कारणासाठी आवडायचा, शारीरिक कष्टाचे कोणतेही काम करायची कर्मवीरांची नेहमीच तयारी असायची. अण्णांनी सुरु केलेले शिक्षण हे गोर-गरिबांच्या शिक्षणाची गंगोत्री ठरली. दीन-दलितांना शिक्षणाचा लाभ व्हावा, लोकांचे कल्याण व्हावे, समाजामध्ये एकता/समता निर्माण व्हावी, देशाची समृद्धी व्हावी या आणि अशा अनेक महत्त्वपूर्ण व चांगल्या उद्देशांनी अण्णांनी शिक्षण द्यायला सुरुवात केली. एक आदर्शवादी आणि मायाळू होते. आजू-बाजूला पदोपदी दिसणारा अन्याय, दैन्य पाहून ते व्यथित व्हायचे. दीन-दलितांचे दारिद्र संपावे, त्यांचे जीवन सुधारावे हाच त्यांच्या आयुष्यभराचा उद्योग होता. सुरुवातीला अण्णांनी अस्पृश्यांसाठी कार्य करण्यास सुरुवात केली परंतु जसजसा कार्यविस्तार होऊ लागला तसतसे सर्व ग्रामीण भागातील गरीब जाति-जमातींना अण्णांनी आपले मानून जवळ केले.

२० व्या शतकाच्या प्रारंभी ०४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले, ता. कराड या ठिकाणी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि खऱ्या अर्थाने शेकडो वर्षे अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडणाऱ्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश अनुभवावयास मिळाला. त्या काळात बालविवाहाच्या विरुद्ध. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मांडलेले विचार क्रांतिकारीक समजले जात असत. अण्णांनी इतर समाजसुधारकांप्रमाणे आपले ध्येय

ठरवले आणि त्याप्रमाणे कृती करण्यास सुरुवात केली.

एका बाजूला १९ व्या शतकातील समाजसुधारकांचे प्रयत्न शासनाने केलल्या अन्यायकारक रूढी व प्रथांचे निर्मूलन करणारे कायदे आणि स्त्री शिक्षणाचा प्रसार यांमुळे महाराष्ट्रातील महिला वर्गात जागृती निर्माण होत होती आणि दुसऱ्या बाजूला दीन-दलितांवर अन्याय होण्याचे प्रमाण वाढत होते, त्यांचे अपरिमित शोषण केले जात होते. अण्णांना कळून चुकले होते की, दीन-दलितांवर होणारे अन्याय आणि त्यांचे शोषण थांबवायचे असेल तर शिक्षण हा एकमेव मार्ग आहे.

कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व जातिधर्माच्या मुलांसाठी त्यांनी एकाच वसतिगृहाची स्थापना केली. शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात सर्व जातिधर्मातील गोरगरीब मुलांना शिक्षण मिळावे यासाठी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना केली. कर्मवीरांनी शाहू महाराज यांच्याकडून शैक्षणिक प्रेरणा घेऊन शिक्षण द्यायला सुरुवात केली आणि सर्व जातिधर्मातील गोर-गरीब मुलांसाठी एकाच वसतिगृहाची स्थापना करून आपल्या गुरुपेक्षा एक पाऊल पुढे टाकले आणि खऱ्या अर्थाने समताधिष्ठित समाज व्यवस्थेची स्थापना केली.

कर्मवीरांच्या कार्याचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शिक्षणाला श्रमाची जोड देऊन "कमवा आणि शिका" ही योजना कार्यान्वित केली. आज या योजनेला जागतिक मान्यता प्राप्त झाली आहे.

इतरांची निरपेक्ष सेवा करणे हे भाऊरावांचे ब्रीद होते. कर्मवीर नेहमी त्यांच्या सहकार्याना सांगत असत की, माझ्या कामात कोणी हस्तक्षेप केला तर मला ते सहन होत नाही मी त्या माणसाला तसा सोडत नाही.

भारतात असंख्य जाती, उपजाती आणि पंथ असून एका जातीतील माणूस दुसऱ्या जातीतील माणसासमवेत भोजन करायला तयार नसायचा. हा एक प्रकारचा नियमच होता. परंतु कर्मवीरांनी त्यांच्या दुसऱ्या जातीतील मित्रासोबत मांडीला मांडी लावून जेवण करून या प्रथेला विरोध केला. एकदा तर कर्मवीरांनी एक धाडसी पाऊल उचलले होते. ज्ञानदेव घोलप या दलित मुलाला जवळ केले. अस्पृश्य जातींमधील मुलांसाठी कोल्हापूर येथे लवकरच एका वसतिगृह सुरू होत असल्याची बातमी कर्मवीरांनी घोलप यांना सांगितली. इतकेच नव्हे तर त्याला आपल्याबरोबर कोल्हापूरला घेऊन जायला तयार झाले. घरून निघण्यापूर्वी कर्मवीरांनी त्यांच्या आईला सांगितले याला आत स्वयंपाक घरात जेवायला घाल. अस्पृश्य माणसांना तेथे प्रवेश मिळणे अशक्य होते परंतु आपल्या मुलाचा मित्र कोणत्या जातीचा आहे हे कर्मवीरांच्या आईला माहिती नव्हते. जेवण झाल्यावर आईला त्या मुलाची जात कळली तेव्हा त्यांनी कर्मवीरांना या घोर अपराधाबद्दल बदडून काढले. गंगाबाई या सर्व प्रथांना मानत होत्या.

घोलप हा स्वतःला कर्मवीरांचा पहिला विद्यार्थी समजत असे. घोलप यांनी मुकनायक हे साप्ताहिक काही काळ चालविले. नंतर सरकारने त्यांची विधानसभेवर नियुक्ती केली हा मान मिळविणारे हरिजन समाजातील पहिले कार्यकर्ते होते.

त्यांनी पुढे हरिजनांसाठी बरेच महत्त्वपूर्ण चांगली कामे केली.यावरून लक्षात येते की, कर्मवीरांची निवड एकदम बरोबर होती. ते माणसं ओळखण्यास चुकत नव्हते आणि त्यांनी जोडलेली माणसे ही त्यांच्यावर जीवापाड प्रेम करत असत.

गाडगेबाबा यांनी विठ्ठलाच्या भक्तांशी केलेला संवाद -

गाडगेबाबा : देव पाहिला का देव ? ?

भक्त : (मनातल्या मनात हा माणूस आम्ही पंढरपूरला पंढरीच्या राजाच्या दर्शनाला आलोय तरीही विचारतोय)
हो पाहिला.

गाडगेबाबा : अरे वा कमाल आहे. तुमचा देव कुठे राहतो ?

भक्त : आमचा देव देवळात राहतो, तो रंगाने सावळा आहे, विठेवर उभा आहे, कंबरेवर हात ठेवून, त्याच्या बाजूला रखुमाई आहे.

गाडगेबाबा : कमाल आहे तुमचा देव देवळात राहतो माझा देव माझ्या मनात राहतो.
तुमचा देव अंघोळ करतो का ?

भक्त : करतो तर.

गाडगेबाबा : देवाला अंघोळ कोण घालतं ?
भक्त : आम्हीच घालतो जी.
गाडगेबाबा : अरे तुमच्या देवाला स्वतःची अंघोळ स्वतःला करता येत नाही तो काय तुम्हांला तुमच्या भाग्याची अंघोळ घालणार ?
तुमचा देव धोतर नेसतो का ?
भक्त : नेसतो तर.
गाडगेबाबा : तुमच्या देवाला धोतर कोण नेसवते ?
भक्त : आम्हीच नेसवतो जी.
गाडगेबाबा : अरे तुमच्या देवाला स्वतःचे धोतर स्वतःला नेसता येत नाही तो तुम्हांला तुमच्या भाग्याचे वस्त्र काय देणार ? तुमच्या देवाला नैवेद्य दाखवते का नाही ?
भक्त : हो दाखवतो.
गाडगेबाबा : नैवेद्य दाखवून काय करता ?
भक्त : नैवेद्याच्या बाजूला काठी घेऊन बसतो.
गाडगेबाबा : का कशाला ?
भक्त : देवाचे नैवेद्य कावळ्याने, कुत्र्याने खाऊ नये म्हणून. त्यांना हाकायला.
गाडगेबाबा : अरे जे तुमच्या देवाला स्वतःला स्वतःच्या वाढलेल्या नैवेद्याची रक्षा करता येत नाही तो तुमच्या आयुष्याचे रक्षण काय करणार ?
जिवंत देव कोणी पाहिला आहे का ?
गाडगेबाबा : अरे हे भाऊराव पाटील बघा महार, मांगाच्या पोरांना शिकविण्याचे काम करतो त्याला देव म्हणा, ते गांधीबाबा बघा ते देशासाठी मर-मर मरते त्याला देव म्हणा. अडाणी लोकांना शिक्षण द्यावे, बेघराला घर द्यावे, रंजल्या-गांजल्यांची सेवा करावी, मुक्या प्राण्यावर दया करावी, बापहो देव यांच्यात राहतो देव देवळात राहत नाही. देव आपल्यात राहतो, देवळात फक्त पुजाऱ्याचे पोट राहते.

कर्मवीरांच्या पाठीशी त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई ठामपणे उभ्या होत्या. त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी जे काही केले आहे ते अमूल्य आणि हेवा वाटावा असे केले आहे. लक्ष्मीबाईंनी दीन-दलित मुलांना आपल्या मुलांप्रमाणे मानून जीव लावला. त्यांना मायेची सावली दिली. कर्मवीरांचे कार्य जेवढे महत्त्वपूर्ण आहे तेवढेच महत्त्वपूर्ण लक्ष्मीबाई यांचेही आहे. म्हणूनच त्यांना आज रयत माऊली म्हणून ओळखले जाते.

कर्मवीरांनी सुरू केलेल्या शिक्षणसंस्थेचे अनेक थोर समाजसुधारकांनी कौतुक केले, त्यांनी चालू केलेल्या महाविद्यालयाला भेटी दिल्या.

कर्मवीर अण्णांनी सुरू केलेली शिक्षणसंस्था आज आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षणसंस्था म्हणून ओळखली जाते. रयत शिक्षण संस्थेत आज असंख्य विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. या संस्थेत शिकलेले विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, राजकारणी, पोलीस खाते अशा अनेक विभागात कार्यरत आहेत. रयत शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना फक्त शिकवले जात नाही, तर त्यांच्यावर चांगले संस्कार करून त्यांना चांगला माणूस घडवला जातो. मोठ-मोठ्या पदावर गेल्यावरही रयतचे विद्यार्थी कर्मवीरांना, रयत शिक्षण संस्थेला विसरून जात नाहीत तर संस्थेसाठी काही तरी करून दाखवतात. यावरून लक्षात येते की, कर्मवीरांनी खरंच गोर-गरिबांच्या मुलांना शिकवून शहाणं केले आहे.

९ मे १९५९ रोजी कर्मवीरांचे निधन झाले. मरणोत्तर कर्मवीरांना भारतातील महत्त्वपूर्ण पद्मभूषण पुरस्कार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करून अभिवादन करण्यात आले.

रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे...
(रयत गीत)

पती रयतेचा वाली सती रयत माऊली
सरस्वतीला भेटाया जणू लक्ष्मी धावली
भेद विसरूनी सारे बने सर्वांची सावली
वावरली जन्मभरी छाया पतीची बनून
अरे आभाळाएवढे हिला कुणी दिले मन ?
(रयत माऊली गीत)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ

– माने मेघा सुरेश, एम.ए. भाग – २ (इतिहास)

प्रस्तावना :

भारतीय समाज इतिहासात विशेषतः जातिवादाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहभाग आणि त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. डॉ. आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य दलित समाजाच्या अधिकारांसाठी संघर्षाचे एक प्रतीक बनले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली दलित चळवळीने समाजातील अस्पृश्यता, असमानता आणि भेदभावाविरोधात लढा दिला आणि समाजातील सर्व घटकांना समान हक्क मिळवून दिले. डॉ. आंबेडकर यांची चळवळ केवळ दलित समुदायासाठी नाही, तर संपूर्ण भारतीय समाजासाठी परिवर्तनाचे एक महत्त्वाचे पाऊल ठरली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रारंभिक जीवन आणि शिक्षण :

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू, मध्य प्रदेश येथे एका दलित कुटुंबात झाला. त्यांचे कुटुंब अत्यंत दारिद्र्याच्या परिस्थितीत होते आणि त्यांना समाजातील इतरांच्या तुलनेत खूप कमी संधी मिळत होत्या. डॉ. आंबेडकर यांचे बालपण जातिवादाच्या भयंकर अनुभवाने भिजले होते. शाळेतून आणि घराच्या बाहेर जाऊन, त्यांना असमानतेची आणि अस्पृश्यतेची चांगलीच जाणीव झाली.

त्यांचे शिक्षण अत्यंत कठोर परिस्थितीत झाले. मात्र, त्यांनी यशस्वीपणे बी.ए., एम.ए., एलएल.बी. आणि पीएच्.डी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. यावेळी त्यांनी समाजातील अन्यायकारक व्यवस्थेचा सखोल अभ्यास केला आणि समजले की, भारतीय समाजात असलेली जातिवादाची आणि अस्पृश्यतेची शृंखलाच समग्र समाजाच्या प्रगतीसाठी अडथळा आहे. यावर त्यांनी आवाज ऊठवला आणि समाजात बदल घडवण्याचा प्रयत्न केला.

डॉ. आंबेडकर यांचा दलित चळवळीतील प्रवेश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दलित चळवळ त्यांच्या जीवनाचे एक महत्त्वाचे अंग ठरली. त्यांनी दलित समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष करत, समाजात असलेल्या असमानतेविरुद्ध लढा दिला. डॉ. आंबेडकर यांचा प्रमुख उद्देश दलित समाजाला त्यांचा मान आणि अधिकार मिळवून देणे हा होता. ते केवळ एक शासक व धोरणकार असण्यापेक्षा एक समाजसुधारक म्हणून कार्यरत होते.

डॉ. आंबेडकर यांनी १९२७ मध्ये 'चवदार तळे सत्याग्रह' केला, ज्यामध्ये त्यांचा उद्देश हिंदू धर्मातील अस्पृश्यतेचा विरोध करणे आणि दलितांना सार्वजनिक जलतळ्यांचा उपयोग करण्याचा अधिकार मिळवून देणे हा होता. त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली 'वर्धा कायदा' आणि 'संविधान सभा' मध्ये दलित समाजाच्या हक्कांसाठी अनेक कायदे बनवून दिले.

डॉ. आंबेडकर यांनी आपल्या जीवनात हिंदू धर्माच्या

अनेक भेदभावात्मक बाबींचा विरोध केला. त्यांनी अस्पृश्यता आणि जातिवादाच्या विरोधात खुलेपणाने 'हिंदू धर्म बदलण्याचा' मुद्दा मांडला. त्यांचे विचार बदलले आणि त्यांनी हिंदू धर्मातून बाहेर पडून बौद्ध धर्म स्वीकारला. १९५६ मध्ये लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि हा त्यांचा एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी निर्णय होता. त्यांच्या या निर्णयामुळे दलित समाजाला नवा मार्ग मिळाला आणि त्यांना हिंदू धर्मात असलेल्या असमानतेपासून मुक्तता मिळाली. डॉ. आंबेडकर यांच्या बौद्ध धर्माच्या स्वीकृतीच्या निर्णयामुळे भारतीय समाजात एक नवीन अध्याय सुरू झाला.

डॉ. आंबेडकर यांचे संविधान निर्मितीत योगदान :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वात मोठे योगदान भारतीय संविधानाच्या निर्मितीत आहे. भारतीय संविधानात त्यांनी दलित, आदिवासी आणि महिलांसाठी विशेष अधिकारांची तरतूद केली. संविधानाने समानता, स्वतंत्रता, बंधुता यांना प्राधान्य दिले.

डॉ. आंबेडकर यांनी भारतीय समाजाला 'समानता' आणि 'समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान हक्क' देणारे संविधान दिले. संविधानामुळे दलित समाजाला शिक्षण, रोजगार, मतदान आणि सशक्तीकरणाच्या मार्गाने पुढे जाण्याची संधी मिळाली.

डॉ. आंबेडकर यांचा संघर्ष आणि सामाजिक चळवळ :

डॉ. आंबेडकर यांचा दलित चळवळीतील संघर्ष केवळ शासकीय सुधारणा करण्यासाठी नव्हे, तर समाजाच्या मानसिकतेला बदलण्यासाठी होता. ते समजले होते की, केवळ कायद्याच्या माध्यमातून समाजातील अस्पृश्यता दूर होऊ शकत नाही. समाजाची मानसिकता बदलली पाहिजे. त्यामुळे त्यांनी अनेक शाळांमध्ये, सभांमध्ये, कार्यशाळांमध्ये आणि चळवळीत जागरूकता निर्माण केली.

डॉ. आंबेडकर यांचा विश्वास होता की, समाजात बदल घडवण्यासाठी केवळ कायद्याच्या दृष्टिकोनातून काम करणे पुरेसे नाही. बदल हे प्रत्येक व्यक्तीच्या मनाच्या स्तरावर घडले पाहिजेत. त्यांनी 'शिक्षण' आणि 'समानता' या दोन गोष्टींवर भर दिला. त्यांचा विश्वास होता की, जेव्हा वंचित वर्ग शिक्षित होईल, तेव्हा त्यांना समाजातील इतर वर्गाशी समान अधिकार मिळवता येतील.

डॉ. आंबेडकर आणि दलित समाज :

डॉ. आंबेडकर यांची दलित समाजासाठी भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण होती. त्यांच्या कार्यामुळे दलित समाजात आत्मनिर्भरतेचा विचार आला आणि त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा मिळाली. डॉ. आंबेडकर यांचे कार्य केवळ एक तात्कालिक चळवळ नव्हे, तर ते एक दीर्घकालीन परिवर्तनाची सुरुवात होती.

डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीमुळे दलित समाजात 'आत्मसन्मान' आणि 'आत्मविश्वासाची' भावना जागृत झाली. त्यांनी दलित समाजाला शारीरिक, मानसिक आणि सामाजिक गुलामीपासून मुक्त केले. त्यांच्या संघर्षामुळे आज दलित समाज शाळेत जात आहे, प्रशासनात आहे आणि त्यांना आपल्या हक्कांसाठी लढता येते.

निष्कर्ष :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दलित चळवळीतील संघर्ष आणि त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्यामुळे भारतीय समाजात असलेल्या जातिवादाचा विरोध होऊ शकला आणि दलित समाजाच्या जीवनात परिवर्तन घडवून दिले. डॉ. आंबेडकर यांचा संघर्ष आजही प्रेरणादायक आहे आणि त्यांनी दिलेल्या विचारांनी भारतीय समाजाच्या मानसिकतेला जागृत केले.

त्यांच्या जीवनाच्या कार्यामुळे, त्यांची सामाजिक सुधारणा आणि दलित चळवळ केवळ आजच्या काळासाठी नाही, तर भविष्यकाळातील समाजासाठी एक नवा मार्ग दाखवणारी ठरली आहे.

संदर्भ –Google Wikipedia,
२० व्या शतकातील महाराष्ट्रातील दलित चळवळ.

पंडित कवी : मोरोपंत

– **राम विठ्ठल घोडके**, टी.वाय.बी.ए. (मराठी)

मोरेश्वर रामचंद्र पराडकर अर्थात कवी मोरोपंत यांचा जन्म कोल्हापूरजवळील पन्हाळगडावर झाला. कवी मोरोपंत हे मध्ययुगीन कालखंडातील पंडिती काव्यपरंपरेतील श्रेष्ठ कवी म्हणून ज्ञात आहेत. कवी मोरोपंत हे मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर पंडित या पंडित कवींच्या समकालीन कवी आहेत.

पराडकर कुटुंब हे कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंब मुळचे कोकणातील सौंदळया गावचे होय. मोरोपंतांचे पणजे रामजीपंत हे नोकरीच्या निमित्ताने कोकणातून पन्हाळगडावर येऊन राहिले. रामजीपंतांचे नातू रामचंद्रपंत हे कवी मोरोपंतांचे वडील.ते कोल्हापूरच्या छत्रपतींच्या पदरी नोकरीस होते. कवी मोरोपंतांचे सर्व बालपण पन्हाळगडावरच गेले. तेथेच त्यांचा विद्याभ्यासही झाला. पन्हाळगडावरील केशव पाध्ये आणि गणेश पाध्ये या दोन वेदशास्त्रपारंगत विद्वान बंधूंकडे मोरोपंतानी न्याय, व्याकरण, धर्मशास्त्र, वेदान्त व साहित्य या विषयांचे अध्ययन केले. वयाच्या २४ व्या वर्षापर्यंत मोरोपंतांचे पन्हाळगडावर वास्तव्य होते.मोरोपंतांचे वडील इ.स. १७५२ च्या सुमारास पन्हाळगडावरून बारामतीस गेले. पुढे मोरोपंतही वडिलांना भेटण्यासाठी म्हणून बारामतीस गेले व कायमचे बारामतीस वास्तव्यास राहिले. पन्हाळगडावरील वास्तव्यात थोडीफार काव्यनिर्मिती सोडली तर मोरोपंतांचे सर्व लेखन बारामतीत झाले. सुमारे ४५ वर्षे अखंडितपणे काव्यरचना करणाऱ्या मोरोपंतानी ७५ हजाराच्यावर कविता लिहिल्या. त्यांच्या नावावर २६८ काव्यकृतींची नोंद आहे. त्यांनी सुमारे ६०हजार आर्या, श्लोकबद्ध स्तोत्रे, आख्याने व महिलांसाठी ओवीबद्ध गीते लिहिली; तसेच १०८ रामायणे रचली. मोरोपंतांनी त्यांच्या चार गुरूंचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात, 'गुरु माझे श्रीराम, श्रीमत्केशव, गणेश, हरि चवघे.' हरी म्हणजे पंतांचे मौजीबंधन करणारे त्यांचे सौंदळचे कुलोपाध्याय हरभट वरेकर. श्रीराम म्हणजे वडील रामजीपंत. गोळवलकर घराण्यातील केशव पाध्ये व गणेश पाध्ये हे दोघे बंधू अशा चार गुरूंचा उल्लेख मोरोपंतांनी केला आहे.

मोरोपंत हे बारामतीच्या बाबूजी नाईकांचे आश्रित पुराणिक होते. पुराणिकांच्या भूमिकेचा प्रभाव त्यांच्या काव्यरचनेवर पडला आहे. मोरोपंतांच्या एकूण कविता पाऊण लाख आहेत. रामायण, महाभारत आणि भागवत हे मोरोपंतांच्या काव्याचे महत्त्वाचे आधार असून जैमिनी, अश्वमेध, स्कंधपुराण, मार्कंडेयपुराण, हरिवंश इ.च्या आधारे त्यांनी काही प्रकरणे रचली आहेत. ईश्वराचे गुणसंकीर्तन करून स्मरणभक्ती करावी ही प्रेरणा पंतांच्या काव्यरचनेमागे आहे. पंतांच्या काव्यरचनेत इतर पंडित कवींपेक्षा भक्तीप्रवणता अधिक आहे. मराठी साहित्यात विपुल रचना करून कवी मोरोपंतांनी मराठी संस्कृतीला साहित्याच्या तोडीचे स्थान मिळवून दिले. कथा विस्ताराने सांगून, इतर भाग वगळून ग्रंथ साक्षेपाने लिहिण्याच्या पद्धती

वरून आणि पंतांच्या एकूण ग्रंथरचनेवरून त्यांची विशालबुद्धी, दांडगा व्यासंग, चौकसपणा, परमेश्वराच्या कृपेबद्दल तळमळ, पांडित्य, रचनाकौशल्य, भागवत गायनाची आवड इ. गोष्टी दिसून येतात. वर्ण्यविषयाशी तादात्म्य पावून लिहिलेल्या त्यांच्या काव्यात प्रसन्नता, माधुर्य आणि वाणीचा सहज ओघ दिसून येतो. ओजगुण उत्कटत्वाने दिसतो, संवादात ते रंगतात, त्यात ते रमतात, त्यामुळे त्यांचे संवाद जिवंत वाटतात.

यमकाव्यसन, सालंकृतता, संस्कृत शब्दभरणा, शब्दचमत्कृती, उत्कट भावनेचा व प्रतिभेचा अभाव, कला विलासापेक्षा धर्म विवेचानाकडे लक्ष इ.गुणदोष पंतांच्या काव्यात आढळतात. मोरोपंतांच्या श्लोक-केकावलीत भावपूर्ण भक्ती आणि अलंकारपूर्ण काव्य या दोन्ही गोष्टींचा समन्वय त्यांनी चांगला साधला आहे.

मोरोपंत हे निर्वेध आयुष्यक्रम कंठणारे, शांत वृत्तीचे, धर्मनिष्ठ, कुटुंबवत्सल, कर्तव्यदक्ष आणि व्यवहारचतुर असे गृहस्थ होते. ठराविक चाकोरीतून त्यांचा जीवनक्रम गेल्याने त्यांच्या वृत्तीत खळबळ, प्रक्षोभ किंवा झगडा असे काही नाही. त्यामुळे त्यांची कविताही गंभीर व नेमस्त वृत्तीची आहे. त्यावरून त्यांची रसिकता, व्यासंग व भाषाप्रभुत्व यांची साक्ष पटते. पण अलौकिक प्रतिभेचे, उत्कट भावनांचे किंवा भव्य कल्पनांचे दर्शन त्यांच्या काव्यरचनेमध्ये होत नाही. तसेच तत्कालीन राजकीय घडामोडींचा व सामाजिक वातावरणाचा यत्किंचितही संपर्क त्यांच्या काव्याला लागलेला दिसत नाही. याचा अर्थ हा की, उत्तर पेशवाईतील धामधुमीच्या काळात राहूनही मोरोपंत, निरंजन माधव यांसारखी मंडळी मनाने रामायण, महाभारताच्या जगातच वावरत होती. त्यामुळे प्रत्यक्ष जीवन व त्यांची मानसिक कल्पनासृष्टी यांच्यात फारच तफावत पडलेली दिसून येते. म्हणून मोरोपंतांच्या कवितेने काही गुणवैशिष्ट्यांमुळे त्याकाळी व आताही प्रतिष्ठा मिळवली असली, तरी ती त्यांच्या काळाची प्रातिनिधिक कविता ठरत नाही.

वडिलांची माया

रोहित रतन खैरनार, एस.वाय.बी.ए. (अर्थशास्त्र)

बाप या शब्दात सगळ्या गोष्टी सामावते.

बाप या शब्दात मुलीची व्यथा स्पष्ट होते.

बाप या शब्दात त्याच्या कष्टाची जाणीव कळते.

बाप या शब्दात त्याने केलेल्या प्रयत्नांना यश मिळते.

बाप हा मुलीची ढाल आहे.

बाप हा मुलाचा आधारस्तंभ आहे.

बाप हा कुटुंबाचा पाया आहे.

बाप हा लेकरांचा सहारा आहे.

बाप माझा सुखासांगाती आहे.

बाप माझा धैर्यशील आहे.

बाप हा दुःख सांगत नसतो.

बाप हा आनंद साजरा कधीच करत नसतो.

बाप हा बघायचा आहे तर फाटक्या ड्रेसमध्ये बघा.

बाप हा बघायचा आहे तर त्याने कोणत्या गोष्टींशी झगडलेला आहे ते बघा.

बाप हा बघायचा आहे तर तुमच्याबरोबर कायम खंबीर नेतृत्व जो असतो तो म्हणजे बाप.

बाप हा मुलाची सावली आहे.

बाप हा मुलीची माऊली आहे.

लग्नाच्या वेळी ढसाढसा रडतो तो म्हणजे बाप

कन्यादान जो करतो तो म्हणजे बाप.

वैश्विक मूल्यांची जाणीव करून देणारे संत : संत बसवेश्वर

– प्रा. संग्राम सीताराम गोसावी

महात्मा बसवेश्वर, ज्यांना बसवन्ना म्हणूनही ओळखले जाते. हे १२व्या शतकातील महान समाज-सुधारक, तत्त्वज्ञ, संत, कवी आणि वीरशैव पंथाचे संस्थापक होते. ते कर्नाटकमधील बागलकोट जिल्ह्यातील आलूर गावचे होते. त्यांचे जीवन आणि शिकवण भारतीय समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण होती ती विशेषतः धार्मिक, सामाजिक आणि तात्त्विक दृष्टिकोनातून.

महात्मा बसवेश्वरांचा जन्म ११३१साली कर्नाटकमधील आलूर गावात झाला. त्यांचे वडील मादिराज आणि आई मादलांबिका होती. बसवेश्वर लहानपणीच बुद्धिमान आणि तात्त्विक होते. त्यांना आध्यात्मिक ज्ञान मिळवण्यात रुची होती आणि ते संत-महात्म्यांच्या वर्तुळात वावरत असत.

बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान

१. **ईश्वराचे निराकार रूप :** बसवेश्वरांचा विश्वास होता की भगवान शिव हे निराकार आणि निरविकारी असले पाहिजेत. मूर्तिपूजा आणि बाह्य धार्मिक कर्मकांडांपेक्षा हृदयात शिवाच्या भक्तीचा अनुभव महत्त्वाचा आहे.

२. **सामाजिक समानता :** बसवेश्वर हे जातिवाद, भेदभाव आणि अंधश्रद्धेच्या विरोधात होते. त्यांचे तत्त्वज्ञान सर्व लोकांना समान मानण्याचे होते. त्यांच्याद्वारे सुरू केलेला वीरशैव पंथ मुख्यतः जातीपातीच्या भेदभावाला नाकारत होता.

३. **कर्म आणि भक्ति :** बसवेश्वरांचे विचार होते की, जीवनातील मुख्य उद्देश कर्म आणि भक्तीच्या मार्गाने आत्मा शुद्ध करणे आणि ईश्वराशी एकरूप होणे आहे. त्यांच्या मते ईश्वराचा साक्षात्कार स्वतःच्या कर्मातून होतो.

४. **वचनामृत :** बसवेश्वरांचे विचार त्यांच्या ''वचनामृत'' या काव्यरचनांमध्ये प्रकट झाले आहेत. वचनमृत हे त्यांचे शास्त्र आहे. ज्यामध्ये धार्मिक, तात्त्विक आणि सामाजिक बाबींबद्दल त्यांची विचारधारा व्यक्त केली आहे.

महात्मा बसवेश्वरांची शिकवण

बसवेश्वरांची शिकवण सर्व समाजासाठी होती. ते जातिवाद, मूर्तिपूजा आणि अंधश्रद्धा विरोधी होते. ते म्हणतात की प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार, प्रेम आणि आदर दिला पाहिजे. त्यांची शिकवण आणि तत्त्वज्ञान आजही लोकांना प्रेरणा देत आहेत.

बसवेश्वरांचा पंथ – वीरशैव पंथ

महात्मा बसवेश्वरांनी ''वीरशैव'' पंथाची स्थापना केली. या पंथात शिवाची उपासना आणि साधना केली जाते. हा पंथ जातिवाद आणि धार्मिक अंधश्रद्धा विरोधी होता. वीरशैव पंथाचे तत्त्वज्ञान हे शुद्धतेवर, भक्ति आणि साधनावर आधारित आहे.

महात्मा बसवेश्वरांचे योगदान

धार्मिक सुधारणा : बसवेश्वरांनी भारतीय समाजात धार्मिक

सुधारणा केली. त्यांनी मूर्तिपूजा, अंधश्रद्धा आणि जातिवाद यांना विरोध केला.

सामाजिक समानता : त्यांनी समाजात भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार मिळावेत, यासाठी कार्य केले. त्यांच्या शिकवणीने समाजात स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण केली.

महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान

महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान त्यांच्या जीवनाच्या विविध पैलूंवर आधारित होते. ते धार्मिक, तात्त्विक, आणि सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी झगडले. त्यांचे तत्त्वज्ञान मुख्यतः सामाजिक समानता, आत्मभक्ति, आणि निराकार ईश्वराच्या उपास्यतेवर आधारित होते. याचे मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :-

१. निराकार ईश्वराचा विश्वास

महात्मा बसवेश्वरांचा विश्वास होता की भगवान शिव हे निराकार (निराकार) आणि निरविकारी असतात. ते मानत होते की ईश्वराचा प्रत्यक्ष अनुभव केवळ हृदयातूनच मिळवता येऊ शकतो, बाह्य पूजा आणि मूर्तिपूजा मात्र द्वारे हे शक्य नाही. बसवेश्वर म्हणत होते की प्रत्येक व्यक्तीला आपल्याला समजून, एकाग्रतेने आणि भक्तिपंथाने ईश्वराशी संबंध ठेवावा लागतो.

२. सामाजिक समानता आणि जातीवादाचा विरोध

बसवेश्वरांची शिकवण जातिवादाच्या विरोधात होती. त्यांचा विश्वास होता की सर्व मानव समान आहेत आणि प्रत्येकाला समान अधिकार मिळावा. त्यांनी जात-पात, ऊंच-नीच, आणि धर्माच्या आधारावर भेदभाव करण्याला नकार दिला. त्यांनी समाजात समानतेची आणि न्यायाची स्थापना केली, आणि हे शिकवले की सर्व व्यक्तींना एकसमान अधिकार असावा.

३. भक्ति आणि कर्म

बसवेश्वर हे कर्म आणि भक्ति यांचे महत्त्व सांगत होते. त्यांचे म्हणणे होते की, भक्ति (ईश्वराच्या प्रती असलेली निष्ठा) आणि कर्म (चांगले कार्य आणि इतरांच्या भल्यासाठी केलेली साधना) हेच जीवनाचा मुख्य उद्देश आहे. त्यांचे विचार होते की, कर्मामध्ये भक्ति असली पाहिजे, आणि भक्ति व्यावहारिक कर्माच्या माध्यमातून प्रकट होईल.

४. वचनामृत – काव्य तत्त्वज्ञान

महात्मा बसवेश्वरांचे विचार ''वचनामृत'' या काव्य रचनांमध्ये व्यक्त झाले आहेत. या रचनांमध्ये ते धर्म, तत्त्वज्ञान आणि समाजाच्या सुधारणेविषयी आपले विचार मांडतात. वचनामृत हे एक सुस्पष्ट तत्त्वज्ञान असलेले ग्रंथ आहेत ज्यात समाजातील प्रत्येक घटकाला प्रोत्साहित केले गेले आहे की, ते उच्च विचार आणि एकात्मतेच्या मार्गावर चालावे.

५. आध्यात्मिक साधना आणि आत्मज्ञान

बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आत्मज्ञान आणि आत्मशुद्धीवर आधारित होते. ते मानत होते की प्रत्येक व्यक्तीला आपल्या आतल्या आवाज आणि आंतरिक आत्मा व्दारे मार्गदर्शन मिळू शकते. त्यांच्या मते, आत्मज्ञान हाच सर्वात उच्च राज्य आहे आणि त्यापर्यंत पोहोचण्यासाठी साधना आणि ध्यान आवश्यक आहे.

६. मुक्ति आणि पुनर्जन्म

बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान पुनर्जन्मावर आधारित होते. त्यांचे म्हणणे होते की, आत्मा जन्म आणि मरणाच्या चक्रातून मुक्त होऊ शकतो, जर त्याने त्याच्या जीवनामध्ये तत्त्वज्ञान, भक्ति आणि शुद्धता अनुसरण केली. ते मानत होते की मुक्ति म्हणजे आत्म्याचा ईश्वराशी एकात्मता साधणे आणि या भौतिक जगाच्या बंधनांपासून मुक्त होणे.

७. स्त्री-पुरुष समानता

महात्मा बसवेश्वर स्त्री आणि पुरुष समानतेचे एक महान समर्थक होते. त्यांच्याद्वारे स्त्रियांना अत्यंत महत्त्व दिले गेले आणि त्यांच्या तत्त्वज्ञानानुसार, स्त्रियांनादेखील सर्व अधिकार मिळावेत. त्यांच्या शिकवणीमध्ये लिंगभेद आणि स्त्रीद्वेषाला विरोध केला गेला.

८. आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे व्यावहारिक उपयोग

बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानात हे समजले जाते की, आध्यात्मिक शिकवण केवळ विचारांनीच नव्हे, तर प्रत्यक्ष जीवनातदेखील लागू होईल. ते त्यांच्या अनुयायांना सांगत होते की, ते रोजच्या जीवनात सत्य, प्रेम, शांती, आणि न्यायाचे पालन करावे.

९. शिवपूजा आणि भक्ति

बसवेश्वरांनी शिवपूजेवर जोर दिला, पण ते मूर्तिपूजेला नाकारत होते. त्यांचे तत्त्वज्ञान सांगते की, शिव हे एक

निराकार आणि सर्वव्यापी रूप आहे. त्याच्या ध्यानामुळेच शुद्धता आणि मुक्ति मिळू शकते. त्यांचे ध्यान आणि भक्ति ही केवळ प्रतीकात्मक न होता जीवनातील सर्व कृतीतून प्रकट होणारी होती.

थोडक्यात महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान भारतीय समाज आणि संस्कृतीतील एक महान आणि थोडक्यात समजावून सांगितलेली सुधारणा आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानामुळे भक्तिरस आणि तत्त्वज्ञानाची एक नवी दिशा सुरू झाली. जातिवाद, भेदभाव आणि मूर्तिपूजेचा विरोध करत त्यांनी सर्व मानवतेला समानता, शांती आणि प्रेमाची शिकवण दिली.

महात्मा बसवेश्वरांचा वीरशैव पंथ

महात्मा बसवेश्वरांनी १२व्या शतकात ''वीरशैव पंथा'' (लिंगायत पंथ) ची स्थापना केली. हा पंथ शंकराचार्यांच्या अद्वैत, वेदांत किंवा अन्य पारंपारिक हिंदू पंथांपेक्षा भिन्न होता. वीरशैव पंथ एक सुधारक पंथ म्हणून उभा राहिला जो मूर्तिपूजा, जातिवाद, अंधश्रद्धा आणि परंपरागत धार्मिक अनुष्ठानांवर विरोध करत होता. महात्मा बसवेश्वरांनी या पंथाद्वारे समाजातील धार्मिक आणि सामाजिक विकारांच्या विरोधात आवाज ऊठवला.

वीरशैव पंथाची वैशिष्ट्ये

१. **निराकार शिवाची उपासना :** वीरशैव पंथाच्या मुख्य तत्त्वज्ञानानुसार शिव हे एक निराकार आणि सर्वव्यापी आहे. या पंथात मूर्तिपूजेला विरोध केला जातो आणि निराकार शिवाची उपासना केली जाते. शिव म्हणजे शुद्धतेचे, ज्ञानाचे आणि अस्तित्वाचे प्रतीक आहे.

२. **लिंग पूजन :** वीरशैव पंथात ''लिंग'' (शिवलिंग) पूजन करण्याची परंपरा आहे. लिंग म्हणजे शिवाचे प्रतीक असलेले एक साधे प्रतीक आहे, ज्याचे प्रतीकत्व शुद्धता, सत्य आणि आध्यात्मिक प्रगतीचे दर्शक आहे. ''लिंगायत'' म्हणजे ''लिंगाचे भक्त'' आणि या पंथाच्या अनुयायांनी लिंगधारणेची परंपरा पाळली आहे.

३. **जातिवाद आणि भेदभावाचा विरोध :** महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील जातिवादाला आणि भेदभावाला प्रखर विरोध केला. त्यांनी सांगितले की, प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार, आदर आणि प्रेम मिळावे. वीरशैव पंथाने ''सर्व मानवता'' आणि ''सामाजिक समानता'' च्या तत्त्वज्ञानावर जोर दिला.

४. **आध्यात्मिक साधना आणि कर्म :** वीरशैव पंथ आत्मज्ञान आणि भक्ति (शिवाच्या प्रती असलेली निष्ठा) यावर आधारित आहे. या पंथात व्यक्तीच्या व्यक्तिगत कर्म आणि साधना यांवर अधिक बल दिला जातो. बसवेश्वरांचा विश्वास होता की, प्रत्येक व्यक्तीला शुद्ध, निष्कलंक आणि कर्मशुद्ध जीवन जगण्याचा मार्ग अवलंबावा लागतो.

५. **स्त्री-पुरुष समानता :** वीरशैव पंथाने स्त्री-पुरुष समानतेला प्रोत्साहन दिले. महात्मा बसवेश्वर यांच्या शिकवणीनुसार स्त्री-पुरुषात कोणताही भेदभाव नसावा आणि दोघांनाही समान अधिकार असावेत. पंथाने स्त्रियांना सन्मान दिला आणि त्यांना आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी संधी दिली.

६. **वचनामृत :** महात्मा बसवेश्वर यांच्या तत्त्वज्ञानाचा संग्रह म्हणजे ''वचनामृत''. वचनामृतमध्ये बसवेश्वरांच्या विचारांची आणि उपदेशांची मांडणी केली आहे. यामध्ये धार्मिक आणि तात्त्विक तत्त्वज्ञान, सामाजिक सुधारणांचे आवाहन आणि मूळ शिकवणींचा समावेश आहे.

वीरशैव पंथाचा प्रसार

महात्मा बसवेश्वर यांच्या शिकवणीमुळे वीरशैव पंथ कर्नाटकमध्ये मोठ्या प्रमाणावर पसरला. त्याच्या अनुयायांनी त्यांच्या तत्त्वज्ञानानुसार धार्मिक आणि सामाजिक सुधारणांसाठी चळवळ चालवली. त्याचबरोबर, वीरशैव पंथाने विविध क्षेत्रांमध्ये (धार्मिक, सामाजिक आणि तात्त्विक) एक नवीन दिशा दाखवली.

सामाजिक व धार्मिक सुधारणा

वीरशैव पंथाच्या स्थापनेने भारतीय समाजातील अनेक विकारांना आव्हान दिले. जातिवाद, मूर्तिपूजा, अंधश्रद्धा आणि स्त्रीद्वेष या सर्वांवर बसवेश्वर यांनी कडव्या विरोधाची भूमिका घेतली. त्यांचा विश्वास होता की, समाजाला सुधारण्यासाठी धार्मिक साधना, भक्ति आणि कर्म यांच्या संगमातूनच खऱ्या परिवर्तनाची शक्यता आहे.

थोडक्यात महात्मा बसवेश्वरांचा वीरशैव पंथ एक अत्यंत विचारशील, समतावादी आणि सुधारक पंथ होता. त्याच्या शिकवणींनी समाजातील धार्मिक, सामाजिक आणि मानसिक रूढींचे उल्लंघन केले आणि त्याने त्याच वेळी

पवित्रतेचा आणि शुद्धतेचा मार्ग दाखवला. वीरशैव पंथ आजही कर्नाटकमध्ये तसेच भारतातील इतर भागात प्रभावी आहे आणि महात्मा बसवेश्वर यांच्या तत्त्वज्ञानाने लाखो लोकांचे जीवन प्रभावित केले आहे.

महात्मा बसवेश्वर यांच्या तत्त्वज्ञानाचा संग्रह ''वचनामृत''

महात्मा बसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान ''वचनामृत'' या काव्य-रचनांमध्ये संकलित आहे. ''वचनामृत'' हे महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचे आणि उपदेशांचे एक अत्यंत महत्त्वपूर्ण स्त्रोत आहे. या रचनांमध्ये त्यांनी सामाजिक, धार्मिक, तात्त्विक आणि आध्यात्मिक विषयांवर विचार मांडले आहेत. ''वचनामृत'' म्हणजेच 'वचनांचा अमृत' किंवा 'वचनांचे अमृतपान', आणि यामध्ये बसवेश्वरांनी निराकार शिवाची उपासना, कर्म-भक्ति, समानता आणि सामाजिक सुधारणा यावर सुस्पष्ट विचार मांडले आहेत.

वचनामृत – प्रमुख तत्त्वज्ञान

१. ईश्वराची उपासना आणि निराकार शिवबसवेश्वरांच्या वचनामृतांमध्ये त्यांनी निराकार शिवाची उपासना करण्यावर जोर दिला आहे. त्यांचा विश्वास होता की शिव हे निराकार, निरविकारी आणि सर्वव्यापी असतात. मूर्तिपूजा आणि बाह्य अनुष्ठानांच्या विरोधात ते होते आणि ते म्हणायचे की प्रत्येक व्यक्तीला त्याच्या हृदयात ईश्वराची अनुभूती होणं आवश्यक आहे.

२. समाजातील समानता ''वचनामृत'' मध्ये बसवेश्वरांनी जातिवाद आणि भेदभावाचा प्रखर विरोध केला आहे. त्यांच्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती समान आहे आणि सर्वांना समान अधिकार मिळावे. त्यांनी उच्च-नीचतेच्या भेदाला नाकारले आणि समाजातील सर्व व्यक्तींना समान मानले.

३. कर्म आणि भक्तिबसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान कर्म आणि भक्तीवर आधारित होते. त्यांच्या मते, भक्ति म्हणजेच हृदयाच्या सन्मानात शिवाची सेवा करणे आणि कर्म म्हणजे समाजाच्या भल्यासाठी चांगले कार्य करणे. त्यांनी सांगितले की कर्म आणि भक्ति यांचा समन्वय साधणारा मार्ग जीवनाचा सर्वोत्तम मार्ग आहे.

४. स्त्री-पुरुष समानता बसवेश्वरांच्या वचनमृतात स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा बारकाईने मांडला आहे. त्यांनी स्त्रीला हेच अधिकार दिले की ती सुद्धा आत्मज्ञान आणि भक्तीत उंची गाठू शकते. त्यांचा विश्वास होता की स्त्रीला समाजात सन्मान दिला पाहिजे.

५. सामाजिक सुधारणा वचनामृतात बसवेश्वरांनी समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि असमानतेच्या विरोधात बंड पुकारले आहे. त्यांचा संदेश होता की, लोकांनी आपापल्या कर्मातून आणि समजून शुद्धतेची साधना करावी. त्यांना आदर्श समाज तयार करणे आवश्यक होते.

६. आध्यात्मिक मार्गदर्शन बसवेश्वरांनी ''वचनामृत'' मध्ये एक प्रकारे प्रकट केले की, आत्मा आणि परमात्म्याचे तात्त्विक भेद नाहीत. त्यांनी सांगितले की, व्यक्तीला आत्मसाक्षात्कार मिळवण्यासाठी त्याच्या वर्तनात, विचारात आणि कर्मात शुद्धता असली पाहिजे.

वचनामृताचे महत्त्व

१. **सामाजिक सुधारणांचा संदेश :** ''वचनामृत'' मध्ये बसवेश्वरांनी समाजातील जातिवाद, भेदभाव, स्त्रीद्वेष आणि मूर्तिपूजेला त्यांनी नकार दिला.

२. **धार्मिक समतेचा आदर्श :** वचनामृत हे एक धार्मिक ग्रंथ म्हणूनही महत्त्वपूर्ण आहे कारण ते विविध धार्मिक कर्मकांडांपेक्षा चांगले वर्तवलेले जीवन दर्शवते. यात व्यक्तिमत्त्वाच्या आध्यात्मिक विकासाचे महत्त्व सांगितले आहे.

३. **आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग :** वचनामृताचा मुख्य उद्देश आध्यात्मिक उन्नती आणि आत्मज्ञान प्राप्त करणे आहे. प्रत्येक व्यक्तीला आत्मा आणि परमात्म्याचा अनुभव प्राप्त होईल असे बसवेश्वरांनी सांगितले.

महात्मा बसवेश्वर यांच्या ''वचनामृत'' या रचनांमध्ये त्यांचे जीवनदर्शन, तत्त्वज्ञान आणि समाजसुधारणा यांचा समावेश आहे. वचनामृत आजही लाखो लोकांसाठी मार्गदर्शक आहे, कारण त्यात सर्वसमावेशकता, समानता आणि शुद्धतेचा संदेश आहे. त्यांचे वचनामृत एक अमूल्य तत्त्वज्ञान आहे, जे जीवनाचे उद्दिष्ट आणि मानवतेचे महत्त्व सांगते.

मी तुझ्याचसाठी लिहिते....

कु.प्रियांका संजय मुरुडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)

तुलाच स्वप्नात पाहते
तुझ्याच स्वप्नात जगते
स्वप्नांच्या या वाटेत
मी तुझ्याचसाठी थांबते
तूच माझी अबोल कहाणी,
मी तुझ्याचसाठी लिहिते ....

तुझ्याच सोबत मी एकटेपण विसरते
तुझ्याच सहवासात मी
स्वतःलाच विसरते,
विसरता स्वतःलाच,
मी तुझ्याचसाठी लिहिते
तूच माझी अबोल कहाणी,
मी तुझ्याचसाठी लिहिते...

बरसणाऱ्या पावसाच्या थेंबातही
मी तुझेच प्रतिबिंब पाहते
तुझ्याच प्रेमाच्या रंगात मी
ओली होऊन बागडते
तूच माझी अबोल कहाणी,
मी तुझ्याचसाठी लिहिते...

तुझ्याच सोबत मी चंद्र पाहून हसते,
हसताना तुझ्याच तेजाला
चंद्र समजून मी तुझ्याचसाठी लिहिते
तूच माझी अबोल कहाणी,
मी तुझ्याचसाठी लिहिते...

सखी...

कु.सलोनी संतोष घाडगे, एस.वाय.बी.एस्सी.

अजूनही आठवतात मला तुझ्या डोळ्यातील अश्रूधारा
ती निरव शांतता आणि वाहणारा वारा
तू का घाबरतेस ?
एक स्त्री म्हणून का ?
ऊठ, जरा बाहेर डोकावून बघ
ऊठ, स्वतःला ओळखून बघ
तुला ऊठावेच लागेल,
तुला स्वतःला ओळखावेच लागेल,
कारण, तूच आहेस आमचा मान,
तूच आहेस आमचा अभिमान,
तू शिकशील तर सारेच शिकतील,
तू असशील तर सारेच असतील,
तुझ्याविना कोणाचेही अस्तित्व नाही गं ..
तुझ्या उदरातून तुझ्याच कळीला असे खुडू नको गं ..
मला आठवण होते त्या आल्हाददायक नदीची कारण..
ती निभावत असलेल्या प्रत्येक नात्याला एक
ओंजळभर
थंडगार पाणी देत असतेस..
मला आठवण होते त्या आईची, जी असते दयेचा सागर
आणखी काय नाव देऊ तुला मी
स्त्री म्हणून तुझा मान वाढवू
की तूच शक्ती म्हणून अभिमानाने सांगू
घर सावरताना कित्येकदा ठेचकाळून पडतेस
तरीही तू जोमाने उठतेस
कधी-कधी कोमेजूनही फुलात असतेस
परिस्थिती नसेल तर तू स्वतःला बदलतेस का ?
तरी तूच आहेस घराची दिशा, अन् विजयाची आशा
मग ऊठशील ना? घेशील ना गं झेप? तुझ्या
आकाशाकडे
डोळे लावून बसलेली तुझी सखी .....

निसर्ग मानवाचा सोबती

कु.गायत्री बाळासाहेब मांडेकर, एम.ए. भाग – १(भूगोल)

'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे' .... आज सहज कवी विंदा करंदीकरांनी लिहिलेली ही कविता पुन्हा एकदा वाचनात आली आणि माणूस नावाच्या प्राण्याची आठवण आली. प्रत्येक गोष्टीसाठी दुसऱ्याला दोष देणारा हा माणूस स्वतःच कसा एवढा वाईट बनून बसला.

नद्या, नाले, डोंगर, पर्वत, झाडे, निसर्ग या सर्वांचा ऱ्हास याच माणसाने केला पण तो ऱ्हास निसर्गामुळेच झाला असे बोलणारा माणूस या पृथ्वीवर जिवंत तरी कसा राहतो हा प्रश्न पडतो.

पक्ष्यांच्या अनेक जाती, झाडांच्या जाती, काही नष्ट झाल्या तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तरी या माणसाला जाग कशी आली नाही. माणसाला फक्त निसर्गाकडून सर्व काही घेताच आले पण त्याला द्यायला हा माणूस नावाचा प्राणी खूपच कमी पडला.

आपल्याला पुढची सगळी परिस्थिती माहित असूनसुधा आपण त्याच चुका परत परत करतो आहे. झोपडीतला माणूस सिमेंटच्या घरात राहायला गेला, पण शुद्ध हवा सोडून दुषित हवा घ्यायला लागला.आज हा माणूस नावाचा प्राणी चंद्रावर पोहोचला पण त्याला निसर्गाच्या एका टोकापर्यंतही पोहचता आलेले नाही.

आपण निसर्गाला दिलेल्या त्रासामुळे आपल्यालाही त्रास होणार आहे हे माहित असूनही त्याच्यात काही सुधारणा झालेली नाही. माणसांचे संपूर्ण जीवन हे निसर्गावरच अवलंबून आहे पण निसर्गाचा नाश करणारा सर्वात महत्त्वाचा प्राणी हा मानव आहे. काही वर्षापूर्वी सर्वत्र दिसणारी चिमणी आज काही ठिकाणीच दिसत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास आणि वृक्षतोड अजूनही थांबली नाही तर तीच चिमणी पुढच्या पिढीला प्राणिसंग्रहालयात नेऊन दाखवावी लागेल. वृक्ष लागवड करणे आणि त्या वृक्षांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक मनुष्याने एका वर्षात किमान ५ झाडे लावली आणि त्यांची जपणूक केली तर पुढील काही वर्षात आपली पृथ्वी हिरवीगार झाल्याशिवाय राहणार नाही वृक्षच आपले सगेसोयरे आणि सोबती आहेत. तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात की,

'' वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे
पक्षीही सुस्वरे आळविती !''

कर्मवीर भाऊराव पाटील : जीवन आणि कार्य

सौ. करुणा ढवळे (मसुरे), एम.लिब ॲण्ड एल.एस्सी.

रयतेचा ज्ञानदीप कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वतःच्या खर्चाने आणि अपार मेहनतीने शिक्षणाची गंगा गरीब आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत व्हावी म्हणून त्यांनी 'कमवा आणि शिका' योजना सुरू केली, ज्यामध्ये विद्यार्थी स्वतः काम करून शिक्षणाचा खर्च भागवायचे. रयत शिक्षण संस्थेची स्थापनाः पुढे, १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्था स्थापन करून त्यांनी शिक्षणाला व्यापक स्तरावर नेले.

कर्मवीरांचा दीपस्तंभ,
शिकवा अन् वाचवा, समाज घडवा,
ज्ञानाच्या प्रकाशाने दारिद्र्य हटवा!
कमवा, शिका, पुढेच चाला,
सत्यशोधकांचे कार्य वाढवा!
गोरगरिबांचा कैवारी तू,
शिक्षणाच्या दीपाचा पहारेकरी तू!
महाराष्ट्राची शान आहेत,
कर्मवीर भाऊराव, महान आहेत!

कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील एक अजरामर व्यक्तिमत्त्व. त्यांचे संपूर्ण जीवन सामाजिक परिवर्तनासाठी समर्पित होते. शिक्षण हेच सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन आहे, ही भूमिका त्यांनी आयुष्यभर अंगिकारली आणि सत्यशोधक चळवळीच्या प्रेरणेने त्यांनी ग्रामीण भागातील गरिबांसाठी शिक्षणाची गंगा वाहती ठेवली. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारधारेचा प्रभाव त्यांच्या कार्यावर मोठ्या प्रमाणात पडला. शेतकरी व गरीब कष्टकरी समाजातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी 'रयत शिक्षण संस्था' १९१९ मध्ये स्थापन केली.

शिक्षण हे केवळ श्रीमंतांसाठी मर्यादित न राहता, गोरगरीब मुलांना ते सुलभ व्हावे म्हणून त्यांनी 'कमवा आणि शिका' ही संकल्पना आणली. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच काम करून स्वतःच्या शिक्षणाचा खर्च भागवावा, ही अभिनव योजना त्यांनी राबवली. ही योजना आजही ग्रामीण शिक्षणाच्या पायाभूत संकल्पनेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. समाजसुधारणेतील योगदान, जातीभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी त्यांनी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत कार्य केले. स्त्रीशिक्षणाला विशेष महत्त्व देत त्यांनी ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. शिक्षणामुळेच समाजात परिवर्तन घडू शकते, या विश्वासाने त्यांनी हजारो ग्रामीण युवकांना सुशिक्षित केले. त्यांच्या कार्याचा परिणाम आणि गौरव त्यांच्या प्रयत्नांमुळे हजारो विद्यार्थी सुशिक्षित होऊन समाजात मोठी प्रगती करू लागले. महाराष्ट्र सरकारने त्यांना ''कर्मवीर'' हा किताब बहाल केला. त्यांचे कार्य आजही 'रयत शिक्षण संस्था'च्या माध्यमातून चालू आहे.

युगपुरुष भाऊराव पाटील: शिक्षणसंस्कृतीचे शिल्पकार

''शिक्षणाशिवाय समाजाचा विकास अशक्य आहे'' या महान विचाराने प्रेरित होऊन शिक्षणक्रांतीचे प्रणेते कर्मवीर भाऊराव पाटील यांनी संपूर्ण आयुष्य शिक्षणाच्या प्रसारासाठी अर्पण केले. गोरगरीब, शेतकरी व कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केवळ शब्दांनी नव्हे, तर कृतीनेही एक नवा आदर्श निर्माण केला.

भाऊराव पाटलांनी १९१९ साली 'रयत शिक्षण संस्था' या महान संस्थेची स्थापना केली. ''रयत'' म्हणजे 'शेतकरी व कष्टकरी जनता'.

त्या काळी उच्चभ्रू व श्रीमंत लोकांनाच शिक्षण घेता येत असे, पण भाऊराव पाटलांनी हा अन्यायकारक भेदभाव संपवण्यासाठी शिक्षण तळागाळापर्यंत पोहोचवले.

''कमवा आणि शिका'' या अभिनव योजनेच्या माध्यमातून गोरगरीब विद्याध्यर्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले.

शाळा आणि वसतिगृहे सुरू करून ग्रामीण भागातील विद्याध्यर्थ्यांसाठी शिक्षण उपलब्ध करून दिले.

शिक्षण घेण्यासाठी पैसा हा अडथळा ठरू नये म्हणून भाऊराव पाटलांनी 'कमवा आणि शिका' ही संकल्पना अमलात आणली. या योजनेत विद्यार्थी शिक्षण घेत असतानाच काम करून स्वतःच्या शिक्षणाचा खर्च भागवत असत.

यामुळे विद्यार्थी आत्मनिर्भर होत आणि कष्टाची जाणीव त्यांना होत असे. अनेक विद्यार्थ्यांनी या योजनेंतर्गत शिक्षण घेत समाजात मोठी प्रगती केली.

स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन

जातिभेद निर्मूलन :

शिक्षण हे सर्वांसाठी समान असले पाहिजे, या भूमिकेतून त्यांनी जात-पात, अस्पृश्यता याविरोधात कार्य केले.

सत्यशोधक चळवळ :

महात्मा फुले व सत्यशोधक समाजाच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी शोषित व पीडित समाजासाठी शिक्षण उपलब्ध करून दिले.

स्वावलंबनावर भर :

शिक्षण घेताना विद्यार्थी स्वावलंबी व्हावेत, यासाठी त्यांनी 'शेततळं खोदणं', 'सुतारकाम', 'शेती' यासारखी कामे शाळांमध्ये शिकवली.

सन्मान व पुरस्कार :

भाऊराव पाटलांच्या अथक प्रयत्नांमुळे समाजात शिक्षणक्रांती घडली आणि त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र सरकारने ''कर्मवीर'' हा किताब त्यांना बहाल केला. शिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे संपूर्ण देशाने त्यांना मान्यता दिली. आजही त्यांच्या नावाने ''कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार'' दिला जातो.

शिक्षणयोद्धा भाऊराव पाटील,
ज्ञान दीप तो पेटवीत गेले,
रयतेसाठी झिजत गेले रयतेसाठी झिजत गेले!

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजसुधारणेचा दीपस्तंभ उभा केला. त्यांनी स्वतःच्या सुखसोयींचा त्याग करून 'शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे' हा मंत्र रुजवला. आज लाखो विद्यार्थी त्यांच्या विचाराने प्रेरित होत शिक्षणाच्या प्रवाहात आले आहेत. 'रयत शिक्षण संस्था' आजही त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचे कार्य करत आहे. त्यांचे हे कार्य अजरामर राहील आणि शिक्षणप्रेमींना कायम प्रेरणा देत राहील! कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा प्रभावी मार्ग मानला आणि त्याद्वारे हजारो लोकांचे जीवन उजळले. त्यांनी सामाजिक विषमता मिटवून शिक्षणाच्या माध्यमातून समतेचा मार्ग निर्माण केला. त्यांच्या कार्यामुळे आजही लाखो विद्यार्थी प्रेरित होत आहेत. त्यांचे विचार आणि तत्त्वज्ञान हे आजही शिक्षणप्रेमींसाठी दीपस्तंभासारखे आहे.

'मेजर ध्यानचंद' यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान

डॉ. लोहोटे पी. के., शारीरिक शिक्षण संचालक

गोषवारा :

जगभरातील मेजर ध्यानचंद हे भारतातील आजपर्यंतचे सर्वात लोकप्रिय खेळाडू होते. त्यांच्या कामगिरीमुळे त्यांना 'हॉकीचे जादूगार' ही पदवी मिळाली. आपल्या हॉकीच्या कामगिरीमुळे त्यांना जगप्रसिद्धी मिळाली. खेळामध्ये त्यांचे योगदान महान आहे. भारताला १९२८, १९३२, १९३६ ऑलिंपिकमध्ये हॉकी खेळाचे सुवर्णपदक मिळवून दिले. ध्यानचंद यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द सर्वोत्तम आणि गौरवास्पद आहे. ध्यानचंद यांनी एकूण ४०० पेक्षा देखील अधिक गोल केले आहेत. जे या खेळामध्ये संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वात जास्त गोल आहेत. त्यांचा हा एक विश्वविक्रमच आहे. त्यांनी त्यांच्या कारकीर्दीमध्ये १००० गोल केले, त्यातील ४०० गोल तर आंतरराष्ट्रीय संघाविरुद्ध होते. या गोष्टीमुळे भारत सरकारने त्यांना भारतातील सर्वोच्च पुरस्कार पद्मभूषण देऊन त्यांचा गौरव केला व नवी दिल्लीमधील ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियमला त्यांचे नाव दिले.

अतिमहत्त्वाचा शब्द : मेजर ध्यानचंद, विझार्ड ऑफ हॉकी, कार्यमान.

परिचय : ध्यानचंद सिंग (२९ ऑगस्ट १९०५ ते ३ डिसेंबर १९७९) हे भारतीय हॉकीचे नावाजलेले खेळाडू होते. त्यांना जागतिक खेळ विश्वातील सर्वोत्कृष्ट हॉकीचे खेळाडू म्हणून ओळखले जाते. त्यांना हॉकीचे जादूगार म्हणून संबोधले जायचे. त्यांनी भारताला १९२८, १९३२ व १९३६ मध्ये ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवून दिले. त्यांच्या काळात भारतीय संघ सर्वात शक्तिशाली संघ म्हणून ओळखला जायचा. भारत सरकारने १९५६ साली त्यांचा पद्मभूषण या पुरस्काराने सन्मान केला. त्यांचा जन्मदिवस भारतीय खेळ दिवस म्हणून साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दिवशी देण्यात येणाऱ्या राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे नाव 'मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार' असे केले आहे. हॉकीच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक म्हणून आजही ओळखलं जातं. त्यांनी भारताच्या क्रीडा क्षेत्रात खूप मोठं योगदान दिलं आहे. भारताची क्रीडा संस्कृती वाढावी, त्याला प्रोत्साहन मिळावे, तसेच देशाच्या कानाकोपऱ्यात खेळाची जागरूकता निर्माण व्हावी यासाठी आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा केला जातो.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त 'फिट इंडिया' चळवळ सुरू झाली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी सर्व देशामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्सव साजरा करतात.

जन्म : ध्यानचंद यांचा जन्म उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. मेजर ध्यानचंद यांच्या वडिलांचे नाव रामेश्वर दत्तसिंह, पत्नीचे नाव जानकीदेवी आईचे नाव शारदा सिंग, मुले अशोक कुमार.

बालपणीचे जीवन :

ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. त्यांचे मोठे भाऊ रूपसिंग हे सुद्धा हॉकीचे खेळाडू होते. ध्यानचंद यांचे वडील सामेश्वर दत्त सिंग हे ब्रिटीश सैन्यात होते. ते सुद्धा सैन्यात हॉकीच खेळायचे. अशाप्रकारे ध्यानचंद यांना हॉकीचे शिक्षण लहानपणापासूनच मिळाले. वडील आर्मीत असल्यामुळे त्यांची वारंवार बदली व्हायची, त्यामुळे त्यांना इयत्ता सहावी नंतर शिक्षण सोडावे लागले. नंतर हे कुटुंब उत्तरप्रदेशातील झाशी येथे स्थायिक झाले.

हॉकी खेळाची सुरुवात:

मेजर ध्यानचंद हे क्रीडा क्षेत्रातील हॉकी या खेळाचे गुरु मानले जायचे. हॉकीचा सराव त्यांनी दिवस रात्र एक करून इतका उत्तम केला होता की, प्रत्येक सामन्यांमध्ये ते असे काही जादू करून गोल करायचे की, त्यांच्या पराक्रमामुळे त्यांना जादूगार असं नाव पडलं. भारतामध्ये हॉकीचे नाव काढले तर तोंडामध्ये पहिला शब्द येतो तो म्हणजे मेजर ध्यानचंद. फक्त भारतातच त्यांची प्रसिद्धी नव्हती तर संपूर्ण विश्वात हॉकी घेण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट खेळाडू संबोधले जायचं. हॉकी या खेळाची आवड त्यांना लहानपणी लागली होती. वडिलांच्या होणाऱ्या सारख्या बदलीमुळे प्रत्येक वेळी या शहरातून दुसऱ्या शहरात त्यांना स्थलांतर करावे लागायचे, त्यामुळे त्यांचे शिक्षण अर्धवटच राहिले.

हॉकी खेळाचा सराव करून त्यांनी हॉकी या खेळामध्ये आपलं करिअर करण्याचं ठरवलं. लहानपणी ते गरीब असल्यामुळे १४ वर्षाचे ध्यानचंद झाडाच्या फांद्या कापून त्यांचे हॉकी स्टिक बनवून कपड्यांचा गोळा करून त्याने हॉकीचा सराव करायचे.

क्रीडा क्षेत्रातील योगदान:

मेजर ध्यानचंद यांनी ऑलिम्पिकमध्ये तीन वर्षे भारताचे प्रतिनिधित्व करून तीन वर्षे सुवर्णपदक मिळविले होते. लहानपणीच वडिलांसोबत हॉकी सामना बघायला गेलेले ध्यानचंद यांनी पराभूत झालेल्या संघाला वडलांची परवानगी घेऊन तो सामना चार गोल करून जिंकून दिला. त्यांचे हॉकी खेळण्याची पद्धत पाहून व ते ज्या प्रकारे गोल करत त्यांची जिद्द, त्यांची खेळासाठी असलेली ती भूक पाहून ध्यानचंद यांना अधिकारी त्यांना सैन्यात घेण्यासाठी तयार झाले.

१९२२ मध्ये ध्यानचंद हे पंजाबचे सैनिक झाले आणि सैन्यातून हॉकी खेळण्यास सुरुवात केली. सुभेदार मेजर भोळे तिवारी हे ध्यानचंद यांचे सल्लागार होते. १९३६ मध्ये भारतीय संघाने जर्मनी संघाला ८-१ हे गुण मिळवून विजय प्राप्त केला होता. तेव्हा ध्यानचंद यांनी अनवाणी पायाने खेळले होते. त्यांचे हॉकी खेळातील कौशल्य आणि खेळाबद्दल असेलेली त्यांची मनोवृत्ती पाहून जर्मनीचे हिटलर यांनी स्वतः ध्यानचंद यांना त्यांच्या सैन्यांमध्ये वरिष्ठ पदासाठी संधी दिली होती.

ध्यानचंद यांच्या मनामध्ये असलेले देशप्रेम त्यांना ती ऑफर घेण्यास रोखत होते. त्यामुळे अतिशय प्रेमाने ध्यानचंद यांनी हिटलर यांनी दिलेल्या ऑफरचा आदर करत ती ऑफर नाकारली. त्या वेळी ध्यानचंद भारतासाठी प्रतिनिधित्व करत होते. त्या वेळी भारत हा विश्वातील हॉकी खेळासाठी सर्वोत्कृष्ट शक्तिशाली संघ मानला जायचा.

ध्यानचंद यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द सर्वोत्तम आणि गौरवास्पद आहे. ध्यानचंद यांनी एकूण ४०० पेक्षा देखील अधिक गोल केले आहेत. जे या खेळामध्ये संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वात जास्त गोल आहेत. त्यांचा हा एक विश्व विक्रमच आहे. त्यांचा हा विक्रम कोणीही मोडला नाही. १९२६ मध्ये न्युझीलँड येथे एक हॉकी सामना रंगवण्यात आला होता. त्या सामन्यामध्ये ध्यानचंद यांचा देखील सहभाग होता. सामन्यामध्ये एकूण २० गोल करण्यात आले, त्यातील १० गोल स्वतः ध्यानचंद यांनी एकट्याने केले होते. न्युझीलँड मध्ये झालेल्या सामन्यांमध्ये भारत एकूण २१ सामने खेळेल त्यामध्ये १८ सामने भारताने जिंकली. या संपूर्ण स्पर्धेमध्ये भारताने १९० गोल नोंदविले गेले त्यातील १०० गोल तर एकट्या ध्यानचंद यांनी केले होते.

ध्यानचंद यांचे हॉकी खेळाचे रेकॉर्ड दिवसेंदिवस वाढत चालले होते. त्यामुळे भारत हा हॉकी या खेळासाठी संपूर्ण जगभरात प्रसिद्ध झाला. बॉलवरची त्यांची पकड इतकी उत्तम होती की त्यांना 'द विझार्ड' असं नाव पडलं. हे नाव त्यांना पंजाबमधील झेलम येथे हॉकीचा सामना रंगला तेव्हा

पडलं.

या सामन्यात तर ध्यानचंद यांनी कमालच केली होती. त्यांच्या संघाला २ गोलची गरज होती आणि त्यांनी आपल्या उत्तम कौशल्याने शेवटचे उरलेले तीन मिनिटांमध्ये ४ गोल करून दाखविले. इथून पुढे त्यांनी अनेक हॉकी सामन्यांमध्ये भाग घेतला आणि त्यांचे रेकॉर्ड बघून त्यांचे आंतरराष्ट्रीय हॉकी सामन्यासाठी निवड झाली. लंडनमध्ये १९२७ साली लंडन फॉक्सस्टोन फेस्टिवल यामध्ये हॉकीचे सामने व्हायचे. यातील १० सामन्यांमध्ये आपल्या भारत संघाने एकूण ७२ गोल केले त्यातील ३६ गोल तर ध्यानचंद यांनी केले होते. १९२८ मध्ये भारताने ऑलिंपिक स्पर्धेत भारताला नेदरलँड बरोबर सामना करायचा होता त्यावेळी मेजर ध्यानचंद यांनी २ गोल करून दाखविले. भारत संघाचे एकूण ३ गोल होते त्यातील २ गोल तर ध्यानचंद यांनी केले होते. या गोष्टीमुळे भारताला सुवर्णपदक देखील मिळाले. याचे संपूर्ण श्रेय मेजर धान्यचंद यांना जाते. त्यांना लॉस एंजलीस येथे १९३२ मध्ये ऑलम्पिक स्पर्धा रंगली होती, त्यामध्ये भारताचा सामना अमेरिकेशी होता त्या सामन्यांमध्ये २३-८ असा विक्रम करून भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. २३ पैकी ८ गोल ध्यानचंद यांचे होते. त्याच वर्षी बर्लिन ऑलिंपिकमध्ये आपल्या भारत संघाने जपान, हंगेरी, अमेरिका या देशांना झिरो गोलने पराभूत केले. ध्यानचंद यांची हॉकी क्षेत्रातील होणारी प्रगती भारताला अभिमानास्पद ठरली. क्रीडा क्षेत्रामध्ये ध्यानचंद यांनी भारताचे नाव उच्च स्तरावर नेऊन ठेवले. त्यांच्या या हॉकी कारकीर्दीमुळे त्यांना मेजर ही पदवी देण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर त्यांना सलग ३ वर्षे भारताला ऑलम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळवून दिले. त्यांनी एकूण त्यांच्या कारकीर्दी मध्ये १००० गोल केले. त्यातील ४०० गोल तर आंतरराष्ट्रीय संघाविरुद्ध होते. या गोष्टीमुळे भारत सरकारने त्यांना भारतातील सर्वोच्च पुरस्कार पद्मभूषण देऊन त्यांचा गौरव केला व नवी दिल्लीमधील ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियम नाव देण्यात आले.

ध्यानचंद यांचा मृत्यू यकृत कर्करोगाने झाला. त्यांना यकृत कर्करोग हा विकार होता. ३ डिसेंबर १९७९ या दिवशी मेजर ध्यानचंद यांचे निधन झाले.

तूच आहेस तुझ्या जीवनाचा सार...

कु.संध्या भगीरथ शिंदे, टी.वाय.बी.ए.(इंग्रजी)

कधी जगशील तू स्वतःसाठी,
पुरे झाला आता लोकांचा विचार
नेहमी लढते दुसऱ्यांसाठी,
स्वतःसाठी कधी उभी राहशील
या मतलबी दुनियेमध्ये तू मागेच राहशील,
ऊठ आता रहा उभी स्वतःसाठी
कारण तूच आहेस तुझ्या जीवनाचा सार
दुनियेचे काय ती नावं ठेवण्यात पारंगत आहे,
पण कठीण समयी तूच तुझी ताकद आहेस.
नको करू तू लोकांचा विचार,
जगून घे तुझा मनमोकळा संचार
कारण तूच आहेस तुझ्या जीवनाचा सार
ऐक आवाज अंतर्मनाचा तोच खरा आहे,
कधीपर्यंत जगशील मन मारून हेच सत्य आहे,
स्वप्नांसाठी लढण हेच जीवनाचं सार आहे
जग स्वतःसाठी आणि उजळव हा संसार
कारण तूच आहेस तुझ्या जीवनाचा सार
हे जग तुला नेहमीच पडताळेल,
पण ठेव स्वतःवर ठाम विश्वास,
तुझा हा विश्वास सार्थ ठरेल तुझ्या जन्मास
कारण तूच आहेस तुझ्या जीवनाचा सार

अनिश्चिततेच्या जगातील अस्वस्थ वाटचाल

डॉ. अमोल ज. वीर, सहाय्यक प्राध्यापक

संघर्ष करत असताना एकापाठोपाठ जी वर्षे गेली त्याचा हिशोब लावत असताना काही अनुत्तरित प्रश्न आणि न सापडणारी उत्तरे याचा वेध घेण्याचा थोडा प्रयत्न केला आहे.

आमचे जन्माचे वर्ष १९८९ ते १९९० म्हणजे एक संघर्ष घेऊनच आले असावे. कारण या तीन वर्षातील पिढी ही शापित या साठी असावी की जेवढे बदल झाले ना. तेवढे या तीन वर्षात च.. आम्ही लहान होतो तेव्हा गावात पहिल्यांदा टेलिफोन आले. या काळात केजी तील मुले मोबाईल वापरतात त्या वेळी आम्ही एका घरातून दुसऱ्या घरी फोन लावून नुसतं हॅलो म्हणून फोन उचलणाऱ्या म्हातारीला त्रास देत होतो. यात वेगळीच गम्मत आम्ही घ्यायचो. कुठेतरी एखादा ब्लॅक अँड व्हाइट टीव्ही असायचा. ज्यांच्या घरी असायचा त्यांच्या घरची थोडीफार कामे केली की मग रात्री टीव्ही बघायला आपल्याला परवानगी मिळाली. एक तर आमच्या इथे मराठी शाळेत बाई होत्या त्या तर लेकरं सांभाळायला द्यायच्या मग ते केलं की मग थोडंफार खायला पण मिळत होतं. शनिवार आणि रविवार म्हणजे नुसता गोंधळ च.. शक्तिमान, जय हनुमान, वेताळ पंचवीशी यासारख्या मालिका बघायला नुसती झुंबड, तळेकर बाईच्या घरी जाऊन बन्याबापू बघणं म्हणजे नेटफ्लिक्सचे सबस्क्रिप्शन करणे यापेक्षा कितीतरी आनंद मिळून जायचा. जूनमध्ये शाळा भरण्याच्या अगोदर वह्या पुस्तकं आणि शालेय साहित्य घेण्याची जी उत्सुकता होती ती आज मोठी गाडी किंवा एखादं आलिशान घर घेण्याइतकी असावी का ? तर नाही ! त्या वेळी नवीन पुस्तकांचा सुवास हा मनाला किती तरी समाधान देऊन जात होता. कसंबसं शाळेत जाऊन नवीन मित्र बनवताना आता आपल्या एखाद्या क्लायंटला प्लॅन समजावून सांगण्याइतका प्रयत्न करावा लागत नव्हता. एव्हाना कधी त्या मैत्रीत व्यवहार, फसवणूक, दगाखोरी दिसून नाही आली. आता तुम्ही म्हणाल की आमच्या पण पिढीत हे होतच की. तर नक्की होत पण त्या पिढीला पुढे १९९१ चे एल पी जी चे धोरण, नवीन अभ्यासक्रमाची सुरुवात, दहावीत असताना एबीसीडी कोड नवीनच तर बघायला भेटले गेल्या वर्षी पावसाळ्यात पूर आला तेव्हा आठवलं की जेव्हा आम्ही लहान होतो तेव्हा विहिरींचे पाणी हातांनी काढता येत होते. त्यानंतर मी आमच्या इथल्या विहिरींना कधीच पाणी पाहिलं नाही. आणि सुगीचे दिवस तर किती मंतरलेले की मी स्वतः कित्येक तरी मोठी खळी पाहिली आहेत, मला वाटतं जुन्या पिढीतील ही शेवटची पिढी असेल हे सगळं अनुभवनारी. ही आमचीच पिढी गुरुजींची मास्तर करणारी आणि मास्तरची सर करणारी. रेडिओवरती विविध भारती ऐकणारीसुद्धा शेवटचीच असावी. काळयाकुट्ट आकाशाकडे बघत खळ्यावरती जुटींग आणि हडळच्या गोष्टी ऐकून मनात

आयुष्यभर भुतांची भीती बाळगणारीसुद्धा नंतर नसावी कदाचित.

एकंदरीत काय तर जुन्या आणि नव्या पिढीचा मध्य म्हणजे आमची ही पिढी. जुन्या रुढी-परंपरा आणि संस्कार घेऊन उन्हाड झालेली आम्ही पोरं. याच काळातील पोर ही व्यसनीही तेवढीच झाली. विचार करण्याचा भाग एवढाच की काही पुण्यात गेली, काही पिण्यात गेली. पिण्यात गेलेली त्यांनी आयुष्य हे गणतीत सोडून दिलं आणि पुण्यातील मुलांचं नोकरीसाठी आयुष्य पणाला लावलं. या वर्षातील मूलं ही संघर्षाची मशाल घेऊन जन्माला आली असंच असावं. कारण शिक्षणाने वेडी झालेली मूलं ही कित्येक संकटातून जात आहेत. नेमकी नोकरी करावी की उद्योग, शेती करावी की व्यापार यातील घोळ कधी या पिढीच्या लक्षातच नाही आला. कारण उद्योग करण्यासाठी भांडवल करता नाही आलं. शेती ही दुय्यम कारण अवेळी पाऊस, वातावरणाचे बदल, शेतीवरील कर्ज, पारंपरिक शेतीप्रकार या सर्वांचा परिणाम पूर्ण जगण्यावरच झाला. राहिला प्रश्न नोकरीचा त्याचं असं झालं की स्पर्धा परीक्षातून काही झाले प्रस्थापित पण बाकीच्यांचे भविष्य काय, तर उत्तर शून्य. वेळ अशी आली की २०१२ पासून जेमतेम जागा सरकारकडून भरल्या जाणे. त्यानंतर सरकारची उदासीन धोरणे, उमेदीच्या काळात निराशेची पाल ठोकून सज्ज असताना उगवतीचा सूर्य दिसेल का यात काही वर्षे गेली. कुठेतरी एखादा आशेचा किरण दिसावा म्हणलं तरी डोळे अंधुक होउन नुसता अंधार आणि आंधरच! जितका रुबाब स्वप्नात दिसत होता तितकीच कदाचित त्यापेक्षा जास्त फरफट या जिंदगीने केली. पोर नुसती अभ्यास अभ्यास करत कधी जागतिक प्रश्नावर उपाय सांगायला लागली कळली नाही. पण जगाच्या प्रश्नापेक्षा जगण्याचं उत्तर कधी का या पिढीला आलं नाही हे मात्र अनुत्तरितच. कित्येक जिंदग्या वाया गेल्या असतील या पिढीच्या वाट बघण्यात. प्रत्येक सकाळ ही वर्तमानपत्रातील भरतीच्या जाहिरातीवर नुसती हुंबड घालून कित्येक भविष्याची राखरांगोळी झाली असेल याचे माप असेल का? आणि हां याचेही माप असेल का की कित्येक रात्री ह्या स्वप्नाचा चंद्र फुलवण्यात गेल्या असतील. या पिढीने अर्ध आयुष्य आशेवर घालवलं आणि एवढं होऊन पण अजून आयुष्याला स्थिरता न मिळावी हे दुर्दैव की शाप. काही वर्षांचा काळ हा सरकारच्या धोरणांनी धूसर झाले. कुठेतरी नक्की जीवन बदलेल असं वाटत असताना आधीचे कमी की काय म्हणून कोरोनाने जिंदगीवर मात केली. निराशेच्या जगण्यातली तलफ अजूनच प्यारी वाटते. संघर्षाचा काळ हा जास्त दिवस असेल तर तो खूप जवळचा आणि आपुलकीचा वाटतो. या काळात कशीही पिढी झोडपली गेली हे कुणी वेगळे सांगायला नको.

यातून जे निसटले ते थोडे फारच. पण हे क्षेत्र सोडले तर बाकीच्या क्षेत्रातील लोकांनी थोडीफार प्रगती केली जसे की कोणी फिटर झाले, कोणी व्यवसाय केला. व्यवसायातील ज्या लोकांना वारसा होता ते आपापल्या परीने स्थिरस्थावर झाले. मग प्रश्न इथे येतो की ज्यांच्या एकाही पिढीने कधीच काही धाडस केले नव्हते त्यांच्याच पुढच्या पिढीने ते केले. यांना त्यांचं भविष्य हे मृगजळासारखं खुणावत होतं. पण सगळी स्वप्नं खरी होतात? व्यवसायासाठी मूलभूत लागणाऱ्या गोष्टीची जुळवाजुळव करण्यात या पिढीला केसांना डाय करावा लागतो हे दुर्दैव की शाप! तरी पण नशिबावर धाडसाने बाजी मारली. अशी ही पिढी जगाच्या पसाऱ्यात चहूबाजूंनी गुरफटत गेली, कधी स्वतःला सावरत गेली.

या पिढीने अशी कित्येक क्षेत्रे पाहिली. मोबाईलसारखे तंत्रज्ञान पहिल्यांदाच पाहिले. रंगीत टीव्ही पण पाहिले, इंटरनेट पाहिले. टेपरेकॉर्डरच्या विश्वातून कधी डीव्हीडी आणि तारवरून मोबाईल फोन कधी ही पिढी मोठी झाली हे कळलेच नाही. पण या सर्वात कायम निकृष्ट दर्जावर स्वतःला ठेवत शेतकरी तसाच राहिला हे मात्र नियतच सांगू शकेल. सरसकट बरबाद झालेल्या शेतीच्या या पिढीची काय मजल की बदलून टाकेल.

या पिढीचे हे एकमेव क्षेत्र जिथे वारसा जपला. वारसा

या अर्थाने की पिढीजातची दलींद्री आहे तशी जपली.

साधारणपणे विचार केला तर ही पिढी कष्टाळू नव्हती अस नाही तर हिला पाहिजे तशी साथ मिळत गेली नाही. म्हणजे नोकरी, व्यवसाय किंवा शेती जोमाने करण्याच्या दिवसात या पिढीची प्रचंड हेळसांड झालेली दिसून येते, उदासीन सरकारची उदासीन धोरणे, पावसाची शून्य साथ एवढे कमी की काय म्हणून कोरोनाचे संकट आ वासून उभे ठाकलेले. कुठेतरी आशेचा किरण जगण्याकडे नेत असताना या संकटांचा घेराव दुर्देवच की नवा डाव, नवे राज्य असे वाटत असताना कोरोनानी त्याची भूमिका अगदी नटसम्राटासारखी निभावली. दोषाचे खापर फोडायला कुणाला शोधावे का खचून जावे संघर्षाच्या वेढ्यात की काळ बदलतो यावर अजून थोडी श्रद्धा ठेवावी. नेमके याच पिढीने का सोसावे. सोसावे ते सोसावे नेमके किती? उरलेसुरले आयुष्य अशाच संघर्षात जाईल की उगवतीचा सूर्य एक नवी आशा घेऊन येईल. सगळं अनिश्चितच! जन्माचे वर्ष स्वतः तर नाही ठरवता येत. मग दोष जन्मानी का माथी येतो. संघर्षाच्या या काळातही पिढी मात्र रुबाबदारपणे दुःख झेलत आलीच, इथून पुढेही तिला काही सोसण्यासाठी कुठे होमहवन करावे लागेल किंवा दोष काढण्यासाठी कोणती पूजा करावी लागेल असे वाटत नाही. अजूनही स्वतःच्या कष्टावर, स्वतःच्या कर्तृत्वावर भरभरून विश्वास ठेवून आहे. मागच्या शापावर उद्याचे वरदान भारी पडावे एवढेच देणे प्रारब्धाकडे आहे. या वर्षातील पिढीने जे सोसले, अनुभवले, जगले याचा उलगडा करताना मन मात्र अनुत्तरित की पिढीला हे शाप की दुसरं काय???

स्वप्नभेट

शेजल गणेश शिंदे, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)

पौर्णिमेच्या रात्री मला
तुझ्याकडे पहायचे आहे
चमकणाऱ्या चंद्राला
फिके पाडायचे आहे
आकाशात लकलकत्या
चांदण्या मोजायच्या आहेत
मग त्यांचे हिशोब तुझ्या
हातावर गिरवायचे आहेत
तुझ्या डोळ्यात साचलेली
आसवे पुसायची आहेत
तुझ्या थकलेल्या डोळ्याला
खांदा द्यायचा आहे
उंची कमी पडते म्हणून
ही मांडी द्यायची आहे
तुला शांत वाटेल तेव्हा
डोळे बंद होतील तुझे
झोपल्यावर चेहऱ्यावरची
निरागसता पहायची आहे.

अल्बर्ट एलिस

– डॉ. शितल भागवत जाधव

अमेरिकन प्रसिध्द मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अल्बर्ट एलिस यांचा जन्म २७ सप्टेंबर १९१३ साली झाला. ७५ पेक्षा जास्त पुस्तकं! ८०० च्या वर शोधनिबंध ! ४०० लेख! २०० च्यावर ऑडिओ अणि व्हिडिओ कॅसेट्स ! ही त्यांची आयुष्यभराची कमाई होती. त्यांनी विवेकनिष्ठ मानसोपचारशास्त्राला यश देऊन मानसशास्त्रात मोठी क्रांतीच घडविली नाही, तर बोधात्मक मानसशास्त्राची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविली. आपले सर्वस्व अर्पण करुन ४० वषपिक्षाही जास्त काळ मानसोपचारशास्त्राचा अभ्यास केला. यांना नेफ्रायटीस नावाचा आजार लहानपणी झाला होता. अनेक आजारांनी ते ग्रस्त होते. प्रत्येकाचे आई-वडील मुलांना भेटायला यायचे पण यांना कुणीच घरातील व्यक्ती भेटायला यायचे नाही. त्यामुळे ते खूप रडायचे, हॉस्पिटलचे वातावरण अशांत व्हायचे, मनाला होणारा मनस्ताप वेगळाच, इतरांची बोलनी खावी लागायची यातून वयाच्या नवव्या वाढदिवसाच्या दिवशी त्यांनी एक महत्वाचा धडा आत्मसात केला आणि स्वतःला पटवूनदेखील दिला. त्यांच्या आई-वडिलांना बदलने जरी त्यांच्या हातात नसले तरी त्यांच्याबद्दल कुठले विचार करावेत, हे मात्र बहुतांशी माझ्याच हातात आहे हे मनाशी त्यांनी ठरवलेलं कारण आई-वडिलांचे एकमेकांशी पटत नव्हते. माझे विचार ते किंवा इतर कुणीही ठरवू शकणार नाहीत. सध्याची परिस्थिती नक्कीच अप्रिय आहे; तरीदेखील ती हातपाय गाळून बसण्याइतकी भयंकर नाही. त्या परिस्थितीतून काही चांगलं निघू शकतं हा विचार परत मनात सखोल मुरवला. हॉस्पिटलमधील मुक्काम कमी करणं हातात नाही. म्हणून इथे राहायला लागतं म्हणून रडत का बसायचं? इथे राहण्याचा जमेल तितका फायदा करून घ्यायचा. ते विचार इतर मुलांना पण शिकविले. आपल्याला आवडत नसणाऱ्या परिस्थितीतही अनेक चांगल्या गोष्टी लपलेल्या असतात त्यामुळे तशा परिस्थितीचेही काही फायदे होऊ शकतात. हे फायदे आणि चांगल्या गोष्टी शोधण्याचं काम इतरांनी करायचं जो हे काम चांगल्या पद्धतीने करेल तो खेळाचा विजेता ठरेल. यातून फायदा हा झाला की, हॉस्पिटलचे वातावरण सकारात्मक झाले. आवडत नसणाऱ्या परिस्थितीतून काही चांगलं निघू शकतं हे सगळ्यांना समजायला लागलं यामुळे सर्व मुल आणि एलिस पटकन आजारातून बाहेर पडू शकले. इतकं सुंदर त्यांच जीवन तत्त्वज्ञान होत.

जेव्हा त्यांच मन अविवेकी विचारांकडे धाव घ्यायचे तेव्हा, यावर मात करण्यासाठी तीन कार्ड तयार केली. त्यावरचा संदेश वाचला की, त्यांचे अविवेकी विचार नाहीसे

व्हायचे. पहिल्या कार्डवर लिहिले होते की, काही मिळवायचं असेल, तर श्रमाला पर्याय नाही. हे कार्ड सांगायचं की, कठीण परिस्थिती नकोशी वाटत असली तरी दूरच्या हितासाठी अटळ आहे. त्यामुळे भविष्य सुंदर होईल. नजिकचे कष्ट थोडे तरी सुसहय व्हायचे. दुस-या कार्डवर लिहिले होते की, प्रतिकूल परिस्थिती ही आपल्याला वरदान असते. हे कार्ड त्यांनी पाहिल्यावर असे सांगायचे की, प्रतिकूल परिस्थितीवर जरी कितीही कठीण वाटली, तरी ती कणखर बनण्याचे प्रशिक्षण देते. त्या परिस्थितीला तोंड देऊन आपला विकास होतो. त्यामुळे त्यांची जिद्द वाढायची. तिसऱ्या कार्डवर लिहिले होते की, हेही दिवस जातील. हे कार्ड सांगायचे की, आताच्या परिस्थितीत कष्ट सोसावे लागले तरी कोणतीच परिस्थिती आहे तशीच राहत नसते. तिच्यात बदल होतच असतो. आजची कठीण परिस्थिती उदया नक्कीच बदलेल. आता घेतलेले कष्ट कायमस्वरूपी राहत नाही. कधीतरी त्यातून मुक्तता होईल या आशेने त्यांना उभारी यायची.

वैफल्य सहन करण्याची क्षमता हळूहळू वाढत नेली. जगाचा आणि इतरांचा मुक्त स्वीकार करण्यासाठी हाच एकमेव उपाय होता. त्यासाठी धीर बाळगायला ते शिकले. यांचे विचार मुळापासून अभ्यासताना हे विचार फक्त मानसशास्त्रापुरतेच मर्यादित नाहीत, तर या विचारात जीवनाच्या सर्व पैलूं पर्यंत पोहचणारे मूलभूत जीवन-तत्वज्ञान सामावलेलं आहे. अशा या महान मानसोपचार शास्त्रज्ञांचा मृत्यू २००७ साली झाला असला तरी विवेकी विचारांच्या रूपात आज ते जिवंत आहेत.

काहीतरी तिच्यावर ....

कु. श्वेता रामचंद्र चिमटे, एस.वाय.बी.एस्सी.

लिहावं म्हटलं आज काहीतरी तिच्यावर
शून्य असलेल अस्तित्व तिचं
टिपावं म्हंटलं कोऱ्या कागदावर
एक गुपित थांबलेलं, बोलक्या तिच्या ओठांवर
हळूच मग ओघळतो घाव, रावळ्या तिच्या गालावर
केलाय कोणी घाव, या उमलणाऱ्या मनावर
मोकळं करायचय, तिला कोऱ्या या कागदावर
शोध तिच्या नजरेचा वाहून जाते काजळ
शोधते सुखाला आज होऊन शांत वादळ
वाहत चाललीय तिची नाव ओसळणाऱ्या लाटांवर
विश्वास आहे तिचा नेतील त्या काठांवर
आजही हसते ती, तेज मात्र दिसत नाही
आजही असते ती, मग का मला ती दिसत नाही ?
हरवलेलं तिचं 'मी' पण शोधायचय जीवनाच्या पानावर
बहरून टाकायचय अस्तित्व तिचं कोऱ्या या कागदावर
साथ हवीय तिचीही, माझ्या या बोलावर
प्रेम करावे तिने फक्त आणि फक्त तिच्यावर ...

वाचनसंस्कृती रुजविण्यात ग्रंथालयाची भूमिका

डॉ. तृप्ती अंब्रे (ग्रंथपाल)

ग्रंथ आमचे साथी, ग्रंथ आमच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती
या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती
ग्रंथ शिकवती माणुसकी अन् ग्रंथ शिकवती शांती
निराश जीवा धीर देऊनी पुढे घेऊन जाती ग्रंथ

ग्रंथालय हा वाचकांसाठी ज्ञानाचा महासागर आहे ग्रंथालयाशिवाय शिक्षण व सुसंस्कृत समाजाची कल्पनाच करता येत नाही. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर प्रत्येक अडचणीत पुस्तके माणसांशी खऱ्या मित्रांसाठी सोबतीस असतात.

''ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचा खजिना आणि वाचन म्हणजे तो उघडण्याची चावी!''

ग्रंथालय हे ज्ञानाचे भांडार आहे आणि वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. वाचनसंस्कृती म्हणजे वाचनाची आवड, सवय आणि त्याचा समाजावर होणारा प्रभाव. आजच्या डिजिटल युगातही वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका अपरिहार्य आहे.

ग्रंथालयात असलेल्या विविध प्रकारच्या पुस्तकांमुळे वाचकांना आपल्या आवडीच्या विषयावर वाचन करण्याची संधी मिळते. ऐतिहासिक, शास्त्रीय, तांत्रिक, साहित्यिक आणि मनोरंजनात्मक अशा अनेक प्रकारच्या पुस्तकांचा संग्रह ग्रंथालयात असतो. त्यामुळे विविध क्षेत्रातील ज्ञान मिळविण्यासाठी आणि आपली वैचारिक समृद्धी वाढवण्यासाठी ग्रंथालय मदत करते.

शालेय शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यापासून ते आयुष्याच्या शेवटपर्यंत ग्रंथालय सर्वांना मार्गदर्शन करते. ग्रंथालये वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी अनेक उपक्रम राबवितात. उदाहरणार्थ वाचन स्पर्धा, समूह वाचन, पुस्तक प्रदर्शन, लेखक भेटी, वाचन गट, व्याखान कार्यक्रम आणि पुस्तक प्रकाशन समारंभ यांसारख्या उपक्रमांमधून लोकांमध्ये वाचनाची गोडी निर्माण केली जाते. हे उपक्रम वाचकांना नवीन पुस्तके आणि साहित्य क्षेत्रातील ताज्या घडामोडींशी जोडून ठेवतात.

संशोधन आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय अत्यंत उपयुक्त ठरते. विविध संदर्भग्रंथ, संशोधन पेपर, जर्नल्स आणि ऑनलाइन डेटाबेस यांचा उपयोग करून विद्यार्थी आपले ज्ञान वृद्धिंगत करू शकतात. विद्यापीठे आणि संशोधन संस्था आपल्या ग्रंथालयांद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी भरपूर साहित्य उपलब्ध करून देतात.

ग्रंथालय म्हणजे वाचन आणि वाचन हा आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे म्हणतात ना, ''वाचाल तर वाचाल'' परंतु इंटरनेटच्या महाजालात आपले एकूणच पुस्तक वाचन कमी झाले आहे याचे मुख्य कारण म्हणजे थेट माहितीच आपल्यापर्यंत प्रचंड मोठ्या प्रमाणात

वेगवेगळ्या माध्यमातून येत आहे या माहितीच्या पुरातून योग्य विश्वासाने माहिती शोधणे अवघड झाले आहे.

सध्या ग्रंथालये ही आधुनिक तंत्रज्ञानामुळे अधिक परिणामकारक झाली आहेत. ज्ञानाचे संकलन तथा साठा करणे, संवर्धन करणे आणि प्रसार करणे ही ग्रंथालयांची कार्ये नवीन तंत्रज्ञान आल्यामुळे अधिक प्रभावी झाली आहेत. ग्रंथालय आणि डिजिटल माहितीची व्यवस्थापन संगणक तंत्रज्ञान, संप्रेषण तंत्रज्ञान, साठाविषयक तंत्रज्ञान आणि संगणकाची जाळी विषय तंत्रज्ञान ही आव्हाने ग्रंथालयास पेलावी लागत आहेत. ग्रंथालयात ग्रंथापेक्षा इंटरनेटवर सध्या काय घडामोडी चालू आहेत नवनवीन तंत्रज्ञान अधिक परिणामकारक होऊन नवीन संकल्पना व प्रकल्प वापरात येत आहेत. संगणकामुळे तयार याद्या, डेटाबेसेस, नियतकालिके, पुस्तके, हस्तलिखित संग्रह व अभिलेख स्वरूपातील माहिती उपलब्ध होत आहेत.

डिजिटल युगात ग्रंथालयेही तंत्रज्ञानाचा वापर करून वाचनसंस्कृतीला चालना देत आहेत. ई-ग्रंथालये, ऑडिओबुक्स, ऑनलाइन डेटाबेस आणि डिजिटल वाचनालये यामुळे वाचक कुठेही आणि कधीही वाचन करू शकतात. आधुनिक ग्रंथालये ई-बुक्स, ऑडिओ बुक्स, डिजिटल संग्रहालये आणि ऑनलाइन डेटाबेसच्या माध्यमातून वाचनाला अधिक सुलभ बनवत आहेत. यामुळे वाचनसंस्कृती केवळ मुद्रित स्वरूपात न राहता डिजिटल स्वरूपातही वाढत आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये फिरती ग्रंथालये, मोबाईल लायब्ररी आणि ऑनलाइन वाचन सेवा पुरवून वाचनसंस्कृतीचा विस्तार केला जात आहे.

बालवाचकांसाठी ग्रंथालय विशेष उपक्रम राबवते. मुलांमध्ये वाचनाची सवय लावण्यासाठी कथा वाचन सत्रे, बालवाचन क्लब आणि चित्रकथांचे वाचन असे उपक्रम घेतले जातात. लहान वयात वाचनाची आवड निर्माण झाल्यास ती पुढे जाऊन ज्ञानवृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकासास मदत करते.

समाजातील सर्व स्तरांपर्यंत वाचनसंस्कृती पोहोचविण्यासाठी ग्रंथालये मोफत वाचन सेवा, पुस्तक बँक योजना आणि दिव्यांगांसाठी ब्रेल लिपीतील साहित्य आणि ऑडिओ बुक्स उपलब्ध करून देतात. यामुळे शिक्षणाची संधी सर्वांना समान मिळते. ग्रंथालये केवळ वाचनसंस्कृती वाढविण्याचे कार्य करत नाहीत, तर ती समाजाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. उत्तम विचारांची देवाणघेवाण, सृजनशीलता आणि कल्पनाशक्ती वृद्धिंगत करण्यासाठी ग्रंथालये आवश्यक असतात. एकूणच ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आणि विविध उपक्रमांद्वारे वाचनसंस्कृती अधिक बळकट करण्यासाठी ग्रंथालये सातत्याने प्रयत्नशील असून अधिकाधिक वाचकांपर्यंत वाचनसंस्कृती पोहोचविण्यासाठी ग्रंथालये नवनवीन मार्ग शोधत आहेत. वाचकांनीही अधिकाधिक ग्रंथालयाचा उपयोग करून वाचनसंस्कृती जोपासली पाहिजे! शेवटी मी असेच सांगेन, ''जेवढे वाचाल, तेवढे वाढाल!''

वाचन आणि ग्रंथालय ही समाजाच्या बौद्धिक विकासाची मुख्य शिदोरी आहे. अधिक वाचा, अधिक शिका आणि सतत पुढे जा. हाच संदेश महात्मा फुले महाविद्यालयाचे ग्रंथालय सातत्याने देत आहे.

ग्रंथालयामाजी बसे क्षणभरी !

तोचि ज्ञान कण वेचितसे !!

आजच्या संगणकीय माहिती तंत्रज्ञानाच्या काळात वाचन साहित्याचे स्वरूप बदलत चालले आहे. माहितीचा ओघ प्रचंड प्रमाणात वाढू लागला आहे. अनेक पुस्तके पीडीएफ स्वरूपातही उपलब्ध होऊ लागली आहेत एक प्रकारे ग्रंथालय एका क्लिकवर उपलब्ध होत आहेत. सोशल मिडीयाच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्रंथालयाचे ग्रंथालय वेबपेज (https://www.mpcollegepimpri.edu.in/library/) आहे. या वेबपेजवर ग्रंथालयाने ग्रंथालय ब्लॉग वाचकांसाठी (http://mpcollegelibrary83.blogspot.com) तयार केला आहे. या ब्लॉगमध्ये विद्यार्थ्यांसाठी ३२ पेजेसमध्ये ग्रंथालयाशी संबंधित व वेगवेगळ्या प्रकारची क्रमिक पुस्तके व ई-बुक्स उपलब्ध

करून दिली आहेत. याव्यतिरिक्त ऑडिओ बुकही उपलब्ध करून दिले आहेत. याशिवाय काही महत्त्वाच्या लिंक्स, ग्रंथालयीन वेगवेगळे उपक्रम, ऑनलाइन पुस्तक प्रदर्शन, महत्त्वपूर्ण अशा प्राध्यापकांच्या अभ्यास व्हिडिओ लिंकही ग्रंथालय ब्लॉगवर उपलब्ध करून दिल्या आहेत.

महाविद्यालयाचे ग्रंथालय हे विविध विषयांवरील संदर्भ ग्रंथ व क्रमिक पुस्तकांनी सुसज्ज आहे. ग्रंथालयात सिनिअर विभाग व ज्युनिअर विभाग अशी मिळून एकूण ग्रंथसंपदा ६६२०३ एवढी आहे. ३७५ सीडी व डीव्हीडी आहेत. ग्रंथालयात एकूण ३२ नियतकालिके येतात. ग्रंथालयाने N-List (National Library and Information service Infrastructure for Scholarly Content) हा डेटाबेस वाचकांसाठी उपलब्ध करून दिला आहे. त्यामध्ये ३१६४००० ई-बुक्स व ६३०० ई-जर्नल्स् उपलब्ध आहेत.याकरिता (https://nlist.inflibnet.ac.in/) व शोधगंगा वेबसाईटसाठी (http://shodhganga.infibnet.ac.in) या वेबसाईटचा उपयोग करण्यात येतो. ग्रंथालयामध्ये अंध / दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीत पुस्तके व ऑडिओ क्लिप उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रंथालयामार्फत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी.लिब. व एम. लिब. हे कोर्स चालवले जातात. या अभ्यासक्रमा अंतर्गत आतापर्यंत बरेच विद्यार्थी सेट, नेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत व काही विद्यार्थी पीएच.डी. करत आहेत. नुकतेच सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांत ०८ विद्यार्थी महाराष्ट्र शासनाची सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

ग्रंथालयांमध्ये देवाण-घेवाण कक्ष, संदर्भ ग्रंथ, दृक्श्राव्य विभाग, नियतकालिक विभाग, वाचनसाहित्य संग्रह विभाग, इंटरनेट विभाग, मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका कक्ष, रिप्रोग्राफी (झेरॉक्स) इत्यादी विभाग कार्यरत आहेत. याशिवाय महाविद्यालयाच्या संभाजीनगर कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालवले जाते, यासाठी तेथे स्वतंत्र अशी अभ्यासिका विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागात विषय (विभागीय ग्रंथालय कार्यरत आहेत. वाचकांसाठी ग्रंथालयाने QR कोड सुविधा उपलब्ध करून दिली आहे. QR कोडमध्ये ओपॅक (OPAC), लायब्ररी ब्लॉग, लायब्ररी वेबपेज, N-List, यूट्यूब चैनल इ. वेगवेगळ्या प्रकारचे QR कोड विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहेत. ग्रंथालयाचे स्वतंत्र यूट्यूब चैनल आहे.

पदवी वर्गासाठी हुशार, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना बुक बँक योजनेद्वारे पुस्तकांच्या किंमतीच्या १/४ किंमत आकारून पुस्तकांचे संच दिले जातात. गुणवंत व विकलांग विद्यार्थ्यांना मोफत बुक बँक दिली जाते, प्रायोगिक स्वरूपात भगवद्गीता हा ग्रंथ विविध भाषेत ऑडिओ स्वरूपात सादरीकरण करण्याची सुविधा ग्रंथालयात उपलब्ध आहे. वाचकांसाठी ओपॅक सुविधा आहे. या ओपॅकद्वारे विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कोणते पुस्तक उपलब्ध आहे ते पाहता येते. याशिवाय ते पुस्तक कोणत्या कपाटात आहे याचीदेखील माहिती घरबसल्या त्वरित मिळते. उत्तम वाचन करणाऱ्या वाचकांना Best Reader Award दिला जातो. संगणकाद्वारे पुस्तकांची देवाणघेवाण होते. Book Return Drop Box ची सुविधा आहे.

वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी ग्रंथालयामार्फत वर्षभर वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रमाचे आयोजन करण्यात येतात.

१. दि. १२ ऑगस्ट हा डॉ. एस.आर. रंगनाथन दिनानिमित प्रतिमापूजन, भित्तीपत्रक, ग्रंथवाचन व प्रश्नमंजुषा चे आयोजन करण्यात येते.

२. वाचन प्रेरणा दिन, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिन व मराठी राजभाषा गौरव दिनानिमित 'ग्रंथ प्रदर्शन' व व्याख्यानाचे आयोजन केले जाते

३. दि. १ जानेवारी - १५ जानेवारी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यामध्ये प्रामुख्याने - पुस्तक परीक्षण स्पर्धा, पुस्तक वाचन, ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन,

व्याख्यान, भित्तीपत्रक व लेखक-वाचक संवाद, ऑनलाईन ग्रंथप्रदर्शन इत्यादी

४. दरवर्षी नियमितपणे Best Reader Award ग्रंथालया मार्फत उत्तम वाचन करणाऱ्या वाचकांना दिला जातो. सन २०२४-२५ या वर्षीचा कु. काजल मोहन महामुनी (टी.वाय.बी.कॉम.) व शाम चंद्रकांत गायकवाड (एस.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्यांना देण्यात आला.

५. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत चालविला जाणारा एम.लिब. (Master of Library and Information Science) अभ्यासक्रमाचे आठ विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

ग्रंथालयाच्या ब्लॉगवर जाण्यासाठी पुढील OR कोड स्कॅन करा.

जाणवले मज पहाट झाली...

प्रियांका संजय मुरुडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)

सामोरी हा निळसर अंधार
जग सारे निजले शांत
नव्या पहाटेच्या स्वप्नात
उगवता ही स्वप्नांची पहाट
जाणवले मज पहाट झाली.....
चंद्र हा आकाशात
जरा बोलतो मज
जातो मी माझ्या स्वप्नात
आनंद देत आली पहाट
जाणवले मज पहाट झाली....
पक्ष्यांचा चिवचिवाट ऐकता
घेऊनि उंच भरारी
मन माझे उडाले गगनात
पहाटेच्या या तांबूस नभात
जाणवले मज पहाट झाली....
काढुनि नवी रांगोळी
पहाटेच्या फुलपाखरांची
देऊनी उत्साह मनाला
पाखरे ही सुमनांसारखी
उत्साहाच्या या नव्या पहाटे
जाणवते मज पहाट झाली....
सुमनांचा सुगंध येता
बनविल्या फुलांच्या माळा
देवा चरणी अर्पण करूनि
घेऊनि आले आनंदाच्या झळा
आनंदाच्या या नव्या पहाटे
जाणवले मज पहाट झाली...
हळूच हाक मारती सूर्य नभा
बोलती मज पहाट झाली
आलो घेउनि तुमच्याचसाठी
मी नव्या दिवसाची नवी पालवी
पहाटेच्या या नव्या पालवीत
जाणवले मज पहाट झाली.....

भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन

श्री. संतोष बोभाटे, सहाय्यक ग्रंथपाल

ग्रंथालय हे संग्रहालय आहे. ती चळवळ व्हावी म्हणून अहोरात्र झिजणाऱ्या डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयाची पंचसूत्री तयार केली. ज्याच्या आधारावरच ग्रंथालयशास्त्राचा पाया रचला गेला आहे. ग्रंथालयाचा फायदा सर्वसामान्यांना व्हावा व ग्रंथालयांना जास्तीत जास्त लोकाभिमुख बनवन्यासाठी त्यांनी भारत व जगभरातल्या सर्वच ग्रंथपालांना रंगनाथन यांच्या तत्त्वांचा अभ्यास करावाच लागतो. ग्रंथालयशास्त्र म्हटलं की मेलविल डुई आणि डॉ. एस. आर. रंगनाथन या दोघांचं नाव सर्वांत प्रथम घेतले जातं.

आज भारतामध्ये ग्रंथालय आणि माहिती शास्त्रामध्ये जी काही प्रगती झालेली दिसत आहे त्यामध्ये सर्वात मोठं योगदान डॉ. एस. आर. रंगनाथन यांचं आहे. त्यामुळे त्यांना भारतीय ग्रंथालयशास्त्राचे पितामह म्हटलं जातं.

शियाली रामामृत रंगनाथन यांचा जन्म तामिळनाडूतील शियाली गावात झाला. १२ ऑगस्ट हा जन्म दिवस 'ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा केला जातो. दहावीचं शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी गणित या विषयात बी.ए. आणि एम.ए. शिक्षण पूर्ण केलं. १९१७ ला ते मँगलोरमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून शिकवू लागले. चार वर्षं मँगलोरमध्ये शिकवल्यानंतर ते १९२१ ला चेन्नई (तत्कालीन मद्रास) च्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. १९२३ मध्ये मद्रास विद्यापीठाने ग्रंथपालाच्या नियुक्तीसाठी जाहिरात काढली. ग्रंथपाल म्हणून निवड झालेल्या व्यक्तीला लंडनला पाठवण्यात येईल असंही त्यात म्हटलं होतं. त्यावेळी भारतात ग्रंथालयशास्त्राची औपचारिक पदवी कुणाकडेच नव्हती. ९०० अर्जांमधून रंगनाथन यांची १९२४ साली मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून निवड झाली. १९१७ से १९२३ या काळात त्यांचे गणिताचा इतिहास या विषयावर अनेक शोधनिबंध जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले होते.

रंगनाथन हे युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडन येथे ग्रंथालयशास्त्राचं प्रशिक्षण घेण्यास पोहोचले. त्या ठिकाणी ते बर्विक सेयर्स या प्राध्यापकाच्या संपर्कात आले. भारतासारख्या देशात ग्रंथालयांची खूप गरज आहे. असा त्यांचा निष्कर्ष होता. त्यामुळे सर्वांसाठी ज्ञानाची दारं खुली करणारी संस्था म्हणून ते ग्रंथालयाकडे पाहू लागले. लंडनमध्ये 'स्कूल ऑफ लायब्रेरियनशिप' मधील आपला अभ्यासक्रम पूर्ण करून लंडामधील क्रायडन सार्वजनिक ग्रंथालयात अल्प काळ कामदेखील केलं. तिथंच त्यांनी ग्रंथालयांच्या कामाची पद्धत अभ्यासली आणि भारतात कोणत्या गोष्टी आपण लागू करू शकतो याचा देखील विचार केला. भारतात परत येण्यापूर्वीच त्यांच्या डोक्यात विचारांची

चक्रं घुमू लागली होती. भारतीय पुस्तकांचं वर्गीकरण करण्यासाठी विशेष पद्धत असावी असं त्यांना वाटू लागलं होतं. त्यांच्याजवळ असलेल्या गणिताच्या विशेष ज्ञानाचा वापर ग्रंथालयांसाठी व्हावा असं त्यांना वाटू लागलं. त्यातूनच पुढे कोलन वर्गीकरण (द्विबिंदू वर्गीकरण पद्धत) पद्धतीचा जन्म झाला. पुस्तकांच्या वर्गीकरणाच्या एकूण आठ पद्धती आहेत त्यापैकी एक रंगनाथन यांनी तयार केलेली पद्धत आहे.

रंगनाथन यांनी १९२८ मध्ये मद्रास ग्रंथालय संघाची स्थापना करून भारतातल्या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. १९३१ मध्ये त्यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ 'द फाईव्ह लॉज ऑफ लायब्ररी सायन्स' प्रसिद्ध झाला. भारतीय ग्रंथालयांची चौकट रंगनाथन यांनी दिलेल्या या पाच सिद्धांतावरच आहे. हे नियम वरवर पाहता अत्यंत साधे वाटू शकतात पण त्यामुळे भारतातल्या ग्रंथालयांना कलाटणीच मिळाली. कारण सामान्य वाचकाचा विचार करून त्यांनी ही तत्त्वं मांडली आहेत. ते नियम असे आहेत –

१. ग्रंथ हे वाचण्यासाठीच असतात.

२. प्रत्येक वाचकासाठी पुस्तक असतं.

३. प्रत्येक पुस्तकासाठी वाचक असतो.

४. ग्रंथपालाचा आणि वाचकाचा वेळ वाचला पाहिजे.

५. ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. (सातत्याने वाढ होत जाणारी)

१९३१ ते १९६७ या काळात त्यांनी विपुल ग्रंथलेखन केलं. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरील त्यांची ६५ पुस्तकं आणि २५०० हून अधिक लेख प्रकाशित आहेत. या विषयावर विपुल लिखाण केलेले ते जगातील एकमेव अभ्यासक होते.

मद्रास विद्यापीठात त्यांच्या पुढाकाराने ग्रंथालयाशास्त्राचा शिक्षणक्रम सुरू झाला. पुढे बनारस हिंदू विद्यापीठातही त्यांनी हा अभ्यासक्रम सुरू केला. १९४५ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी रंगनाथन यांची नियुक्ती बनारस विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून केली. पुढील दोन वर्ष ते या ठिकाणीच राहिले.

भारतात ग्रंथालयाची चळवळ ही सरकारी अनुदानाशिवाय उभी राहू शकत नाही ही गोष्ट त्यांनी सुरुवातीलाच हेरली. त्यामुळेच पूर्ण देशभरातच असा कायदा असावा ज्यामुळे ग्रंथालयांचे व्यवस्थापन सुलभ होऊन ग्रंथालयं सर्वांसाठी खुली होतील, असा विचार त्यांनी केला. १९३० साली बनारसमध्ये अखिल भारतीय शिक्षण परिषद झाली होती. त्यावेळी त्यांनी असा कायदा असावा हा विचार मांडला. इंग्रजांचं सरकार असताना हा कायदा कोणत्याही राज्याने लागू केला नाही. पूर्ण भारतात त्याला एकच अपवाद होता तो म्हणजे महाराष्ट्रातल्या कोल्हापूर संस्थानाचा. १९४५ साली करवीर संस्थानने ग्रंथालयाचा कायदा मंजूर केला होता. त्यानंतर भारत स्वतंत्र झाल्यावर तामिळनाडूने १९४८ साली हा कायदा मंजूर केला. महाराष्ट्रात हा कायदा १९६७ मध्ये मंजूर झाला.

ग्रंथालयशास्त्रावर आशिया, यूरोप, अमेरिका या खंडातील अनेक देशांमधून त्यांनी व्याख्यानं दिली. यूनो, युनेस्को, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ डॉक्युमेंटेशन यांसारख्या आंतरराष्ट्रीय समित्यांवरही त्यांनी गौरवास्पद कामगिरी केली. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या ग्रंथालय समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. १९५७ मध्ये भारत सरकारने त्यांचा पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव केला.

विविधतेतील एकता

बोधक अनुराधा बाळासाहेब, MA/MSC ग्रंथालय विभाग

सर्वांना माहिती आहे की, भारत हा एक धर्मनिरपेक्ष देश आहे. भारतात भाषा, धर्म, संस्कृती इत्यादी विविधतेने नटलेले आहोत. हा सर्व फरक असूनही आपल्यामध्ये एकतेची एक उल्लेखनीय भावना आहे.

भारतात जवळजवळ १.३८ अब्ज लोक आहेत आणि त्या सर्वांचे विचार आणि राहणीमान वेगवेगळे आहे. भारतीय स्वातंत्र्यासाठीचा स्वातंत्र्यलढा आपल्या राष्ट्राच्या विविधतेतील एकता अधोरेखित करण्यासाठी पुरेसा आहे. आपल्या राष्ट्राच्या मुक्तीसाठीच्या चळवळींमध्ये वेगवेगळ्या धार्मिक आणि सांस्कृतिक श्रद्धा असलेल्या लोकांनी एकत्रितपणे लढा दिला.

भारत हा जगातील सर्वात मोठ्या देशांपैकी एक आहे आणि येथे विविध धर्मांचे लोक आहेत आणि या प्रत्येक धर्माचे स्वतःचे धार्मिक सण आहेत. भारतातील लोक इंग्रजी, संस्कृत, हिंदी, भोजपुरी, पंजाबी, मराठी, गुजराती, मल्याळम, तमिळ, ओडिया अशा विविध भाषा बोलतात. या सर्व विविधता असूनही प्रत्येकजण भारतात तीव्र प्रेमाने राहतो. हेच प्रेम लोकांना एकत्र आणते. या लोकांमध्ये एकता आणणे कधीही सोपे नसते. राष्ट्रीयत्व आणि देशभक्ती भारतातील लोकांना एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. विविधतेतील एकता राष्ट्राची सुसंवाद आणि शांती वाढवते आणि ते राष्ट्राची ताकद दर्शवते.

विविध धर्म आणि सांस्कृतिक उत्पत्तीचे लोक येथे राहतात. भारत हा एक धर्मनिरपेक्ष देश असल्याने ते त्यांना हवा तो धर्म पाळतात. येथील लोक एकमेकांचा आदर करतात आणि त्यांच्या संस्कृती, भाषा आणि श्रद्धा विविध असूनही प्रेम आणि बंधुत्वाच्या वातावरणात राहतात. ५००० वर्षे जुनी संस्कृती असलेला भारत धर्म, वंश, जात, संस्कृती किंवा भाषेत विविधतेने समृद्ध आहे. भारतात अंदाजे ३६ राज्ये आहेत, प्रत्येक राज्याची स्वतःची संस्कृती आणि भाषा आहे. देशातील असंख्य समुदायांसाठी दरवर्षी ३० हून अधिक नवीन उत्सव आयोजित केले जातात.

विविधतेतील एकता आपल्याला शिकवते की, जात, पंथ किंवा वंशातील फरक असूनही हे फरक आपल्याला वेगळे ठेवू शकत नाहीत आणि आपल्या देशाला चांगले बनवण्यासाठी आपण कायमचे एकत्र राहिले पाहिजे. आपल्या देशात घडलेली ही सर्वात असामान्य घटना आहे. ती केवळ राष्ट्राला एकजूट आणि बळकट ठेवत नाही तर आपल्यामध्ये प्रेम, शांती आणि आदरासह सहअस्तित्वा-वरील विश्वासदेखील जिवंत ठेवते. देशाची विशिष्ट संस्कृती, परंपरा, उत्सव, संगीत आणि नृत्य हे जगातील एक ऊर्जावान आणि अविश्वसनीय देश बनवते.

महात्मा गांधी – ''विविधतेत एकता गाठण्याची आपली क्षमता ही आपल्या संस्कृतीचे सौंदर्य आणि परीक्षा असेल.''

लैला गिफ्टी अकिता – ''एकतेत सौंदर्य आणि शक्ती आहे. आपण हृदय आणि मनाने एक असले पाहिजे. एक जग, एक लोक.''

मॅटी स्टेपानेक – ''एकता ही ताकद आहे... जेव्हा टीमवर्क आणि सहकार्य असते तेव्हा अद्भुत गोष्टी साध्य करता येतात.''

ॲरिस्टॉटल – ''चांगले शोधा. एकता शोधा. आपल्यातील फूट दुर्लक्षित करा.''

इमॅन्युएल क्लीव्हर – ''विभाजनापेक्षा एकतेत जास्त शक्ती असते.''

मेरी पार्कर फोलेट – ''एकरूपता नव्हे तर एकता हे आपले ध्येय असले पाहिजे. आपण विविधतेतूनच एकता प्राप्त करतो. फरक एकत्रित केले पाहिजेत, नष्ट केले जाऊ नयेत''.

मदर तेरेसा – ''केवळ नम्रताच आपल्याला एकतेकडे घेऊन जाईल आणि एकता शांतीकडे घेऊन जाईल.''

एकतेचा प्रकाश इतका शक्तिशाली आहे की तो संपूर्ण पृथ्वीला प्रकाशित करू शकतो.

विविधतेत एकता ही संकल्पना वेगवेगळ्या वैशिष्ट्यांसह लोकांना एकत्र आणण्यासाठी वापरली जाऊ शकते. अशा संकल्पना वापरून लोक समाजातून भेदभाव आणि दडपशाहीसारख्या नागरी आव्हानांना सहजपणे नष्ट करू शकतात. विविधतेत एकता राष्ट्राची सुसंवाद आणि शांतता वाढवते आणि ती राष्ट्राची ताकद दर्शवते.

मन माझं इथंच चुकतं .....

कु. प्राजक्ता सुतार, एफ.वाय.बी.एस्सी.

अपेक्षांच्या डोंगरावरून धपकन् खाली पडतं,
इजा होऊनसुद्धा परत तोच डोंगर रचत असतं,
मन माझं इथंच चुकतं .....
दुसऱ्यांच्या आनंदामध्ये स्वतःचा आनंद शोधत असतं,
मनाला लागणाऱ्या गोष्टीसुद्धा स्वीकारत असतं,
काळजावर दगड ठेऊन पुढे चालत राहतं..
मन माझं इथंच चुकतं .....
स्वप्नांच्या दुनियेत स्वतःला रंगवत असतं,
पण सर्वांमध्ये स्वतःला मात्र कमी लेखत असतं,
आयुष्याच्या या प्रवासामागे स्वतःला हरवून बसतं,
मन माझं इथंच चुकतं .....
एवढ्या चुका करूनसुद्धा खोटे हास्य घेऊन फिरत असतं,
त्या खोट्या हास्यामागे झुरत असलेलं मन कोणाला दिसत नसतं ,
हळूहळू समजतं, कोणी कोणाचं नसतं,
मन माझं इथंच चुकतं .....

मैत्री

कु. शेजल गणेश शिंदे , टी.वाय.बी.ए.(इंग्रजी)

मैत्रीतही मर्यादा असावी
आपल्या मैत्रीत मैत्री न दुखवावी
रोज रोजचे भेटणे नसले
तरी नात्याला वाळवी न लागावी
भक्कम बांध असावा की
तुटण्याची मुभा नसावी कधीच
मैत्रीच्या या खास दुनियेत
प्रेमाची बादशाहीच नसावी.

स्मार्टफोन : वरदान की शाप ?

सौ. करुणा ढवळे (मसुरे), M. Lib & L.Sc.

जग जोडणारा एकच धागा, ज्ञानाचा अमूल्य सागर,
कधी मदतीचा हात पुढे, कधी बनतो धोका गूढ अंधार.
वाट दाखवतो नव्या जगाची, शिकवतो नवी दिशा,
पण हरवतो नात्यांच्या रेशीमगाठी,
तोच का जीवनाची परीक्षा ?
बोटांवर फिरतो विश्व सारे, ज्ञानाच्या अनंत गंगा,
पण चोरतो शांततेच्या क्षणांना, करतो स्वप्नांवरती दंगा.
मन गुंतते या जंजाळात, डोळे तुझे नवी वाट शोधती,
पण तिथेच हरवतो स्वतःला, भावनांची वीण उसवती.
कधी हा वरदान प्रकाशाचा, कधी शाप काळोखाचा,
वापर करू या योग्यतेने, ठरवू याच्या सीमा,
स्मार्टफोन नसावा जगण्याचा राजा,
तो असावा फक्त एक सोपा दुवा !

आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन हा मानवाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. पूर्वी केवळ संभाषणासाठी वापरला जाणारा मोबाइल फोन आता एक बहुउद्देशीय उपकरण बनला आहे. शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, मनोरंजन आणि सोशल मीडिया या सर्व क्षेत्रात स्मार्टफोनने क्रांती घडवली आहे. परंतु जसे प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात, तसेच स्मार्टफोनचेही फायदे आणि तोटे आहेत. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो स्मार्टफोन हा वरदान आहे की शाप ?

स्मार्टफोनचे वरदान :

जीवन सुलभ करणारे तंत्रज्ञान पूर्वी पत्रे, टेलिफोन किंवा प्रत्यक्ष भेटीशिवाय संवाद शक्य नव्हता. मात्र स्मार्टफोनमुळे कोणत्याही क्षणी, कुठेही जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी सहज संपर्क साधता येतो. व्हॉट्सॲप, झूम, गुगल मीट यांसारख्या ॲप्समुळे संवाद अधिक जलद आणि प्रभावी झाला आहे.

शिक्षणात डिजिटल क्रांती

स्मार्टफोनमुळे ऑनलाईन शिक्षण शक्य झाले आहे. विविध शैक्षणिक ॲप्स, यूट्यूबवरील शैक्षणिक व्हिडिओज, ऑनलाइन कोर्सेस यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या ज्ञान मिळते. कोरोनाकाळात ऑनलाइन शिक्षणामुळे शालेय आणि महाविद्यालयीन विद्याध्यर्थ्यांचे शिक्षण अबाधित राहिले.

इंटरनेटद्वारे अवघ्या काही सेकंदांत हवी ती माहिती मिळवता येते. गुगल, विकिपीडिया, ऑनलाईन ग्रंथालये, संशोधन पेपर्स यामुळे जगभरातील माहिती सहज उपलब्ध आहे.

स्मार्टफोनमुळे ऑनलाइन व्यवसायांना चालना मिळाली आहे. डिजिटल मार्केटिंग, फ्रीलान्सिंग, ऑनलाइन स्टोअर्स, वर्क फ्रॉम होम या संकल्पनांमुळे अनेकांना नवीन रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

आज स्मार्टफोनच्या मदतीने वैद्यकीय सल्ला घेता येतो, हेल्थ अप्सद्वारे आरोग्य ट्रॅक करता येते, तसेच आपत्कालीन सेवांसाठी मदत मिळू शकते. कोरोना काळात 'आरोग्य सेतू' आणि 'कोविन' सारख्या ॲप्सने मोठी भूमिका बजावली.

स्मार्टफोनचा शाप : तंत्रज्ञानाचे व्यसन आणि सामाजिक हानी

स्मार्टफोनचे व्यसन

स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे तरुणांमध्ये व्यसनासारखी प्रवृत्ती दिसून येते. सोशल मीडिया, गेमिंग आणि सतत ऑनलाइन राहण्याची गरज यामुळे मानसिक तणाव वाढतो, उत्पादकता कमी होते आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो. स्मार्टफोनमुळे सोशल मीडियाचा अतिरेक वाढला आहे. त्यातून खोट्या बातम्या, सायबर गुन्हे, ट्रोलिंग आणि सोशल मीडिया यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेकजण आभासी दुनियेत अडकून खऱ्या नात्यांपासून दुरावतात. सतत स्क्रीनकडे पाहिल्याने डोळ्यांचे विकार वाढतात. झोपेचे चक्र बिघडते, निद्रानाश होतो. शारीरिक हालचाल कमी झाल्याने लठ्ठपणा आणि अन्य आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

डेटा गोपनीयता आणि सायबर गुन्हे

स्मार्टफोनच्या माध्यमातून वैयक्तिक माहिती चोरली जाऊ शकते. हॅकिंग, फसवणूक, ऑनलाइन फसवेगिरी, OTP स्कॅम यामुळे आर्थिक आणि वैयक्तिक नुकसान होण्याची शक्यता असते.

लहान मुलांमध्ये स्मार्टफोनचे व्यसन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ऑनलाइन गेम्स आणि यूट्यूबच्या अतिवापरामुळे शैक्षणिक नुकसान होते, तसेच आक्रमकता वाढते.

संतुलित वापर: स्मार्टफोन वरदान ठरवण्याची संधी

जर स्मार्टफोनचा योग्य आणि मर्यादित वापर केला, तर तो वरदान ठरू शकतो.

- मर्यादित स्क्रीन टाइम रोज किती वेळ स्मार्टफोन वापरायचा याचे नियोजन करावे.
- डिजिटल डिटॉक्स ठराविक दिवस किंवा वेळेसाठी सोशल मीडिया आणि स्मार्टफोनपासून दूर राहावे.
- शारीरिक आणि सामाजिक सक्रियता प्रत्यक्ष गप्पा, मैदानी खेळ, वाचन यावर भर द्यावा.
- डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेची काळजी पासवर्ड सुरक्षित ठेवावे, अनोळखी लिंक क्लिक करू नयेत.

सायबर सिक्युरिटी: डिजिटल युगातील संरक्षण कवच

आजच्या डिजिटल युगात सायबर सिक्युरिटी (Cyber Security) ही केवळ एक गरज नाही, तर ती आपल्या डेटा, वैयक्तिक माहिती आणि डिजिटल ओळखीचे संरक्षण करणारी ढाल बनली आहे. इंटरनेटचा वाढता वापर, ऑनलाइन व्यवहार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) गामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे सायबर सुरक्षेचे ज्ञान आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची झाली आहे.

सायबर सिक्युरिटी म्हणजे काय ?

सायबर सिक्युरिटी म्हणजे इंटरनेट आणि डिजिटल यंत्रणांचा सुरक्षित वापर करण्यासाठी घेतली जाणारी दक्षता. यामध्ये डेटा चोरी, हॅकिंग आणि फसवणुकीपासून संरक्षण करण्यासाठी तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि नियमांचा समावेश असतो. सायबर गुन्हे आणि त्यांचे प्रकार डिजिटल दुनियेत विविध प्रकारचे सायबर गुन्हे घडतात जे आपल्या सुरक्षिततेसाठी मोठा धोका ठरू शकतात.

हॅकिंग : हॅकर्स अनधिकृतरित्या तुमच्या स्मार्टफोन, लॅपटॉप किंवा ऑनलाइन खात्यांमध्ये प्रवेश मिळवतात.

याचा वापर डेटा चोरी, बँकिंग फसवणूक आणि माहिती लीक करण्यासाठी केला जातो.

फिशिंग : फेक ई-मेल, मेसेज किंवा वेबसाइटद्वारे तुमची वैयक्तिक माहिती आणि बँक तपशील चोरण्याचा प्रकार. बँकिंग OTP, क्रेडिट कार्ड डिटेल्स, पासवर्ड अशा गोष्टींवर फसवणूक केली जाते.

व्हायरस, ट्रोजन, स्पायवेअर आणि रॅन्समवेअर यांसारख्या हानिकारक सॉफ्टवेअर्सद्वारे तुमचा डिव्हाइस संक्रमित केला जातो. डेटा लॉक करून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला जातो. सोशल मीडिया फसवणूक आणि डिजिटल ओळख चोरी तुमच्या फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर सारख्या सोशल मीडिया अकाउंट्सचा गैरवापर केला जाऊ शकतो. फेक अकाउंट तयार करून चुकीच्या गोष्टी व्हायरल केल्या जातात.

पब्लिक WI-FI हॅकिंग केला जातो

सार्वजनिक Wi-Fi नेटवर्क्स (मॉल, कॅफे, रेल्वे स्टेशन) हॅक करून हॅकर्स तुमच्या डिव्हाइसला संक्रमित करू शकतात. यामुळे तुमचा डेटा सहज चोरी होऊ शकतो. सायबर सिक्युरिटी मजबूत करण्यासाठी प्रभावी उपाय

स्ट्रॉग पासवर्ड आणि टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन

- पासवर्ड शक्य तितका लांब आणि अवघड ठेवा (संख्यां, स्पेशल कॅरेक्टर्स, मोठ्या आणि लहान अक्षरांचा समावेश असावा).
- प्रत्येक अकाउंटसाठी वेगळा पासवर्ड वापरा.
- टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (OTP, ई-मेल व्हेरिफिकेशन) सक्षम करा.

अनोळखी लिंक आणि फसवणूक टाळा

- अनोळखी ई-मेल्स, मेसेजेस आणि फोन कॉल्समधील लिंक्स क्लिक करू नका.
- फिशिंग हल्ले ओळखा बँक किंवा सरकारी संस्थांचे ई-मेल्स नेहमीच त्यांच्या अधिकृत वेबसाइटवरून तपासा.

अँटीव्हायरस आणि फायरवॉल सक्रिय ठेवा

- लॅपटॉप आणि स्मार्टफोनमध्ये विश्वसनीय अँटीव्हायरस सॉफ्टवेअर इंस्टॉल करा.
- फायरवॉल ऑन ठेवा, जेणेकरून हॅकिंग हल्ल्यांपासून संरक्षण मिळेल.

सोशल मीडियावर गोपनीयता वाढवा, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरील प्रायव्हसी सेंटिंग्ज तपासा.

- अनोळखी लोकांना वैयक्तिक माहिती शेअर करू नका.
- तुमचा ई-मेल आणि फोन नंबर सार्वजनिक करू नका.

सुरक्षित इंटरनेट आणि VPN चा वापर करा

- सार्वजनिक Wi-Fi नेटवर्क्सचा वापर टाळा, किंवा VPN (Virtual Private Network) चा वापर करा.
- फ्री ॲप्स आणि वेबसाइट्स वापरण्याआधी त्यांची सुरक्षा तपासा.

बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांमध्ये दक्षता ठेवा

- ऑनलाइन बैंकिंग करताना नेहमी बँकेच्या अधिकृत ॲप किंवा वेबसाइटवरून लॉगिन करा.
- आपले कार्ड डिटेल्स कोणालाही शेअर करू नका.

सायबर सिक्युरिटीसाठी महत्त्वाचे कायदे आणि नियम

भारतात सायबर गुन्ह्यांविरोधात कडक कारवाई करण्यासाठी हा कायदा लागू आहे. हॅकिंग, फसवणूक, आणि ऑनलाइन गैरवर्तन यावर कठोर शिक्षेची तरतूद आहे.

डिजिटल डेटा संरक्षण धोरण २०२३

युजरच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करण्यासाठी नवीन नियम लागू मोठ्या कंपन्यांना ग्राहकांचा डेटा सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी भारत सरकारची सायबर सुरक्षा यंत्रणा, जी सायबर हल्ल्यांवर वेळेत प्रतिसाद देते.

भविष्यातील सायबर सिक्युरिटी आव्हाने

- कृत्रिम बुद्धिमत्ता AI आणि सायबर गुन्हेगारी AI चा वापर करून फसवणुकीच्या नवीन पद्धती विकसित होत आहेत.
- डेटा हॅकिंग भविष्यात संगणकांच्या नवीन तंत्रज्ञानामुळे डेटा संरक्षणाचे अधिक आव्हान असेल.
- सायबर वॉरफेअर आणि डिजिटल हल्ले काही देश सायबर युद्धाचा वापर करून राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करू शकतात.

निष्कर्ष :

सायबर सिक्युरिटी ही आपली डिजिटल सुरक्षा आणि गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी अनिवार्य आहे. फक्त तंत्रज्ञानच नाही, तर आपली जागरूकता आणि सतर्कता देखील सायबर गुन्हे रोखण्यास मदत करू शकते.

'डिजिटल युगात सावधगिरी बाळगणे म्हणजेच सुरक्षित राहणे' सायबर गुन्हेगारांपासून सतर्क रहा, डेटा सुरक्षित ठेवा स्मार्टफोन हा ना पूर्णपणे वरदान आहे, ना पूर्णपणे शाप, तो कसा वापरायचा यावर त्याचे परिणाम ठरतात. योग्य मर्यादित आणि शहाणपणाने वापरल्यास स्मार्टफोन ज्ञान, विकास आणि सोयीसाठी उपयोगी ठरतो. मात्र, त्याचा अतिवापर झाला, तर तो मानसिक, शारीरिक आणि सामाजिक हानीस कारणीभूत ठरतो. म्हणूनच, तंत्रज्ञानाचा ताळतंत्राने वापर करणे हीच खरी शहाणपणाची गोष्ट ठरेल.

''स्मार्टफोन तुमच्या आयुष्याचा ताबा घेणार नाही, जर तुम्ही त्याचा ताळमेळ साधलात''.

आयुष्याचा टर्निंग पॉईंट : (राष्ट्रीय सेवा योजना)

– प्रेरणा बसवंशज कांबळे, एफ.वाय.बी.एस्सी.

NSS Camp सर्व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी व सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे शिबीर. या शिबिराचे मुख्य उद्देश म्हणजे गरजू लोकांची मदत करणे, ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यावर उपाय शोधणे. स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जागरुकता, शिक्षण प्रसार अशा महत्त्वाच्या विषयांवरही काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते.

महाविद्यालयातून प्रत्येक वर्षी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर जात असते. यावर्षी मीसुद्धा या शिबिराला गेले होते. सुरुवातीला वाटलं होतं ७ दिवस मस्त फिरणार, मजा करणार, पण शिबिराला गेल्यानंतर मला राष्ट्रीय सेवा योजनेबद्दलची ओळख जरा अजूनच पटली. NSS कडे बघण्याचा माझा दृष्टिकोनच बदलून गेला. 'खेड-शिवापूर' या ठिकाणी आमचे शिबीर आयोजित केले होते. तिथे गेल्यावर सगळ्यात आधी आम्ही ज्या ठिकाणी राहणार होतो. त्या ठिकाणाची स्वच्छता केली. शिबिराचा पहिला दिवस तर स्वच्छता करण्यात आणि ग्रुप बनवण्यातच गेला होता. ७ दिवसांसाठी आमचे ७ ग्रुप तयार केले होते. त्यानुसारच शिबिराचे नियोजन ठरवले होते. स्वयंपाकाची तयारी करणे, श्रमदान करणे, रोज कार्यक्रम घेणे अशा सर्व गोष्टींची जबाबदारी आमच्यावर होती.

या शिबिराने मला आणि माझ्या सर्व मित्रांच्या आयुष्याला एक वेगळंच वळण दिलं. कधीच काम न करणारे आम्ही, तिथे न सांगता काम करत होतो, कोणाशीही न भांडता एकजुटीने राहून ग्रुपला दिलेली कामे बिनचुक पार पाडत होतो. कधीच सकाळी लवकर न उठणारी मी या शिबिरामुळे लवकर ऊठू लागले. घरातील कामे न सांगता करत आहे. विनाकारण सर्वांना रागावणारी मी आता सर्वांना समजून घेत आहे. कोणत्याही अडचणीला कसे सामोरे जायचे हेही मी आणि माझे मित्र या शिबिरामध्ये शिकलो आहोत.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये सर्वांना त्यांची stage daring improve करण्याची संधी मिळत असते. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक, बौद्धिक असा सर्वांगीण विकास या शिबिरामुळे होत असतो. यामुळे प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थ्याने एकदा तरी शिबिर करावे असे मला वाटते.

आमचे शिक्षक आम्हाला म्हणाले होते, शिबिर संपल्यानंतर इथून जाण्याचा विचार सुद्धा तुमच्या डोक्यात येणार नाही आणि ते म्हणाले तसंच झालं. शिबिरामध्ये सगळ्या अनोळखी चेहऱ्यांशी आमची मैत्री झाली होती. घरी जाताना सर्वांची तोंड उतरलेली दिसत होती. सर्वांना माहित

होतं शिबिरामध्ये घालवलेले हे क्षण आपल्याला परत अनुभवता येणार नाहीत.

बऱ्याच लोकांच्या तोंडून ऐकले होते NSS चा camp काहीच कामाचा नसतो, तिथे फक्त कामं लावतात. पण जेव्हा मी या शिबिराचा भाग झाले तेव्हा मला खऱ्या अर्थाने NSS म्हणजे नक्की काय ? हे समजले. मी राष्ट्रीय सेवा योजनेची एक विद्यार्थिनी आहे हे ऐकले की समाधान मिळते. जेव्हा NSS चा टी-शर्ट घालून मी बाहेर जाते तेव्हा एक वेगळाच आनंद माझ्या चेहऱ्यावर असतो. शिस्त, प्रामाणिकपणा, समंजसपणा, एकजूटपणा या सर्व गोष्टी मला या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामुळे अवगत झाल्या आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेची मी एक विद्यार्थीनी आहे याचा मला अभिमान आहे.

मी स्वप्नांच्या जगात राहतो...

प्रियांका संजय सुरडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)

प्रेमाचा स्पर्श जरा स्वानंदी फुलतो,
पक्ष्यांना पाहताच आनंद गगनाला भिडतो,
कोकिळेचा कुहूकुहू मनी बहरतो,
फुलांच्या सहवासात हृदय अंतरी हरवतो,
कल्पनांच्या जगात मी कधी कधी जातो,
येऊनी जाग मला मी कल्पनांच्या जगात राहतो ....
वेगवेगळ्या रंगांना पाहून
मी रंगात गुंतून जातो,
कोणता रंग प्रिय मला
मी शोधत रहातो,
ऋतूंच्या आवारात मी गुंगून जातो,
हिवाळा, उन्हाळा, पावसाळा
मनी आणखी ऋतूंचा मोजपाढा करतो,
कल्पनांच्या जगात मी कधी-कधी जातो
येऊनी जाग मला मी कल्पनांच्या जगात राहतो ....

सोहळे आयुष्याचे ...

-माने मेघा सुरेश, एम.ए. भाग २ (इतिहास)

सांगावे किती सोहळे दुःखाचे
स्वतःच्या अंगणात मजला स्वातंत्र्य ना मिळाले कधी,
जाणकार असून साऱ्या गोष्टींचे
यशाचे शिखर गाठण्याचे मंत्र ना मिळाले कधी,
धुमसत राहिलं नेहमीच दुःख
अपयशाचे मनी माझ्या,
कष्टाचे कित्येक पलिते पेटवून
शोधल्या वाटा यशाच्या माझ्या,
नशीब नसतं काही असतं
सारं कष्टाचं अन् घामाचं फळ,
असं बोलणंही आता सोसवेना आपल्याच
खोट्या म्हणण्याची निसटती कळ,
एक दिवस असेल माझाही असं म्हणून म्हणून
वर्षे काढलेल्या मनाला उत्तर काय द्यावं,
समोरच्याच्या प्रश्नाला समजून उमजून
घेऊनही नेहमी निरुत्तरच किती दिवस राहावं,
संपेल एक दिवस हा संघर्षही
तेव्हा गेलेल्या वेळेचं गणित कसं सोडवावं,
संघर्ष संपला म्हणून आनंदित व्हावं की गेला
वेळ म्हणून दुःख पचवत बसावं,
नशीब असतं नसतं माहित नाही पण सगळं करून
हारलेल्या जीवाला कसं सांगावं,
मागणं नसतं काही देवाकडे तरीही
अपयशाचं गाऱ्हाणं कुणापुढे मांडावं...!

आजचा तरुण आणि सोशल मीडिया

श्रृतिका कांबळे, टी.वाय.बी.एस्सी.

तारुण्य आणि सोशल मिडिया एक नवा प्रवास

आजच्या डिजिटल आणि AI च्या युगात डिजिटल मिडिया जसे की WhatsApp, Instagram, Snapchat, Google, Messages अनेक प्रकारचे Browser इतर बाकी Apps वापर करतात. हे सर्व मीडिया व्यक्तींचे, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची ओळख दाखवण्यास तसेच विचारांची देवाणघवाण करण्यासाठी, संदेश देण्यासाठी तसेच (कॉल करणे) दूरध्वनीद्वारे बोलण्यासाठी हे सर्व Apps वापरतात.

या सर्व सोशल मीडियाद्वारे जगाशी कनेक्ट होण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ बनले आहे.

सोशल मीडिया हे खूप महत्त्वाचा तसेच सोशल मीडिया हा जीवनातील (Prime Factor) अविभाज्य घटक बनलेले आहेत. परंतु ह्या सर्व सोशल मीडियाचे जीवनात काही चांगले तर काही वाईट परिणाम झाले आहे.

AI याचा वापर शिक्षण आणि आधुनिक युगासाठी चांगला व प्रभावी उपयोग झाला आहेत. पण काही Apps मुळे तरुणाईवरती विपरीत परिणाम होत आहेत.

विशेषतः लहान मुलांवर त्याचे परिणाम होत आहेत. सकाळी ऊठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत सर्वच लोकांना मोबाईलचे व्यसन झाले आहेत.

आपल्याला माहित आहेत आत्ताच्या युगात Instgram हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि तरुण पिढीच्या वर्गातील खूप जोम धरलेला सोशल मीडिया आहे.

तारुण्याचं सौंदर्य आणि सोशल मीडियाचा प्रभाव

तरुण पिढीचे स्वप्न, धाडस आणि त्यांच्या असीम उत्साहाचा काळ म्हणूनच तर या वयात, सोशल मीडिया एक अनोखा मार्गदर्शक होऊ शकतो, शकतो म्हणजे झालेले आहेत.

फेसबुक आणि ट्विटर आणि इतर प्लॅटफॉर्म्सद्वारे सर्व तरुण आपले विचार, अनुभव आणि आवडीनिवडी सहजपणे शेअर करतात.

या सर्व शेअरिंगमुळे लोक आणखी जवळ येत आहेत. सर्व सोशल मीडियामुळे तरुणांना वेगवेगळ्या आणि नवीन संधी देत आहेत.

सोशल मीडिया आणि मानसिक आरोग्य

या युगात तरुण पिढी व त्यांची मानसिक स्थिती खूपच नाजूक असू शकते व ती स्थिती नाजूकच झाली आहे.

ही तरूण पिढी सोशल मीडियाद्वारे इतरांचा व त्यांच्या आयुष्याचा आर्दश घेतात आणि सततच्या या तुलनेमुळे तरुणांचा आत्मविश्वास कमी होतो किंवा कमी होऊ शकतो.

सोशल मीडियावर सकारात्मक वापर

सोशल मीडिया हा एका महत्त्वाचा भाग आहे. याचा

वापर आपण चांगल्या गोष्टींसाठीसुद्धा केला जातो. त्याचा सकारात्मक उपयोग केला तर खूप चांगली माहिती आपल्या पर्यंत येते.

सोशल मीडिया आणि कनेक्टिव्हिटी

सोशल मीडिया हे एक असे साधन आहे की, त्याद्वारे तरूण हे या जगाशी जोडते. सोशल मीडियाद्वारे विविध लोकांच्या विचारांची देवाणघेवाण करणे, इतर संस्कृतीतून त्यांची माहिती घेणे, त्या संस्कृतीतून काही शिकणे आणि या सर्व गोष्टींनमुळे विचारांच्या नवीन वळणांचा शोध घेणे ते विचार आकलन करणे. अशा अनेक गोष्टी आपल्याला एका क्लिकवर उपलब्ध होतात. या सर्व गोष्टी या युगात महत्त्वाच्या आहेत म्हणूनच तर या डिजिटल युगात सोशल मीडिया एक महत्त्वाच व अद्भुत साधन झाले आहे.

निष्कर्ष

सोशल मीडिया हे चांगले तसेच वाईटसुध्दा आहे. त्यामुळेच तर तरुणांनी सोशल मीडियाचा वापर हा साधन म्हणून पाहायला हवं. आपली वास्तविकता, आपली ओळख कायम अशीच ठेवताना या सर्व सोशल मीडियाचा सकारात्मक उपयोग करणे तितकेच गरजेचे आहे. तरुणांची खरी ओळख, त्यांचे व्यक्तिमहत्त्व, त्यांच्या विचारांमध्ये असते आणि आहेत.

शिक्षणाची चाहूल लागली ...

कु. अंजली रामचंद्र रोकडे, एस.वाय.बी.बी.ए.(सी.ए.)

शिक्षणाची चाहूल लागली
समाजास शिक्षणाची चाहूल लागली
शिक्षितांनी लिहिली एक नवीन कहाणी
शिक्षित झाले लोक नव्याने
हक्क समान आहे
जागृती ही समाजात झाली
समाजही सुधारला शिक्षणाने
नवीन पिढींनेही घेतली आकाशभरारी
शिक्षणाने जगणे सोपे झाले
नवनवीन यंत्रणा उदयास आली
अज्ञानाचा घोर अंधारही
प्रकाशित झाला, शिक्षणाच्या एका दिव्याने
विज्ञानाच्या ज्ञानाने, घरोघरी
विद्युत ऊर्जा जन्मास आली
शिक्षितांनी लिहिली एक नवीन कहाणी
शिक्षित झाले लोक नव्याने.

बदलते जीवन आणि मोबाईल

खेता रामचंद्र चिमटे, एस.वाय.बी.एस्सी.

आजच्या काळात जीवनात खूप मोठ्या प्रमाणावर बदल घडले आहेत आणि या बदलांमध्ये मोबाईल फोनचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे. मोबाईलच्या आगमनाने आपल्या जीवनशैलीन कायापालट केला आहे. एक काळ होता जेव्हा संवाद साधण्यासाठी पत्रलेखन, टेलिफोन आणि प्रत्यक्ष भेटी घ्याव्या लागायच्या. मात्र मोबाईल फोनच्या विकासामुळे आपले जीवन अधिक वेगवान आणि सोयीस्कर बनले आहे.

पूर्वी मोबाईल म्हणजे फक्त फोन कॉल्स करण्याचे साधन होते पण आता मोबाईलच्या माध्यमातून आपल्याला जगभरातील माहिती मिळवता येते. इंटरनेट, सोशल मीडिया, बैंकिंग, ऑनलाइन शॉपिंग, मनोरंजन आणि शालेय शिक्षणसुध्दा मोबाईलवर उपलब्ध आहे. मोबाईल आपल्या जीवनातील एक अविभाज्य घटक बनला आहे.

मोबाईल फोनमुळे व्यक्ती एकमेकांशी नेहमी संपर्कात राहू शकतात. हे एका दृष्टीने फायदेशीर ठरले असले तरी दुसरीकडे यामुळे व्यक्तिमत्त्वाची आणि सामाजिक जीवनाची गुणवत्ता कमी झाली आहे. अनेकदा मोबाईलमुळे लोकांना प्रत्यक्ष संवादाची आवड कमी झाली आहे. घराघरात आणि कार्यस्थळी लोक एकमेकांशी संवाद साधण्यापेक्षा मोबाईलवर वेळ घालवतात.

सोशल मीडिया ते मोबाईल फोनचे एक महत्त्वाचे अंग बनले आहे. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप अशा विविध प्लॅटफॉर्म्सवर लोक एकमेकांशी जोडलेले आहेत. परंतु यामुळे अनेकदा मानसिक ताण वाढतो. प्रत्येक गोष्टीचा एक सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम असतो आणि मोबाईल हा अपवाद नाही.

मोबाईलच्या अधिक वापरामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर त्याचे परिणाम होऊ शकतात. सतत स्क्रीनसमोर बसून राहण्यामुळे डोळ्यांची समस्या, झोपेचे विकार आणि एकलकोंडेपणाची लक्षणे दिसू लागली आहेत. म्हणून मोबाईलचा वापर संतुलित असावा लागतो.

मोबाईल ने आपल्या जीवनात सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचे बदल घडवले आहेत. याचा योग्य वापर करून आपण आपल्या जीवनाचा दर्जा सुधारू शकतो, परंतु त्याचे व्यसन न करता त्याला एक साधन म्हणून उपयोग करणे आवश्यक आहे. बदलावच्या या काळात मोबाईलने आपल्या जीवनान क्रांती घडवली आहे, परंतु त्याचा उपयोग जाणिवपूर्वक आणि योग्य असावा.

मराठी भाषेची थोरवी

आश्विनी धनाजी वाघ, एम.ए. २ (मराठी विभाग)

आपल्याकडे भाषेचा संबंध ओठापुरता मर्यादित समजला जातो. भाषा ओठातून येण्यापेक्षा ती पोटातून येणे गरजेचे आहे. भाषेचा प्रश्न केवळ अस्मितेशी निगडित असतो असे नाही तो अस्तित्वाशीच जास्त निगडित असतो. त्यामुळे मराठी हा विषय घेऊन करिअर करु इच्छिणाऱ्या मुलांना केवळ पदवी देणे एवढ्याच कामात विद्यापीठांनी धन्यता न मानता त्यांच्या पोटाचा प्रश्न सुटावा यासाठी नोकरीच्या आणि व्यवसायाच्या संधी त्यांच्यासाठी कशा निर्माण होतील याकरिता थोडे चौकटीबाहेर जाऊन उद्योग व्यवसाय क्षेत्राशी समन्वय साधला पाहिजे, त्यानुसार अभ्यासक्रमात बदल केले पाहिजे, असे प्रयोग इतर सर्व ज्ञानशाखांमध्ये आज होत आहेत. भाषेचे शिक्षण म्हणजे केवळ ललितसाहित्याचे शिक्षण नव्हे. व्यवहारात भाषा कशी वापरली जाते. शास्त्रीय लेखनात भाषेचे रुप कसे असते, विविध व्यवसायात भाषा कशी वापरतात, साहित्यकृतीमध्ये भाषेची अभिव्यक्ती कशी होते. याचे शिक्षण दिले गेले पाहिजे.

लोकमान्य टिळक म्हणत, 'नाडीवरुन ज्याप्रमाणे शारिरातील रोगाची अथवा स्वास्थ्याची परिक्षा होते तद्वतच भाषेवरुन राष्ट्राची बरी-वाईट स्थिती तज्ञ लोक ताडतात. लोकमान्यांच्या सांगण्याचे तात्पर्य एवढेच की इच्छाशक्ती असेल तर खूप काही होऊ शकते. भाषेच्या संदर्भात सारे काही शासनाने करावे ही भूमिकाही फारशी योग्य नाही. समाजाचीही भूमिका तेचढीच महत्त्वाची आहे. शासन, समाज, साहित्यसंस्था, ग्रंथालये, भाषातज्ञ आणि विद्यापीठे यांच्यात सुसंवाद निर्माण झाला तर भाषेसंदर्भात चांगले खूप काही घडू शकते.

आजपर्यंत झालेल्या सर्व साहित्य संमेलनामध्ये मराठी भाषेच्या अस्त्वित्वाची काळजी व्यक्त झालेली आहे. आजच्या तरुण पिढीला मराठीशी काहीही देणे-घेणे नाही, तरुण पिढीतील व्यक्ती मराठीत कमी बोलतात. मराठी संस्कृती लयाला चालली आहे वगैरे वगैरे असे निराशेचे सूर आळवणारी मंडळी जागोजागी दिसतात. याप्रकारचे निष्कर्ष शहरातील मराठी भाषेची स्थिती पाहून काढले जातात.

साक्षेपी समीक्षक आणि अ.भा मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. रा.ग. जाधव यांनी 'समाज आणि भाषा' या लेखात समाजाच्या भाषेसंदर्भातल्या अनास्थेवर बोट ठेवले आहे ते म्हणतात, ''लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य मराठीत लिहिले, ते मूलभूत समीक्षा किंवा गीतारहस्य मानले जाते; म्हणून जगभरचे गीता अभ्यासक मराठी शिकतात व लोकमान्य टिळकांचे भाष्य समजून घेण्याचा प्रयत्न करतात आपला समाज आणि आपली मराठी भाषा दोन्हीही अजून वसाहतिक पूर्वग्रहाचे बळी आहेत. तो पूर्वग्रह म्हणजे इंग्रजीशिवाय तरणोपाय नाही. हे खोटे नाही पण मराठी समाजाला मराठीशिवाय तरणोपाय नाही, हे आपण स्वतःच्या मनावर व इतरांच्या मानसिकतेवर बिंबवले पाहिजे.

माय मराठीचा जयजकार करताना आपल्यातली मराठीपणाची ज्योत तेवत ठेवणे महत्त्वाचे आहे. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते मराठीचे आभिजात सामर्थ्य जाणण्याची व जपण्याची प्रगल्भता मिळो, तितकीच हृदयाची विशालता मिळो.

''मायबोलीविना श्रेष्ठ भाषा नसे रे,
बोल पोटातले सहजी ओठांवरी ये,
जीवासी शिवाला नित्य जी मेळवी रे,
जिभेवरी मराठीस तू खेळवी रे.....'

मैत्री आणि प्रेम

माने ममता सुरेश, एम.ए.भाग -२ (इतिहास)

मित्रा मैत्री अन् प्रेमात कधी
गफलत करू नकोस ,
मैत्री असणाऱ्या प्रेमाला
स्वतःच एक सवलत देऊ नकोस ,
तुझ्याकडून असेल प्रेम म्हणून
समोरच्याला गृहीत धरू नकोस,
प्रेम असूनही मैत्रीच्या नात्यात
असं रोज रोज झुरू नकोस ,
जेव्हा होईल प्रेमाची जाणीव
तेव्हा मात्र मैत्रीच्या नात्याला कात्री लावू नको ,
प्रेम आहे तर आहे उगाच मैत्रीसाठी
स्वतःलाच स्वतःची खात्री देऊ नको ,
असं रोज रोज झुरण्यापरीस
एकदा बोलून विषय मिटवून टाक,
तसं तर प्रेम आणि मैत्रीच्या जंजाळात
प्रेमच बहुदा होतं खाक...!

रजनी

कु. भावना नितीन ढवळे,
एस.वाय.बी.ए.(इंग्रजी)

काळोखात बुडालेली, सत्याच्या पाशापासून मुक्त,
सैरावैरा होऊन स्वतःच्या अंतःकरणात
डुंबून जाण्याची मोहिनी तू रजनी ॥धृ॥
अंधाऱ्या काळोखात या भविष्याच्या प्रकाशवाटा शोधुनी
चंदनाचा दरवळ आयुष्यात जडवुनी
त्या स्वप्नांची तू पाठराखिणी तू रजनी ॥१॥
मोहाचा पारा देहावरती चढवुनी
केलेस तू उपकार तिच्यावरी
लखलखत्या देहावर वारूनांच्या
नजरांच्या भुका भागवुनी
ठेवलेस तिला कणखर कामिनी, तू रजनी ॥२॥
मैत्रीचे बंध प्रेमात गुंतवूनी
भरतीच्या अथांग समुद्रास निरव शांतता देऊनी
ज्ञान, अज्ञानाच्या जगात स्वतःला स्थिर ठेवुनी
माणूस प्रवृत्तीच्या लालसेला
विडंबनेचे टिकास्त्र ओवुनी
सत्याचे मर्म जगास देऊनी
प्रचंड ताकदीची तू रणरागिणी, तू रजनी ॥३॥

रंग भक्ती प्रेमाचा....

कु. श्रद्धा वाढिले, एम.कॉम.(भाग १)

''भक्ती प्रेमाच्या रंगात आम्ही न्हाऊ
रोमारोमाने विठ्ठल विठ्ठल गाऊ
सखा माझा सावळा पांडुरंग
धरिला मी साधू संतांचा संग
विठ्ठल नामाने अभिमान झाला भंग
टाळ मृदंगाच्या गजरात भक्त झाले दंग ''

ज्याला स्वतःच्या सुखाची कल्पना विसरता येत नाही, 'मी' पणाची गाठ ज्याची कधी सुटत नाही, इतरांच्या हदयाची पूजा ज्याला कधीच करता येत नाही.त्याच्या भक्तीला प्रेमाचं स्वरूप कधीच प्राप्त होत नाही. भक्तीतल्या प्रेमामध्ये आत्मसमर्पण हा मुख्य भाव आहे. कोणी म्हणे भक्तीतलं प्रेम कसं असतं? ज्याप्रमाणे एखाद्या मुक्या व्यक्तीला साखर खाऊ घातल्यानंतर त्या साखरेच्या गोडव्याचं तो वर्णन करू शकत नाही, त्याप्रमाणे भकतीतल्या प्रेमाचे स्वरूप आहे. भक्तीतल्या प्रेमाचं कोणी वर्णन करू शकत नाही, सांगू शकत नाही, बोलू शकत नाही ते फक्त चित्तामध्ये आपण अनुभवू शकतो आणि त्याचा आनंद आपण घेऊ शकतो –

''प्रेम न ये सांगता बोलता दाविता ।
अनुभव चित्ता चित्ती जाणे ॥''

भक्तिप्रेमाचे सुख भक्तांवाचून इतरांना कळत नाही, मग ते पंडित, ग्रंथवाचक, शास्त्री, ज्ञानी यापैकी कोणीही असले तरी त्यांना ते कळू शकत नाही. एकदा का भक्ती प्रेमाचा रंग माणसाला लागला तो रंग मरेपर्यंत उतरत नाही.

अंतर

कु. शेजल गणेश शिंदे, टी.वाय.बी.ए.(इंग्रजी)

तू निरंतर खुश आनंदी
मी सदा बावरी उदास
तू एक शाश्वत आणि
मी फक्त अंवेढेचे भास
तू तरुं झाड वडाचे रे
अन् मी गळालेली पान
तू बाग फुलांची रंगीत
मी ओसाड माळरान
तुझे माझ्यासाठीचे स्वप्न
लग्नाची सप्तपदी फेरी
तू पतंग आभाळातला
मी फक्त तुटलेली दोरी....

आसवांची हाक ...

तेजस विलास पवार, एम.एस्सी. भाग – १

भयानक आक्रोश झाला
किंचाळी कानी आली
क्रूर त्या लांडग्यांची शिकार
आज ही नारी झाली
शिळ तिची ती दऱ्याकपाऱ्यात गुंजली
आसवांची हाक तिची ओरडून कोरडी पडली
कधी इंच इंच जखमा अंगी
तर कधी रक्ताच्या थारोळ्यात सापडली,
कुस्करलेल्या शरीरासवे तिला
रस्त्यावर फेकली
जीवाची वेदना त्या कधीच
कुणा ना उमगली
आसवांची हाक तिची ओरडून कोरडी पडली
मायबापाच्या अश्रूंचा बांध ओसंडला
लाडक्या परीला पाहताना जीव कळवळला
आकाशी झेप घेणारे ते पाखरू
अंधारापरी गडप झाले
हताश या जीवनी
काळोखाचे ढग आले
सप्तरंगी स्वप्नांची नासाडी झाली
आसवांची हाक तिची ओरडून कोरडी पडली
गर्दीत चालताना तिला भयाण स्पर्शाची भीती
आजुबाजू अडखळणाऱ्या नजराही किती
धरणी मायेची असुरक्षित लेक तू
तुझ्या रक्षणाची आहे तरी काय नीती
भीतीने घाबरलीस तू , आणि
गुन्हेगारी मोकाट सुटली
आसवांची हाक तिची ओरडून कोरडी पडली
ठेवुनी ताठ बाणा
शोधू नको तू आसरा कुणाचा
बाहूत बळ भरुनी तुझ्या
निश्चय कर मनाचा
लेक जिजाऊची तू, बन जशी मर्दानी झाशीची
ठेचून टाक नांगी वाकड्या नजरेने
बघणाऱ्या गिधाडांची
छातीवर बैस सैतानाच्या जशी मर्दानी कोपली
आसवांची हाक तिची ओरडून कोरडी पडली
म्हणणे असे माझे तुम्हांला
पटते का ते बघा मनाला
मुलीलाच का बंधनाचा दावा
सांगा मुलाला स्त्रीचा आदर करावा
हर पुरुषाच्या मनी ही रीत रुजली
तर कोणीच म्हणणार नाही
आसवांची हाक ओरडून कोरडी पडली
आसवांची हाक तिची ओरडून कोरडी पडली.

अतिविचार

कु.शेजल गणेश शिंदे, टी.वाय.बी.ए.(इंग्रजी)

निजावे मी मनाच्या डोहात
अन तरंगत रहावे विचार सारे
डोहाचा अंत मिळेची न कदा
कालांतराने होईल संबंध खारे
मनाची शांती
मनाचे सुख
मनाचे काय
मी कोण ? मी काय ? 'मी ' च प्रश्न
भेटतील का मग मज उत्तर सारे.

मार्ग सत्याचा !!

संस्कृती संतोष अळणे, एफ.वाय.बी.व्होक.

जात धर्म विसरुनी, सुरु करूया माणुसकीचा रिवाज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने, घडेल आपला समाज ॥धृ॥
मला फक्त एक कळत नाही,
जात,धर्म काय असतो हा प्रकार
चांगले संस्कार प्राप्त करून,
नाही का करू शकत आपण
समानतेचा स्वीकार ?
ही गोष्ट समाजाला कळणे खूप गरजेचे झाले आहे आज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने, घडेल आपला समाज ॥1॥

कितीही केला विचार,
तरी एक गोष्ट मनातून का जात नाही ?
सर्वधर्म समभाव जर संविधान आहे,
तर मग जात का जात नाही ?
म्हणून मी म्हणते,
आपण सर्वांनी जाणून घेऊया हे राज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने,
घडेल आपला समाज ॥2॥

त्याग, सत्य आणि प्रेम हा खरा मानवतेचा धर्म,
हे आपण मानावे
कारण म्हणतात ना,
खरा तो एकची धर्म आणि जगाला प्रेम अर्पावे
याच वाक्याचा जेव्हा आपण उठवूया आवाज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने, घडेल आपला समाज ॥3॥

ना जगावे धर्माच्या नावावर आणि
नाही मरावे धर्माच्या नावावर
माणुसकी हाच धर्म आहे आपल्या
समाजाचा, फक्त चालावे
सत्याच्याच मार्गावर कोणाचीही
व्यर्थ निंदा न करता,
वागूया एकमताने आज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने,
घडेल आपला समाज ॥4॥

म्हणतात ना, माणसाने माणसाशी माणसासम वागणे
मग का प्रत्येकजण स्वीकारत नाही,
समाजात अशा प्रकारे जगणे ?
कोणालाही कमी लेखू नये,
असा विचार जेव्हा करू आपण आज
तेव्हा सत्याच्या मार्गाने, घडेलआपला समाज ॥5॥

शैक्षणिक, राजकीय, कौटुंबिक, आर्थिक हे आहेत
आपल्या समाजाचे भाग
संस्कार आणि संस्कृती मिळून फुलेल,
सुरेख अशा समाजाची बाग
सौजन्यशीलतेने वागून,
तयार होईल ज्ञानाचा तेजस्वी ताज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने,
घडेल आपला समाज ॥6॥

म्हणून म्हणते की,
जात, धर्म विसरुनी, सुरु करूया माणुसकीचा रिवाज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने, घडेल आपला समाज
तेव्हाच सत्याच्या मार्गाने, घडेल आपला समाज !!!

शोधत होतो अंधारात मी सूर्याचा प्रकाश ....

कु.प्रियांका संजय सुरडकर, टी.वाय.बी.ए. (इंग्रजी)

शोधत होतो अंधारात
मी सूर्याचा प्रकाश
घेऊनि आला सूर्यच मला
मायेच्या दारात,
तिचा मधुर आवाज कानी पडता,
आनंदाने मन बहरून आले,
कोण जाणे कोण होती ती,
मनात वाटे तिला आई म्हणावे,
उघडता डोळे, मी पाहिला,
तिचा तेजोमय चेहरा
तिच्या चेहऱ्यावरचा आनंद
माझ्या कायम हृदयात राहिला,
शोधत होतो अंधारात
मी सूर्याचा प्रकाश
घेऊनि आला सूर्यच मला
मायेच्या दारात,
स्मित हास्याने पाहुनि,
घेतले तिने हृदयाशी मला
आनंद मावेना तिचा गगनात
तिच्या नयनी भरल्या
आनंदाश्रूंच्या धारा,
तिच्या मायेच्या कोमल
हातांनी स्पर्श करता
मला परीसस्पर्श जाणवला
परीसच ती माझ्या आयुष्याची
तिने दिले सोन्याचे जीवन मला,
शोधत होतो अंधारात
मी सूर्याचा प्रकाश
घेऊनि आला सूर्यच
मला मायेच्या दारात .....

वसुदेवाचा विसर ....

तुषार वाजे, (अर्थशास्त्र विभाग)

आई बापाची गोष्ट सांगताना
थोडं चुकीचंच घडलं
बापाच्या तुलनेत आईच्या पारड्यात
नेहमीच जास्तीचं पडलं.....
चूक आपली नाहीच त्यात कारण
आपल्याला नेहमी आईचेच अश्रू दिसलेत
पण त्या अश्रूचा हिशोबच कुठंय?
जे बापानं आडोशाला जाऊन पुसलेत.....
शांत, कठोर, रागावणारा अन्
मारणारा बाप प्रत्येकानं पाहिला...
पण त्याच्या हृदयाचा हळवा कोपरा,
कायम अंधारातच राहिला.....
आपल्यातच सारी स्वप्नं बघतोय बाप,
जी त्यानं कधी पाहिलीत,....
पोरांचं आयुष्य घडवण्यातच त्यानं
पूरी जिंदगी वाहिलीय.....
नशिबानं दिलेले चटक्यांमुळं आयुष्यभर
बाप कधी हसलाच नाही,
अन् आईच्या पायांच्या भेगांआडून
बापाचा फाटका सदरा कधी कुणाला दिसलाच
नाही.....
तिची थोरवी गाताना कायम
नकळत एक गुन्हा घडलाय,
देवकी अन् यशोदेच्या प्रेमापुढं
वसुदेवाचा साऱ्यांनाच विसर पडलाय....!!!

'बेरोजगारी आणि बदलती पिढी'

अमिन मुल्ला, टी.वाय.बी.कॉम.

तंत्रज्ञानाचा नवा उजेड,
बदलत चालली ही नवी पिढी।
कृत्रिम बुद्धीचे खेळ चालले,
माणसाच्या हातून सुटली गडी ॥
पूर्वी होते हात चालवायचे,
मनगटाच्या जोरावर जगायचे।
आता यंत्रे काम करीत आहेत,
मानव मात्र रिकामे बसायचे ॥
नोकऱ्या गेल्या, स्वप्ने विरली,
शिक्षण असूनही हात गारठले ।
माणसाला हाकलून सारा,
यंत्रांनी जागा व्यापून टाकली ॥
कोणी म्हणे ही क्रांती नवी,
कोणी म्हणे संधी आहे भारी।
पण पोटासाठी फिरणाऱ्या हाती,
सापडत नाही रोजची वारी ॥
मानवानेच ही वाट निवडली,
स्वतःचे भवितव्य स्वतः हरवले ।
यंत्रांना दिली अक्कल सारी,
नि माणसांचे भविष्य उद्ध्वस्त केले ॥
तंत्रज्ञान हवेच, पण मर्यादा पाहिजे,
मानवाचे स्थान आबाधित राहिले पाहिजे।
यंत्रे मदतीला, पण आधिपत्य मानवाचे,
तरच होईल उज्ज्वल भविष्यासाठी
वाजवी मोजमापाचे॥

गोष्ट विज्ञान गावाची ....

कु. अश्विनी चिमणे, एम.एस्सी. भाग १ (मायक्रो.)

गोष्ट आहे विज्ञान गावाची
आणि इथे गुण्यागोविंदाने नांदत असलेल्या
Microbiology, Maths, Physics, Chemistry ची,
Chemistry च्या Organic Inorganic करता करता
डोक्याचे Equilibrium चुकले
Periodic Tables च्या Spdt Blocks चे कोडे अजूनही
नाही सुटले.
जेव्हा Exam येते जवळ
तेव्हा Newton 3rd Law आठवते
Physics ने तर Weightlessness feel करून दिले
Maths बाबा म्हणतो, मी वाटतो सगळ्यांना बोअरिंग
खरेतर मला समजून घेण्यासाठी लागते मोठी डेअरिंग
आणि माझ्यामुळे तर वाढते ह्यांचे Exam मध्ये Scoring
Microbiology असते बाई आपल्याच नादात आणि
रुबाबात म्हणते मी दाखवले डोळ्यांना न दिसणारे जग संपूर्ण
नाक मुरडत म्हणते कशी Chemistry, Maths, Physics
शिवाय मी तर बाई अपूर्ण.
विज्ञानाने आपल्याला खूप काही शिकवले
पण आपण त्याचे कधी ऐकले का ? की त्यालाच ऐकवले
अहो, विज्ञानाने अनेक शोध लावले
अंधश्रद्धेच्या जाळ्यातून आपल्याला विज्ञानानेच तर
बाहेर काढले
करूया सन्मान ह्या आजच्या विज्ञान युगाचा
वाढवूया त्याची शान
अधोगतीतून प्रगतीकडे आलो अधिक, जरा ठेवूया त्याचे भान
दाखवूया आपलेही कर्तव्य आणि राखूया विज्ञानाचा मान
आता GBS आजाराने डोकं वर काढलं
होती एकमेकांची साथ
म्हणूनच तर कोरोनावरही केली मात .....

हिंदी विभाग



''मैं मासूम भला क्या जानूँ
क्या-क्या मिलता है दूकान में, बाजार में, मॉल में
पल भर को पलकें झपकाईं
फिर चुनौती दी तनिक मुस्कुराकर
अच्छा, अगर नेह बहन का
ममता माँ की
दुलार बेटी का
और एकनिष्ठ लगाव पत्नी का
खरीदकर लाओ
खर्च करके पैसे
तो मानूँ
तुम्हारे बाज़ार में सब कुछ मिलता है।''

- उषा यादव

विभागीय संपादक

प्रो.(डॉ.) कामायनी गजानन सुर्वे

अंतरंग

• रतन टाटा : उद्यम जगत की सामाजिक हस्ती	सुमय्या सय्यद, एफ.वाय.बी.ए.	55
• प्रदूषण	पूनम भारती, एफ.वाय.बी.ए.	57
• आजाद भारत और युवा	सुमय्या सय्यद, एफ.वाय.बी.ए.	58
• राष्ट्रभाषा हिंदी का विकास	मुस्कान गोलंदाज, एस.वाय.बी.ए.	59
• 'जिंदगी की खुशबू'	कुमार राठोड, एम.एस्सी. (II)	60
• कल पलटकर फिर झाँका जिंदगी में	आम्रपाली तुरुकमारे, टी.वाय.बी.बी.ए.(सी.ए.)	60
• एक चिट्ठी जो दिल चीर गई	सुश्री दिशा साळवे, एम.ए. II	61
• कुछ तो है जरूर	विशाल इसरानी, एम.एस्सी. (I)	62
• पर्यावरण बचाएँ, जीवन सँवारें	भावना ढवळे, एस.वाय.बी.ए.	63
• इश्क़ का फाइनेंशियल स्टेटमेंट	अमिन मुल्ला, टी.वाय.बी.कॉम.	64
• लड़की होने का कर्ज चुका दूँगी	साक्षी खोकर, एफ.वाय.बी.ए.	64
• कोविड –19 के बाद विज्ञान के सुधार : एक नई दिशा	पलक कौल, टी.वाय.बी.एस्सी.	65
• इश्क़ का अकाउंटिंग चार्ट	अमिन मुल्ला, टी.वाय.बी.कॉम.	66
• मेरी माँ	मुस्कान गोलंदाज, एस.वाय.बी.ए.	66
• तेन्झिन त्स्यूण्डू	सुश्री नूरजहाँ चाँद खान, टी.वाय.बी.ए.	67
• नारी पर अत्याचार	गौरी आराध्ये,एस.वाय.बी.ए.	68
• मैं भी इस दुनिया में जन्म लेना चाहती हूँ	मुस्कान गोलंदाज, एस.वाय.बी.ए.	68
• पर्यावरण सुरक्षा		69
• आकाश सा अपार	श्रुतिका वाघेरे, एफ.वाय.बी.एस्सी.	70
• युद्ध नहीं, बुद्ध चाहिए	नूरजहाँ खान, टी.वाय.बी.ए.	71
• भारत का किसान	रोहित खैरनार, एस.वाय.बी.ए.	72
• तुम चलो तो सही	दीपिका कसरे, एफ.वाय.बी.एस्सी.	72
• सुनीता विलियम्स की वापसी	बालाजी दहिकांबळे, एम.ए. 1 (हिंदी)	73
• एक तरफ	मुस्कान गोलंदाज, एस.वाय.बी.ए.	74
• पूछती है आज की नारी	सुमैया शेख, एफ.वाय.बी.ए.	74
• धरती की आवाज	तेजस पवार, एम.एस्सी. (भाग 1)	75
• नारी	मुस्कान शेख, एफ.वाय.बी.ए.	75

रतन टाटा : उद्‌यम जगत की सामाजिक हस्ती

(जीवनी अंश)

– **सुमय्या सय्यद**, एफ.वाय.बी.ए.

भारत के व्यापार जगत में एक युग का अंत हो गया है। रतन टाटा, जो भारतीय उद्‌योग और समाज में अपनी सादगी, नेतृत्व क्षमता और दानशीलता के लिए जाने जाते थे, अब हमारे बीच नहीं हैं। उनकी असाधारण जीवनशैली, विनम्रता और व्यावसायिक दृष्टिकोण ने उन्हें सिर्फ भारत में ही नहीं, बल्कि पूरी दुनिया में एक आदर्श व्यक्ति बना दिया था।

उनका नाम हमेशा टाटा समूह की महान उपलब्धियाँ और मानवता की सेवा के लिए किए गए महान कार्यों के साथ जुड़ा रहेगा। रतन टाटा का जीवन एक ऐसी कहानी है, जिसे सादगी और दृढ़ सादगी संकल्प के साथ एक उद्योगपति के रुप में जीवन जीने के लिए हमेशा याद किया जाएगा।

रतन टाटा का जन्म 28 दिसंबर 1937 को मुंबई में हुआ था। वे टाटा परिवार के सदस्य थे, जो भारतीय व्यापार जगत के सबसे बड़े और सम्मानित परिवारों में से एक है। रतन टाटा की परवरिश, उनके दादा-दादी के साथ हुई, क्योंकि उनके माता-पिता का तलाक हो गया था, जब रतन सिर्फ 10 साल के थे। उनकी शिक्षा अमेरिका के कानेल युनिवर्सिटी में आर्किटेक्चर और इंजिनियरिंग में हुई और उन्होंने हार्वर्ड बिजनेस स्कूल से एडवांस्ड मॅनेजमेंट प्रोग्राम भी पूरा किया। रतन टाटा ने अपने कैरियर की शुरुआत एक साधारण प्रशिक्षु के रुप में टाटा स्टील से की, जहाँ वे शॉप फ्लोर पर श्रमिकों की तरह काम करते थे। उनके उस दृष्टिकोण ने उन्हें कंपनी के जमीनी स्तर पर काम करने की बारीकियों को समझने का अवसर दिया। उनके कैरियर का यही साधारण आरंभ उनके विनम्र व्यक्तित्व का प्रमाण है, जो उन्हें दूसरों से अलग बनाता है।

1991 में जेआरडी टाटा ने रतन टाटा को टाटा समूह का अध्यक्ष नियुक्त किया। उस समय यह निर्णय विवादास्पद था क्योंकि कई लोग उसे उचित नहीं मानते थे। टाटा समूह उस वक्त कई अलग-अलग हिस्सों में बँटा हुआ था और इसे एक मजबूत नेतृत्व की जरूरत थी। रतन टाटा ने अपनी समझदारी, मेहनत और दूरदर्शिता से न केवल समूह को संगठित किया, बल्कि उसे एक वैश्विक ब्रांड में तब्दील कर दिया।

टाटा समूह के अध्यक्ष के रुप में, उन्होंने टाटा इंडस्ट्रीज, टेटली, कोरस, जगुआर, लैंड रोवर और टाटा कंसल्टेंसी सर्व्हिसेस (TCS) जैसे ब्रांडस् को विश्व स्तर पर पहचान दिलाई। 2000 में टेटली का अधिग्रहण और 2008 मे जगुआर, लैंड रोवर का अधिग्रहण उनकी सबसे बड़ी उपलब्धियों में से एक था, जो उनके व्यावसायिक कौशल और दूरदर्शिता का प्रतीक था। उनके नेतृत्व में, टाटा मोटर्स ने नैनो कार का निर्माण किया, जो दुनिया की सबसे सस्ती कार के रुप में जानी गई।

रतन टाटा की सादगी और विनम्रता हमेशा उनकी पहचान रही । उनका जीवन और कार्यशैली दिखावे से बहुत दूर थी । रतन टाटा अकेले वीआईपी थे, जो बिना किसी सहायक के अपने बैग और फाइलें उठाकर यात्रा करते थे। 1992 में इंडियन एयरलाइंस द्वारा किए गए सर्वेक्षण में उन्हें दिल्ली – मुंबई उड़ान के दौरान सबसे प्रभावशाली यात्री के रुप में चुना गया था । फ्लाइट अटेंडेंटस ने बताया कि रतन टाटा कभी अपनी पसंदीदा कॉफी न मिलने पर शिकायत नहीं करते थे, बल्कि अपने काम में व्यस्त रहते थे ।

उनकी सादगी का एक और उदाहरण तब सामने आया जब उन्होंने टाटा संस के प्रमुख बनने के बाद जेआरडी टाटा के कार्यालय में बैठने की बजाय अपने लिए एक साधारण कमरा बनवाया । वे कुत्तों सें बेहद प्यार करते थे, खासकर अपनें दो जर्मन शेफर्ड टोटो और टैंगो से । बॉम्बे हाऊस, जो टाटा समूह का मुख्यालय था, में वे अक्सर आवारा कुत्तों को भी अपने साथ लिफ्ट में लेकर जाते थे और उनकी देखभाल करते थे । इससे पता चलता है कि वे कितने पशुप्रेमी और दयालु व्यक्ति थे ।

रतन टाटा जी को सिर्फ एक सफल उद्योगपती के रुप में ही नहीं, बल्कि एक महान दानदाता के रुप में भी जाना जाता है । उनके दान कार्यों की लिस्ट काफी लंबी है । उन्होंने शिक्षा, स्वास्थ्य सेवा और ग्रामीण विकास में अनेक परियोजनाएँ शुरु कीं और उन्होंने टाटा एज्युकेशन एंड डेव्हलपमेंट ट्रस्ट की स्थापना की जो शिक्षा के क्षेत्र में कई गरीब बच्चों की सहायता करता है । उनकी परोपकारिता का एक और उदाहरण तब देखने को मिला जब उन्होंने ब्रिटेन के प्रिंस चार्ल्स द्वारा दिए जा रहे रॉकफेलर फाउंडेशन लाईफटाईम अचीवमेंट पुरस्कार को ठुकरा दिया क्योंकि उस दिन उनका कुत्ता बीमार था । यह उनके जीवन के मानवीय पहलू को दर्शाता है ।

रतन टाटा का व्यावसायिक जीवन हमेशा सुर्खियों में रहा और कई बार उन्हें आलोचनाओं का भी सामना करना पड़ा । जब टाटा स्टील ने कोरस का अधिग्रहण किया, तब कुछ विश्लेषकों ने इसे घाटे का सौदा बताया । उनके विदेशी अधिग्रहणों, जैसे जगुआर और लैंड रोवर, पर भी सवाल उठाए गए, और यह तर्क दिया गया कि इससे टाटा समूह को भारी वित्तीय नुकसान हुआ । इसके अलावा, 2020 में टाटा समूह के तनिष्क ब्रांड द्वारा जारी किए गए एक विज्ञापन को वापस लेने का निर्णय भी आलोचनाओं के घेरे में आया । इस विज्ञापन में सांस्कृतिक समन्वय का संदेश था, लेकिन इसे दक्षिणपंथी समूहों ने विरोध किया, जिससे कारण इसे हटाना पड़ा । रतन टाटा ने इस विवाद के बावजूद हमेशा सामाजिक सद्भाव की वकालत की । रतन टाटा का जीवन हमेशा प्रेरणादायक रहा है और उनका निधन न केवल टाटा समूह के लिए, बल्कि पूरे भारत के लिए एक बड़ी क्षति है । उन्होंने भारतीय उद्योग को वैश्विक स्तर पर पहचान दिलाई और अपनी सादगी और परोपकारिता से समाज में एक विशेष स्थान बनाया।

उनका जीवन हमें यह सिखाता है कि सादगी, विनम्रता और कठिन परिश्रम से हम किसी भी ऊँचाई तक पहुँच सकते हैं । उन्होंने अपने जीवन में दिखावे से हमेशा दूरी बनाई और अपने काम को ही प्राथमिकता दी । रतन टाटा का निधन एक युग का अंत है, लेकिन उनकी विरासत हमेशा जीवित रहेगी । टाटा समूह की सफलता उनकी परोपकारिता और उनके नेतृत्व में हुए सुधारों को भारत और विश्व कभी नहीं भूलेगा । रतन टाटा भारतीय उद्योग और समाज के लिए एक ऐसी मिसाल बन गए हैं, जिसे आने वाली पीढ़ियाँ हमेशा याद रखेंगीं ।

उनकी सादगी, विनम्रता और नेतृत्व की कहानी हमें यह सिखाती है कि सफलता का मतलब केवल धन और सत्ता नहीं है, बल्कि यह भी है कि आप अपने जीवन में कितने लोगों को प्रेरित करते हैं और समाज को किस तरह से बेहतर बनाते हैं। रतन टाटा जी का जीवन एक प्रेरणा है और वे हमारे दिलों में हमेशा जीवित रहेंगे ।

प्रदूषण
(एकांकी)

– **पूनम भारती**, एफ.वाय.बी.ए.

अर्चना : शिक्षिका, अवस्था 42 वर्ष
गिरीश : सि. विद्यार्थी, अवस्था 20 वर्ष
कविता : सि. विद्यार्थी, अवस्था 20 वर्ष
सिया : ज्यू. विद्यार्थी, अवस्था 19 वर्ष
राम : ज्यू. विद्यार्थी, अवस्था 19 वर्ष
सौम्या : ज्यू. विद्यार्थी, अवस्था 19 वर्ष

स्थान – पवनेश्वर उद्यान में बैठे हुए।
समय – 5 जून विश्व पर्यावरण दिवस दोपहर के 2 बजे।
(उद्यान के बीच विश्व पर्यावरण दिवस पर चर्चा करते हुए सि. व ज्यू. विद्यार्थी)

अर्चना मॅम : पर्यावरण को बचाने के लिए हमारी जिम्मेदारी क्या है ?
गिरीश : जागरूकता, पर्यावरण संबंधी मुद्दों के बारे में जागरुकता फैलाना।
कविता : पर्यावरण संरक्षण के लिए सामूहिक प्रयास करना।
सिया : पर्यावरण संरक्षण के लिए व्यक्तिगत जिम्मेदरी लेना।

(गिरीश, कविता और सिया की बातें सुन अर्चना मॅम को अच्छा लगता है और राम और सौम्या भी अपना मत विचार प्रकट करने लिए इजाजत माँगते हुए।)

राम : पर्यावरण हमारी वजह से दूषित होता है। और पेड़ ना होने की वजह से प्रदूषण बढ़ता ही जाता है। इसके लिए हम इन्सान ही जिम्मेदार हैं।

(इस पर सौम्या अपना विचार प्रकट करती है।)

सौम्या : हम ही जिम्मेदार हैं, पर्यावरण को बर्बाद करने में।

अर्चना मॅम : (सबकी बातें सुन कर हैरान हो जाती है। और बोलती है) सबके विचार अच्छे हैं पर बोलने से कुछ नहीं होगा। सबको प्रयास करना चाहिए, तब कहीं जाकर पर्यावरण को बचाया जा सकता है।

सिया : (पूछते हुए सबसे) पर्यावरण संबंधी मुद्दे क्या हैं ?
कविता : जलवायु परिवर्तन, प्रदूषण, वनस्पती और जीव–जंतुओं का संरक्षण

(बीच में टोकते हुए सौम्या बोलती है)

सौम्या : ये सब ठीक है, लेकिन हम शुरुआत कहाँ से कर सकते हैं और इन सब मुद्दों का समाधान क्या हो सकता है ?
राम : पर्यावरण को बचाने के लिए हम पेड़ लगाएँगे और उनकी देखभाल करेंगे। पेड़ वायु प्रदूषण को कम करने में हमारी मददत करते हैं।
सौम्या : जल संचयन करके हम जल प्रदूषण को कम कर सकते हैं, और जल की बचत कर सकते हैं।

अर्चना मॅम : सही कहा, हम यह सब कर सकते हैं।

सिया : हम वायु प्रदूषण को कम करने के लिए ऊर्जा की बचत करेंगे और ऊर्जा संसाधनों की बचत कर सकते हैं।

कविता : मॅम हम कूड़ा - कचरा प्रबंधन करके हम पर्यावरण प्रदूषण को कम कर सकते हैं। और हम जैविक खेती अपनाकर मिट्टी प्रदूषण को कम कर सकते हैं।

गिरीश : पर्यावरण शिक्षा फैलाकर हम लोंगो को पर्यावरण संरक्षण के महत्त्व के बारे में जागरूक कर सकते हैं। प्लास्टिक का उपयोग कम करके हम पर्यावरण के प्रदूषण को हम कर सकते है।

सब लोग एक साथ बोलते हैं एक मुहिम की शुरुआत करते हैं।

(चिल्लाते हुए बोलते हैं सब लोग)

(थोड़ी देर के बाद सब शांत हो जाते हैं)

मॅम : आज का दिन बहुत ही विशेष है। आज विश्व पर्यावरण दिवस है।

गिरीश : हाँ।

कविता : सच में, आज पर्यावरण दिवस है।

गिरीश : हाँ, आज विश्व पर्यावरण दिवस है। आज हम सब लोग पर्यावरण को सुरक्षित करने का संकल्प करते हैं।

मॅम : सही कहा तुम सबने। हमें पर्यावरण को सुरक्षित रखने के लिए कुछ करना चाहिए।

(सब एक साथ पूछते हुए)

सब लोग बोलते हैं :- बताइए मॅम हम क्या कर सकते हैं पर्यावरण को बचाने के लिए ?

सरकारी नीतियों का समर्थन करके हम पर्यावरण संरक्षण में सहायता कर सकते हैं।

इन कदमों को उठाकर हम पर्यावरण को बचाने में मदद कर सकते हैं।

(पर्यावरण हमारे लिए कितना उपयोगी होता है। उसके लिए हमें सारे नियमों का पालन करना चाहिए।)

आजाद भारत और युवा

- सुमय्या सय्यद, एफ.वाय.बी.ए.

जिसकी एकता के लिए, विश्व करें उसका सम्मान
आज उसी भारत में, जात-पात पर होते कत्ले आम।
जहाँ होता था नारी का
माँ-बेहनों जैसा सम्मान
आज अपनी लाज बचाने के लिए हैं वे परेशान।
नव युवा नव ज्योत बनो तुम
जागो युवा पीढ़ी जागो तुम।
जहाँ बहती थीं धाराएँ जल की
पावन सी निर्मल सी
वहाँ बहता है अब काला पानी,
जिस अमृत को पीकर
लोग होते थे तृप्त कभी
अब नदियों का जल देख होते हैं वे घृणित।
नव युवा नव ज्योत बनो तुम
जागो युवा पीढ़ी जागो तुम।
जहाँ होता था कभी
भारतीय संस्कृति का आचरण
वही नवभारत में शुरु हो रहा
विदेशी प्रतिभाओं का जागरण।
जहाँ कभी मानवता ही धर्म था
परंपरा ही परिभाषा थी,
उस संस्कृति को भूल चुके हो
नवभारत के युवा तुम
नव युवा नव ज्योत बनो तुम
जागो युवा पीढ़ी जागो तुम।
जहाँ माता-पिता थे कभी ईश्वरसमान
नव भारत की युवा देते अब उनको
वृद्धाश्रम में दान
जो प्रकृति थी कभी देवता समान
नव भारत में न होता
उसका जरा भी सम्मान
नव युवा नव ज्योत बनो तुम
जागो युवा पीढ़ी जागो तुम।

राष्ट्रभाषा हिंदी का विकास

(वैचारिक निबंध)

– **मुस्कान गोलंदाज**, एस.वाय.बी.ए.

भाषा या बोली मानव को मिली हुई एक शक्ति है। भाषा मनुष्यप्राणियों के जीवन में महत्त्वपूर्ण है। एक भाषा ही है मनुष्य जिससे मनुष्य अपने विचारों का आदान-प्रदान करता है । भाषा मनुष्य को दिया गया एक वरदान है, जो मनुष्य को बाकी प्राणियों से भिन्न करता है ।

हमारी पूरी दुनिया में अनेक भाषाएँ बोली जाती हैं । वैसे ही हमारे भारत देश में भी अनेक भाषाएँ और उन भाषाओं की अनेक बोलियाँ हैं। भारत में प्राचीन काल में संस्कृत भाषा बोली जाती थी, लिखी जाती थी। वक्त के साथ-साथ इसी संस्कृत भाषा बाद अनेक भाषाओं का उगम हुआ। जैसे कि पाली, अर्धमागधी, अपभ्रंश ऐसी अनेक भाषाओं ने जन्म लिया। ऐसे ही हिंदी का जन्म संस्कृत भाषा से हुआ है ऐसा कहा जाता है। प्राचीन काल में कुछ साहित्यिक ऐसे भी थे जिन्होंने हिंदी में अपने साहित्य का सृजन किया । हिंदी में साहित्य का सृजन करने वाले बहुत से ऐसे मशहूर संत कवि रह चुके हैं, जिन्होंने हिंदी में अपने विचार व्यक्त किए हैं ।

हिंदी में लेखन की प्रथा आदिकाल से चली आ रही है और आज आधुनिक काल में भी हिंदी साहित्य की दृष्टि से विकास कर रही है। आदिकाल, भक्तिकाल, रीतिकाल और आधुनिक काल हिंदी साहित्य का काल विभाजन है । इससे हम यह समझ सकते हैं कि हिंदी साहित्य का इतिहास बहुत ही अच्छा है ।

हिंदी भाषा के विकास के बारे में बात करें तो जो हिंदी सिर्फ पढ़ने-लिखने तक ही सीमित थी उस हिंदी को हमारे भारत देश के संविधान ने राजभाषा का दर्जा दिया । 14 सितंबर 1949 को हिंदी को राजभाषा का दर्जा मिला है । यह बात हमारे संविधान में अनुच्छेद 343 से 351 तक में दर्ज है । किसी भाषा को राजभाषा का दर्जा मिलना एक बहुत बड़ी उपलब्धि है । राजभाषा उसे कहा जाता है, जो प्रशासन के कामकाज में के वक्त बोली जाती हैं और उस देश के प्रशासन में जो भी लिखित - अलिखित घटनाएँ प्रसंग है उन सभी में राजभाषा का उपयोग किया जाता है। सिर्फ प्रशासकीय कामों में ही नहीं तो अधिकतम व्यवसाय और संपर्क करते वक्त भी हिंदी का उतना ही प्रयोग किया जाता है ।

हिंदी सिर्फ यहीं तक सीमित नहीं है । भारत के कई राज्यों ने हिंदी को मातृभाषा का दर्जा दिया है । हिंदी भाषा की कई बोलियाँ है और भारत देश के अनेक राज्यों में यह बोलियाँ अधिक मात्रा में बोली जाती है । हिंदी के विकास के बारे में जितना कहो उतना कम ही हैं । हिंदी एक ऐसी भाषा जो अपने देश के साथ-साथ विदेशों में भी पढ़ाई जाती है। यह हम भारतवासियें के लिए गर्व की बात हैं ।

हिंदी भाषा ने हमें आज इस स्तर पर लाकर खड़ा किया है जो विदेशों मे सबसे अधिकतम बोली जाने वाली भाषा है । हिंदी भाषा हमे रोजगार के अनेक अवसर प्रदान

करती है । जैसे कि हिंदी विषय का अध्ययन करने के बाद अध्यापक, निवेदक, पत्रकार, लेखक, अनुवादक, राजभाषा अधिकारी ऐसे अनेक पदों पर आपकी नियुक्ति हो सकती है । हमारे भारत देश में केंद्र सरकार आपको बहुत से ऐसे अवसर और ऐसे पद प्रदान करती है। सिर्फ हमारे भारत देश में ही नहीं तो पूरे विश्व में सीखी जाती है और सिखाई जाती है ।

हिंदी की इसी व्यापकता से हम समझ सकते हैं कि हिंदी का विकास हो रहा है । हिंदी भाषा एक ऐसे स्तर पर पहुँच गई है, जहाँ सिर्फ उस भाषा को सीखने के लिए लोग अपने देश को छोड़कर हमारे देश को चुन रहे हैं । पूरे विश्व में अनेक भाषाएँ बोली जाती हैं उन भाषाओं में से हमारी राजभाषा हिंदी को पूरी दुनिया में बोला जा रहा है, सीखा जा रहा है और सिखाया जा है । यह हमारे लिए गर्व की बात है ।

एक भाषा की यही उपलब्धि उसके विकास को दर्शाती है। हमारी इसी हिंदी भाषा के लिए कुछ पंक्तियाँ ....

हिंदी हमारी शान है,
हिंदी हमारा अभिमान है,
जिस हिंद के हैं हम वासी,
हिंदी हमारे उस देश की जान है ...

'जिंदगी की खुशबू'

– **कुमार राठोड**, एम.एस्सी. (II)

चाँदनी रात की खुशबू,
सितारों के साथ महकाए,
हर सुबह की नई रोशनी,
नए सपने साथ लाए ।

जब मुस्कुराए दिल की बात,
तो दर्द भी कहीं खो जाते हैं,
दोस्त जो साथ हो तो,
वक्त भी अपने रंग दिखलाते हैं ।

जिंदगी का हर पल,
अपनी एक कहानी लिखता है,
दिल से जीने का नाम है,
खुशियों का राज दिल से मिलता है ।

कल पलटकर फिर झाँका जिंदगी में

– **आम्रपाली तुरुकमारे**, टी.वाय.बी.बी.ए.(सी.ए.)

कल पलटकर फिर से झाँका जिंदगी में,
तो भर आईं फिर से आँखें ।
कहीं पे थी जीत, प्यार और सफलता,
तो कहीं पे दिखी हार और कहीं पे दिखे धोखे ।

हर एक पड़ाव पर सीखी नई-नई बातें,
और सफलता की तरफ बढते कदम दिखे ।
कभी-कभी मिली थी हर चीज़, और प्यार
तो बढ़ी थी जीवन में हरियाली,
कहीं पे थीं बहुत मुश्किलें, जैसे बिखरा हो
जीवन जमीन पर पडे पत्तों जैसे ।
कल पलटकर फिर झाँका जिंदगी में,
कभी-कभी तो ऐसे गिरे की अपनों ने
भी ठुकराया, तो कभी साथ दिया गैरों ने,
उसी समय हम अपनों को पहचानना सीखे ।

सफलता कुछ ही दूर थी,
पर मेहनत करना जरुरी था,
तभी छोड़ने पड गये सारे ऐशो आराम पीछे ।
कभी मिले, दुख, दर्द तो कभी मिली पीड़ा,
पर बीच रास्ते में मिल गए दर्द
बाँटने वाले दोस्त अच्छे ।
कल पलटकर फिर झाँका जिंदगी में
